| | | विद्यमान वेतनश्रेणी | ग्रेड वेतन | पे लेवल | वेतनश्रेणी | वेतननिश्चिती व वेतनवाढीसाठी ग्राह्य धरावयाचा ग्रेड पे | |
| 1 | सहाय्यक अधिक्षक (झू) पशुवैद्यकीय अधिकारी | 9300-34800 | 5400 | S-20 | 56100-177500 | 5400 | |
| 2 | लाईव्ह स्टॉक सुपरवायझर | 5200-20200 | 2800 | S-8 | 25500-81100 | 2400 | |
| 3 | डॉग पिग स्कॉड कुली | 5200-20200 | 1900 | S-1 | 15000-47600 | 1300 | |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८

प्रपत्र - अ

12 - कार्यशाळा विभाग

| अ.क्र | पदनाम | सहाव्या वेतन आयोगानूसार शासन मान्यतेप्रमाणे | | सातव्या वेतन आयोगानूसार शासनाकडील समकक्ष | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विद्यमान वेतनश्रेणी | ग्रेड वेतन | पे लेवल | वेतनश्रेणी | वेतननिश्चिती व वेतनवाढीसाठी ग्राह्य धरावयाचा ग्रेड पे | |
| 1 | असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर | 9300-34800 | 5400 | S-20 | 56100-177500 | 5400 | |
| 2 | कार्यव्यवस्थापक | 15600-39100 | 5400 | S-20 | 56100-177500 | 5400 | |
| 3 | कनिष्ठ अभियंता, मेकॅनिक (पदविकाधारक) | 9300-34800 | 4400 | S-14 | 38600-122800 | 4300 | |
| 4 | कनिष्ठ अभियंता, मेकॅनिक (पदवीधारक) | 9300-34800 | 4600 | S-15 | 41800-132300 | 4400 | |
| 5 | सहाय्यक कार्य व्यवस्थापक (पदविकाधारक) | 9300-34800 | 4400 | S-14 | 38600-122800 | 4300 | |
| 6 | सहाय्यक कार्य व्यवस्थापक (पदवीधारक) | 9300-34800 | 4600 | S-15 | 41800-132300 | 4400 | |
| 7 | फिटर | 5200-20200 | 2400 | S-8 | 25500-81100 | 2400 | |
| 8 | मेंन्टेनन्स हेल्पर | 5200-20200 | 1900 | S-1 | 15000-47600 | 1300 | |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८

प्रपत्र - अ

13 - सुरक्षा विभाग

| अ.क्र | पदनाम | सहाव्या वेतन आयोगानूसार शासन मान्यतेप्रमाणे | | सातव्या वेतन आयोगानूसार शासनाकडील समकक्ष | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विद्यमान वेतनश्रेणी | ग्रेड वेतन | पे लेवल | वेतनश्रेणी | वेतननिश्चिती व वेतनवाढीसाठी ग्राह्य धरावयाचा ग्रेड पे | |
| 1 | सुरक्षा अधिकारी | 9300-34800 | 4600 | S-15 | 41800-132300 | 4400 | |
| 2 | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | 9300-34800 | 4400 | S-13 | 35400-112400 | 4200 | |
| 3 | सुरक्षा निरीक्षक | 5200-20200 | 2400 | S-8 | 25500-81100 | 2400 | |
| 4 | सुरक्षा सुपरवायझर | 5200-20200 | 2000 | S-7 | 21700-69100 | 2000 | |
| 5 | रखवालदार | 5200-20200 | 1900 | S-1 | 15000-47600 | 1300 | |

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

## सहावा व सातवा वेतन आयोग वेतनश्रेणी तक्ता

| अ.क्र. | सहावा वेतन आयोग | | सातवा वेतन आयोग | |
|---|---|---|---|---|
| | विद्यमान वेतन संरचना | ग्रेड वेतन | पे लेव्हल | वेतन संरचना |
| १. | ४४४० - ७४४० | १३०० | S – १ | १५००० - ४७६०० |
| २. | ४४४० - ७४४० | १४०० | S – २ | १५३०० - ४८७०० |
| ३. | ४४४० - ७४४० | १६०० | S – ३ | १६६०० - ५२४०० |
| ४. | ४४४० - ७४४० | १६५० | S – ४ | १७१०० - ५४००० |
| ५. | ४४४० - ७४४० | १७०० | S – ४ | १७१०० - ५४००० |
| ६. | ५२०० - २०२०० | १८०० | S – ५ | १८००० – ५६९०० |
| ७. | ५२०० – २०२०० | १८०० | S – ५ | १८००० – ५६९०० |
| ८. | ५२०० – २०२०० | १९०० | S – ६ | १९९०० – ६३२०० |
| ९. | ५२०० – २०२०० | २००० | S – ७ | २१७०० – ६९१०० |
| १०. | ५२०० – २०२०० | २४०० | S – ८ | २५५०० – ८११०० |
| ११. | ५२०० – २०२०० | २५०० | S – ९ | २६४०० – ८३६०० |
| १२. | ५२०० – २०२०० | २८०० | S – १० | २९२०० – ९२३०० |
| १३. | ५२०० – २०२०० | २९०० | S – ११ | ३०१०० – ९५१०० |
| १४. | ५२०० – २०२०० | ३००० | S – ११ | ३०१०० – ९५१०० |
| १५. | ५२०० – २०२०० | ३५०० | S – १२ | ३२००० – १०१६०० |
| १६. | ९३०० – ३४८०० | ४१०० | S – १३ | ३५४०० – ११२४०० |
| १७. | ९३०० – ३४८०० | ४२०० | S – १३ | ३५४०० – ११२४०० |
| १८. | ९३०० – ३४८०० | ४३०० | S – १४ | ३८६०० – १२२८०० |
| १९. | ९३०० – ३४८०० | ४४०० | S – १५ | ४१८०० – १३२३०० |
| २०. | ९३०० – ३४८०० | ४५०० | S – १६ | ४४९०० – १४२४०० |
| २१. | ९३०० – ३४८०० | ४६०० | S – १६ | ४४९०० – १४२४०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२. | ९३०० – ३४८०० | ४८०० | S – १७ | ४७६०० – १५११०० |
| २३. | ९३०० – ३४८०० | ४९०० | S – १८ | ४९१०० – १५५८०० |
| २४. | ९३०० – ३४८०० | ५००० | S – १८ | ४९१०० – १५५८०० |
| २५. | ९३०० – ३४८०० | ५४०० | S – २० | ५६१०० – १७७५०० |
| २६. | १५६०० – ३९१०० | ५००० | S – १९ | ५५१०० – १७५१०० |
| २७. | १५६०० – ३९१०० | ५४०० | S – २० | ५६१०० – १७७५०० |
| २८. | १५६०० – ३९१०० | ५५०० | S – २१ | ५७१०० – १८०८०० |
| २९. | १५६०० – ३९१०० | ५७०० | S – २२ | ६०००० – १९०८०० |
| ३०. | १५६०० – ३९१०० | ५८०० | S – २२ | ६०००० – १९०८०० |
| ३१. | १५६०० – ३९१०० | ६६०० | S – २३ | ६७७०० – २०८७०० |
| ३२. | १५६०० – ३९१०० | ६९०० | S – २४ | ७११०० – २११९०० |
| ३३. | १५६०० – ३९१०० | ७६०० | S – २५ | ७८८०० – २०९२०० |
| ३४. | १५६०० – ३९१०० | ७९०० | S – २६ | ८२२०० – २११५०० |
| ३५. | ३७४०० – ६७००० | ८७०० | S – २७ | ११८५०० – २१४१०० |
| ३६. | ३७४०० – ६७००० | ८८०० | S – २८ | १२४८०० – २१२४०० |
| ३७. | ३७४०० – ६७००० | ८९०० | S – २९ | १३११०० – २१६६०० |
| ३८. | ३७४०० – ६७००० | १०००० | S – ३० | १४४२०० – २१८२०० |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी -१८

-----------------------------विभाग

(शासन अधिसुचना , वित्त विभाग क्रमांक वेपूर २०१९ /प्र.क्र.१ /सेवा-९
दिनांक ३० जानेवारी, २०१९ चे सहपत्र )
जोडपत्र तीन
विकल्पाचा नमुना
[पहानियम६(१) ]

१ (अ) कर्मचा-यांचे नाव * श्री/श्रीमती /कुमारी ------------------------

(ब) धारण केलेले पद -----------------------------------*कायम /स्थानापन्न

(क) विद्यमान वेतन सरंचना : वेतन बँड पीबी- ** रुपये ---- ------------

:(ग्रेड वेतन रुपये)----------------------------

(ड) सुधारित वेतन सरंचना : वेतन स्तर एस - *** ---- ------------रुपये -------------------

(ई ) कार्यालयाचे नाव -----------------------

२ मी * श्री /श्रीमती/कुमारी ---------------------------

१) १ जानेवारी २०१६ पासून सुधारित वेतन सरंचनेची निवड करतो / करते.

२) मी धारण करीत असलेल्या पदाची विद्यमान वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे चालू ठेवण्याची निवड करतो / करते.

*माझ्या पुढील वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत ---

*माझे वेतन रुपये ----- ----------------------------------पर्यंत वाढवणा-या नंतरच्या वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत.

* मी पद रिक्त करेपर्यंत किंवा विद्यमान वेतनश्रेणीत वेतन घेण्याचे बंद करेपर्यंत.

३. हा विकल्प अंतिम असून, त्यामध्ये या दिनांकानंतर सुधारणा करण्यात येणार नाही.

ठिकाण : सही --------------

दिनांक : नाव -----------------------------------

---

(केवळ कार्यालयाने भरावयाचे )

प्रमाणित करण्यात येते की, * कायम/स्थानापन्न पद धारण करीत असलेल्या

श्री/श्रीमती /कुमारी ---------------------------------------------------यांनी हा विकल्प, यथोचितरित्या स्वाक्षरीसह व विहित दिनांकापुर्वी मला सादर केला आहे.

ठिकाण : सही --------------

दिनांक : नाव --------------------------

कार्यालय प्रमुख

* लागु नसलेस ते खोडावे

**वेतन बँड क्रमांक नमूद करावा.

*** वेतन स्तर क्रमांक नमूद करावा.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी -१८

----------------------------विभाग

(शासन अधिसुचना , वित्त विभाग क्रमांक वेपूर २०१९ /प्र.क्र.१ /सेवा-९
दिनांक ३० जानेवारी, २०१९ चे सहपत्र व लेखा विभाग, पिंपरी चिंचवड मनपा
यांचेकडिल आदेश क्र.लेखा/१/कावि/ /२०१९ दि. / /२०१९)

जोडपत्र – चार

पहा नियम ६(२)(३)

वचन पत्र

मी, ----------------------------------------------------------------------असे वचन देतो की, महाराष्ट्र नागरी सेवा सुधारित वेतन ) नियम, २०१९ व लेखा विभाग यांचेकडील आदेश क्र. लेखा/१/कावि/ /२०१९ दि. / /२०१९ मधील तरतूदींशी विसंगत वेतननिश्चितीच्या परिणामी किंवा पुढे वेतन निश्चितीमध्ये विसंगती आढळून आल्यामुळे मला अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्याम ते भविष्यात मला प्रदान करण्यात येणा-या रक्कमेतून समायोजीत करुन किंवा इतर प्रकारे महापालिकेस परत करींन.

सही /-

नाव ------------------------------

पदनाम --------------------------

विभाग ---------------------------

# पिंपरी – चिंचवड महानगरपालिका , पिंपरी -४११०१८.

शासन परिपत्रक क्रमांक – वेपुर – २०१९ /प्र.क्र.८ / सेवा- ९, दिनांक – २०फेब्रवारी ,२०१९

जोडपत्र

ANNEXURE

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन)नियम ,२०१९ अन्वये वेतन निश्चितीबाबतचे विवरण पत्र

Statement of fixation fo Pay under maharashtra civil services (revised Pay ) Rule s , 2019

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नाव :<br>Name of the office : | |
| २. | महापालिका कर्मचा-यांचे नाव :<br>Name of the servant: | |
| ३. | (अ) दिनांक १ जानेवारी , २०१६ रोजी ज्या पदावर वेतन निश्चित करावयाचे आहे त्याचे पदनाम:<br>Designaion of the post in which Pay is to be fixed as on 1st january ,2016 | |
| | (ब)कायम / स्थानापन्न :<br>Substantive /Officiating : | |
| ४. | असुधारित वेतन संरचना (वेतनबँड आणि ग्रेड वेतन )किंवा वेतनश्रेणी :<br>Pre- revised Pay Band&GradePay of Scale | |
| ५. | दि. १ जानेवारी ,२०१६ रोजी असलेली विद्यमान वित्तलब्धी :<br>Existing emoluments as on 1st January 2016 | |
| | (अ)मुळ वेतन (वेतन ब्रँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन किंवा अनुज्ञेय श्रेणीतील मुळ वेतन)<br>BasicPay (Pay in the applicable Pay Band plus applicable GradePay or BasicPay in the applicable scale ) | |
| | (ब) दिनांक १ जानेवारी ,२०१६ रोजी मंजूर महागाई भत्ता<br>Dearness Allowance sanctioned as on 1st January ]2016 : | |
| | (क)एकूण वित्तलब्धी (अ) + (ब) :<br>Total Emoluments : | |
| ६. | असुधारित वेतन संरचनेतील दिनांक १ जानेवारी , २०१६ लगतपुर्वीचे मूळ वेतन ( वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन किंवा अनुज्ञेय श्रेणीतील मूळ वेतन):<br>BasicPay (Pay in the applicable Pay Band plus applicable Grade Pay or BasicPay in the applicable scale ) in the pre revised Pay structure immediately before 1st January , 2016 : | |
| ७. | अनुक्रमांक ४ येथील असुधारित वेतन संरचना ( वेतन बँड आणि ग्रेड वेतन) किंवा वेतनश्रेणीशी समकक्ष वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर :<br>Applicable level in Pay Matrix corresponding to Pay Band&GradePay or scale shown at Sr. No.4 : | |
| ८. | अनुक्रमांक ६ येथील मूळ वेतनास २.५७ ने गुणून येणारी रकम :<br>Amount arrived at by multiplying BasicPay as at Sr. No.6 by 2.57: | |
| ९. | अनुज्ञेय वेतन स्तराच्या सेलमधील अनुक्रमांक ८ येथील रकमेइतकी अथवा त्यापुढील रकम:<br>Amount in applicable cell in the level either equal to or just above the amount at sr.no.8 : | |
| १०. | अनुक्रमांक ९ नुसार येणारे सुधारित मूळ वेतन :<br>Revised BasicPay as per sr.no.9: | |
| ११. | वेतन एकवटण्याच्या परिणामी मंजूर वेतनवाढ(लागू असल्यास) (नियम ७ (अ) खालील पहिले परंतुक<br>Grant of Iincrement on account of Bunching of Pay (if applicable first proviso to Rule 7(A) | |
| १२ | नियम ७ अ खालील दुस-या परंतुकान्वये कुंठीततेमुळे मंजूर वेतनवाढ (लागू असल्यास ) | |

| | | |
|---|---|---|
| | Grantof lincrement on account of stagnation under second proviso to Rule 7( A)(if applicable) | |
| १३ | कनिष्ठ कर्मचा-यांइतके उंचावून दिलेले वेतन, असल्यास (नियम ७ खालील टीप ५ व ८)कनिष्ठ कर्मचा-यांचे नाव आणि वेतन स्पष्टपणे दर्शविण्यात यावे. :<br>Stepped up Pay with reference to the revised Pay of junior, if applicable (note -5 & 8 under Rule 7 )Name &Pay of the junior also be indicated distinctly. | |
| १४ | स्थानापन्न पदाचे वेतन कायम पदाच्या वेतनापेक्षा कमी निश्चित होत असेल अशा प्रकरणी कायम पदाच्या अनुषंगाने निश्चित होणारे सुधारित वेतन, असल्यास नियम ७ (२)<br>Revised Pay with reference to the substantive Pay in cases where the Pay fixed in the officiating post is lower than the Pay fixed in the substantive post, if applicable (Rule 7(2)) | |
| १५ | वैयक्तिक वेतन, असल्यास (नियम ७ खालील टीप ४ व ६ ) :<br>Personal Pay , if any (note 4 & 6 under Rule 7): | |
| १६ | दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी सुधारित वित्तलब्धी<br>Revised emoluments as on 1st January ,2016 | |
| | (अ)सुधारित वेतन<br>Revised Pay : | |
| | (ब) महागाई भत्ता दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी ०% सुधारित दराने ):<br>Dearness allowance (as per revised rate 0 % as on 1st January, 2016) | |
| | (क)एकूणवित्तलब्धी (अ) + (ब)<br>Total Emoluments :- | |
| १७ | पुढील वेतनवाढीचा दिनांक (नियम १० )आणि वेतनवाढी नंतरचे वेतन:<br>वेतनवाढीचा दिनांक :<br>वेतन मॅट्रिक्समधील अनुज्ञेय वेतन स्तरामध्ये वेतनवाढीनंतरचे वेतन:<br>Date of next lincrement (Rule 10) and Pay after grant of lincrement : date of lincrement :<br>Pay after lincrement in applicable level of Pay matrix: | |
| १८ | इतर आनुषंगिक माहिती :<br>Any other relevant information : | |

दिनांक :

Date :

कार्यालयप्रमुखाचे पदनाम व स्वाक्षरी (शिक्क्यासहीत )

signature and designation of the head of office (with stamp)

# पिंपरी – चिंचवड महानगरपालिका , पिंपरी -४११०१८.

शासन परिपत्रक क्रमांक – वेपुर – २०१९ /प्र.क्र.८ / सेवा- ९, दिनांक – २०फेब्रवारी ,२०१९

जोडपत्र

ANNEXURE

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन)नियम ,२०१९ अन्वये वेतन निश्चितीबाबतचे विवरण पत्र

Statement of fixation fo Pay under maharashtra civil services (revised Pay ) Rule s , 2019

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| १. | कार्यालयाचे नाव :<br>Name of the office : | | |
| २. | महापालिका कर्मचा-यांचे नाव :<br>Name of the servant: | | |
| ३. | (अ) दिनांक १ जानेवारी , २०१६ रोजी ज्या पदावर वेतन निश्चित करावयाचे आहे त्याचे पदनाम:<br>Designaion of the post in which Pay is to be fixed as on 1st january,2016 | | |
| | (ब)कायम / स्थानापन्न :<br>Substantive /Officiating : | | |
| ४. | असुधारित वेतन संरचना (वेतनबँड आणि ग्रेड वेतन )किंवा वेतनश्रेणी :<br>Pre- revised Pay Band & Grade Pay of Scale | | |
| ५. | दि. १ जानेवारी ,२०१६ रोजी असलेली विद्यमान वित्तलब्धी :<br>Existing emoluments as on 1st January 2016 | | |
| | (अ)मुळ वेतन (वेतन ब्रँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन किंवा अनुज्ञेय श्रेणीतील मुळ वेतन)<br>Basic Pay (Pay in the applicable Pay Band plus applicable Grade Pay or Basic Pay in the applicable scale ) | | |
| | (ब) दिनांक १ जानेवारी ,२०१६ रोजी मंजूर महागाई भत्ता<br>Dearness Allowance sanctioned as on 1st January ]2016 : | | |
| | (क)एकूण वित्तलब्धी (अ) + (ब) :<br>Total Emoluments : | | |
| ६. | असुधारित वेतन संरचनेतील दिनांक १ जानेवारी , २०१६ लगतपुर्वीचे मूळ वेतन ( वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन किंवा अनुज्ञेय श्रेणीतील मूळ वेतन):<br>Basic Pay (Pay in the applicable Pay Band plus applicable frade Pay or Basic Pay in the applicable scale ) in the pre revised Pay structure immediately before 1st January , 2016 : | | |
| ७. | अनुक्रमांक ४ येथील असुधारित वेतन संरचना ( वेतन बँड आणि ग्रेड वेतन )किंवा वेतनश्रेणीशी समकक्ष वेतन | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | मॅट्रीक्समधील वेतन स्तर :<br>Applicable level in Pay Matrix corresponding to Pay Band & Grade Pay or scale shown at Sr. No.4 : | | |
| ८. | अनुक्रमांक ६ येथील मूळ वेतनास २.५७ ने गुणून येणारी रकम :<br>Amount arrived at by multiplying Basic Pay as at Sr. No.6 by 2.57: | | |
| ९. | अनुज्ञेय वेतन स्तराच्या सेलमधील अनुक्रमांक ८ येथील रकमेइतकी अथवा त्यापुढील रकम:<br>Amount in applicable cell in the level either equal to or just above the amount at sr.no.8 : | | |
| १०. | अनुक्रमांक ९ नुसार येणारे सुधारित मूळ वेतन :<br>Revised Basic Pay as per sr.no.9: | | |
| ११. | वेतन एकवटण्याच्या परिणामी मंजूर वेतनवाढ(लागू असल्यास) (नियम ७ (अ) खालील पहिले परंतुक<br>Grant of Iincrement on account of Bunching of Pay (if applicable first proviso to Rule 7(A) | | |
| १२ | नियम ७ अ खालील दुस-या परंतुकान्वये कुंठीततेमुळे मंजूर वेतनवाढ (लागू असल्यास )<br>Grantof Iincrement on account of stagnation under second proviso to Rule 7( A)(if applicable) | | |
| १३ | कनिष्ठ कर्मचा-यांइतके उंचावून दिलेले वेतन, असल्यास (नियम ७ खालील टीप ५ व ८)कनिष्ठ कर्मचा-यांचे नाव आणि वेतन स्पष्टपणे दर्शविण्यात यावे. :<br>Stepped up Pay with reference to the revised Pay of junior, if applicable (note -5 & 8 under Rule 7 )Name & Pay of the junior also be indicated distinctly. | | |
| १४ | स्थानापन्न पदाचे वेतन कायम पदाच्या वेतनापेक्षा कमी निश्चित होत असेल अशा प्रकरणी कायम पदाच्या अनुषंगाने निश्चित होणारे सुधारित वेतन, असल्यास नियम ७ (२)<br>Revised Pay with reference to the substantive Pay in cases where the Pay fixed in the officiating post is lower than the Pay fixed in the substantive post, if applicable (Rule 7(2)) | | |
| १५ | वैयक्तिक वेतन, असल्यास (नियम ७ खालील टीप ४ व ६ ) :<br>Personal Pay , if any (note 4 & 6 under Rule 7): | | |
| १६ | दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी सुधारित वित्तलब्धी<br>Revised emoluments as on 1st January ,2016 | | |
| | (अ)सुधारित वेतन<br>Revised Pay : | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | (ब) महागाई भत्ता दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी % सुधारित दराने ):<br>Dearness allowance (as per revised rate % as on 1st January, 2016) | | |
| | क)एकूणवित्तलब्धी (अ) + (ब)<br>Total Emoluments :-s | | |
| १७ | पुढील वेतनवाढीचा दिनांक (नियम १०) आणि वेतनवाढी नंतरचे वेतन:<br>वेतनवाढीचा दिनांक :<br>वेतन मॅट्रिक्समधील अनुज्ञेय वेतन स्तरामध्ये वेतनवाढीनंतरचे वेतन:<br>Date of next Iincrement (Rule 10) and Pay after grant of Iincrement : date of Iincrement :<br>Pay after Iincrement in applicable level of Pay matrix: | | |
| १८ | इतर आनुषंगिक माहिती :<br>Any other relevant information : | | |

दिनांक :

Date :

कार्यालयप्रमुखाचे पदनाम व स्वाक्षरी (शिक्क्यासहीत )

signature and designation of the head of office (with stamp)

# सातवा वेतन आयोग वेतन निश्चिती

(सेवा  नोंद पुस्तकात नोंद)

१) म.ना.से. (सुधारितवेतन) नियम ,२०१९शासन अधिसुचना क्रमांक वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा -९ दि.३० जानेवारी २०१९.

२) पि.चि.मनपा, लेखा विभाग, आदेश क्र लेखा /  /कावि/  /२०१९ दि.  /  /२०१९
अन्वये श्री/श्रीमती ---------------------------------------------------------------पदनाम ---------------याची दि.१/१/२०१६ रोजीचे पदाची विद्यमान वेतनश्रेणी PB (       )र.रुपये -------------------------------------- वेतनबँन्ड + ग्रेडवेतन ------------------------------------नुसार सबंधितांनी दिलेल्या विकल्पाप्रमाणे सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये ) पे स्तर (S- ) र.रुपये -----------------------------------------------------------------------या कार्यालयाचे आदेश क्र ------------------------------------------ दि.   /   /२०   अन्वये खालीलप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

टिप – संबधितांची नियुक्ती /पदोन्नती/श्रेणीवाढ दि.  /  /२०  आहे. त्यामुळे दि.  /  /२०  रोजी वेतनवाढ देय होईल.

| विदयमान वेतनश्रेणी, वेतन व दिनांक | सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये वेतनश्रेणी, वेतन व दिनांक | पुढील वार्षिक वेतनवाढ दिनांक व वेतन मॅट्रिक्समधील सुधारित वेतन (र.रुपये) | |
|---|---|---|---|
| (सहाव्या वेतन आयोगानुसार ) | (सातव्या वेतन आयोगानुसार ) | १ जानेवारी वेतनवाढ | १ जुलै वेतनवाढ |
| वेतन श्रेणी | वेतनश्रेणी स्तर (S ) | ०१.०१. | ०१.०७. |
| | | ०१.०१. | ०१.०७. |
| | | ०१.०१. | ०१.०७. |
| | | ०१.०१. | ०१.०७. |
| दि.१/१/२०१६ | दि.१/१/२०१६ | ०१.०१. | ०१.०७. |
| | | | |

कार्यालयप्रमुखाचे पदनाम व स्वाक्षरी (शिक्क्यासहीत )

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी ४११०१८.

कर्मचारी वेतनातील सुधारित भत्तेवाढ

**परिशिष्ट "ब"**

**महागाई भत्ता**

| अ.क्र. | कालावधी | विद्यमान दर (सहाव्या वेतन आयोगानुसार) | सुधारित दर (सातव्या वेतन आयोगानुसार) |
|---|---|---|---|
| १ | १/०१/२०१६ ते ३०/०६/२०१६ | १२५ % | ० % |
| २ | १/०७/२०१६ ते ३१/१२/२०१६ | १३२ % | २ % |
| ३ | १/०१/२०१७ ते ३०/०६/२०१७ | १३६ % | ४ % |
| ४ | १/०७/२०१७ ते ३१/१२/२०१७ | १३९ % | ५ % |
| ५ | १/०१/२०१८ ते ३०/०६/२०१८ | १४२ % | ७ % |
| ६ | १/०७/२०१८ ते ३१/१२/२०१८ | १४८ % | ९ % |
| ७ | १/०१/२०१९ ते ३०/०६/२०१९ | १५४ % | १२ % |
| ८ | १/०७/२०१९ पासून | १६४% | १७% |

**घरभाडे भत्ता**

| अ.क्र. | कालावधी | विद्यमान दर (सहाव्या वेतन आयोगानुसार) | सुधारित दर (सातव्या वेतन आयोगानुसार) |
|---|---|---|---|
| १ | १/०१/२०१६ ते ३०/११/२०१६ | २० % | ० % |
| २ | १/१२/२०१६ ते ३१/१२/२०१८ | ३० % | ० % |
| ३ | १/०१/२०१९ पासून | ३० % | २४ % |

Our Logo

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

# पिंपरी ४११ ०१८

# * शासन निर्णय *

## वेतननिश्चिती, पे मॅट्रीक्स, घरभाडे भत्ता, वाहतुक भत्ता, पुरक भत्ता, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना

महाराष्ट्र शासन

# वित्त विभाग

# GOVERNMENT OF MAHARASHTRA
# FINANCE DEPARTMENT

# महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९

# MAHARASHTRA CIVIL SERVICES (REVISED PAY) RULES, 2019

**2019**

# वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी २०१९

## अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक वेपुर २०१९/प्र. क्र. १/सेवा-९.- भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल पुढील नियम करीत आहेत :-

१. **संक्षिप्त नाव आणि प्रारंभ.-**

(१) या नियमांस महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ असे संबोधण्यात येईल.

(२) ते दिनांक १ जानेवारी २०१६ पासून अंमलात आले आहेत असे मानण्यात येईल.

२. **हे नियम लागू होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचे प्रवर्ग.-**

(१) या नियमांद्वारे किंवा तद्नुसार अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करुन, हे नियम महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या नियमकारी नियंत्रणाखालील सर्व व्यक्तींना लागू होतील.

(२) हे नियम खालील शासकीय कर्मचाऱ्यांना लागू होणार नाहीत-

(अ) पूर्णकालिक कामावर नसलेले शासकीय कर्मचारी;

(ब) एकत्रित वेतनदरांवरील शासकीय कर्मचारी;

(क) कंत्राटात अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करुन कंत्राटी कामावर असलेले शासकीय कर्मचारी;

(ड) आकस्मिक खर्चामधून ज्यांना वेतन दिले जाते असे शासकीय कर्मचारी;

(इ) जे नियमित समयश्रेणीवर नाहीत आणि ज्यांच्या वेतनश्रेणी नियमित आस्थापनेवरील तत्सम पदांच्या वेतनश्रेणीशी समान नाहीत असे कार्यव्ययी आस्थापनेवरील शासकीय कर्मचारी;

(फ) रोजंदारीवरील कर्मचारी;

(ग) जे दिनांक ३१ डिसेंबर २०१५ रोजी किंवा तत्पूर्वी सेवानिवृत्त झाले आणि ज्यांना सेवानिवृत्तिनंतर त्या दिनांकास पुन्हा नियुक्त करण्यात आले आणि ज्यांच्या

सेवानिवृत्तिनंतरच्या पुनर्नियुक्तीचा कालावधी त्या दिनांकानंतर वाढवून दिलेला आहे असे शासकीय कर्मचारी;

(ह) ज्यांना या नियमांच्या सर्व अथवा विशिष्ट तरतूदींच्या प्रवर्तनापासून राज्यपालांनी खास करुन पूर्णत: किंवा अंशत: वगळले आहे असे शासकीय कर्मचारी.

३. **व्याख्या.-**

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत-

(१) "जोडपत्र" म्हणजे या नियमांसोबत जोडलेली जोडपत्रे;

(२) "विद्यमान मूळ वेतन" म्हणजे विहित वेतन बँडमध्ये आहरित करीत असलेले वेतन अधिक अनुज्ञेय ग्रेड वेतन किंवा विद्यमान श्रेणीतील वेतन परंतु त्यामध्ये विशेष वेतन इत्यादी सारख्या वेतनाचा समावेश नसेल;

(३) "विद्यमान वेतनबँड आणि ग्रेड वेतन " म्हणजे १ जानेवारी २०१६ लगतपूर्वी शासकीय कर्मचाऱ्याने, कायम असो, किंवा स्थानापन्न नात्याने असो धारण केलेल्या पदाला लागू असलेला वेतनबँड आणि ग्रेड वेतन;

(४) "विद्यमान श्रेणी" म्हणजे १ जानेवारी २०१६ लगतपूर्वी शासकीय कर्मचाऱ्याने, कायम असो, किंवा स्थानापत्र नात्याने असो धारण केलेल्या पदाला लागू असलेली वेतनश्रेणी किंवा, यथास्थिती, त्याला लागू असलेली वैयक्तिक श्रेणी;

(५) "विद्यमान वेतन संरचना " म्हणजे १ जानेवारी २०१६ लगतपूर्वी शासकीय कर्मचाऱ्याने, कायम असो, किंवा स्थानापत्र नात्याने असो धारण केलेल्या पदाला लागू असलेला वेतनबँड आणि ग्रेड वेतन अथवा वेतनश्रेणी किंवा, यथास्थिती, त्याला लागू असलेली वैयक्तिक श्रेणी;

**स्पष्टीकरण.-** जो शासकीय कर्मचारी १ जानेवारी २०१६ रोजी भारताबाहेर प्रतिनियुक्तीवर किंवा रजेवर किंवा स्वीयेतर सेवेत होता, किंवा जो वरच्या पदावर स्थानापन्न नसता तर त्या तारखेस एका किंवा अधिक खालच्या पदांवर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिला असता अशा कर्मचाऱ्याच्या बाबतीत "विद्यमान मूळ वेतन," "विद्यमान वेतनबँड आणि ग्रेड वेतन" आणि "विद्यमान श्रेणी" यामध्ये तो भारताबाहेर प्रतिनियुक्तीवर किंवा रजेवर किंवा स्वीयेतर सेवेत नसता किंवा यथास्थिती, वरच्या पदावर स्थानापन्न म्हणून नसता तर, त्याने जे पद

धारण केले असते त्या पदाचे मूळ वेतन, वेतनबँड आणि ग्रेड वेतन आणि वेतनश्रेणीचा समावेश होतो.

**टीप.**- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी वगळून अंमलात असलेल्या वेतन संरचनांची सूची जोडपत्र-एक मध्ये (इंग्रजी भाषांतरासोबत) दिली आहे;

(६) "विद्यमान वित्तलब्धी" मध्ये (i) विद्यमान मूळ वेतन, आणि (ii) मूळ वेतनावरील समुचित महागाई भत्ता यांचा समावेश असेल;

(७) "वेतन मॅट्रिक्स" म्हणजे या नियमांसोबतच्या (इंग्रजी भाषांतरासोबत) जोडपत्र — दोन मधील मॅट्रिक्स ज्यामध्ये विद्यमान वेतनबँड आणि ग्रेड वेतनाशी निगडीत वेतन स्तर उभ्या स्तंभातील सेलमध्ये दर्शविले आहेत;

(८) "स्तर" म्हणजे नियमांसोबतच्या (इंग्रजी भाषांतरासोबत) जोडपत्र - दोन मधील विद्यमान वेतनबँड आणि ग्रेड वेतनाशी निगडीत वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर, किंवा वेतनश्रेणी;

(९) "वेतन स्तरामधील वेतन" या नियमांसोबतच्या (इंग्रजी भाषांतरासोबत) जोडपत्र - दोन मध्ये दर्शविलेल्या वेतन स्तराच्या विवक्षित सेलमध्ये आहरण करीत असलेले वेतन;

(१०) "सुधारित वेतन संरचना" म्हणजे एखाद्या पदासंदर्भात वेगळ्याने सुधारित वेतन स्तर किंवा वेतनश्रेणी अधिसूचीत करण्यात आली असेल ती खेरीज करुन विद्यमान वेतनबँड आणि ग्रेड वेतनाशी निगडीत वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर.

**टीप.**- सुधारित वेतन संरचना जोडपत्र - दोन मध्ये (इंग्रजी भाषांतरासोबत) दिली आहे;

(११) "सुधारित वेतन स्तर किंवा वेतनश्रेणी" म्हणजे एखाद्या पदासंदर्भात वेगळ्याने सुधारित वेतन स्तर किंवा वेतनश्रेणी अधिसूचीत करण्यात आली असेल ती खेरीज करुन अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या पदासमोर स्तंभ (५) मध्ये दर्शविण्यात आलेला वेतन स्तर, किंवा वेतनश्रेणी;

(१२) "सुधारित मूळ वेतन" म्हणजे विहित वेतन स्तरामध्ये आहरण करीत असलेले वेतन परंतु त्यामध्ये विशेष वेतन इत्यादी सारख्या वेतनाचा समावेश नसेल;

(१३) "सुधारित वित्तलब्धी" म्हणजे सुधारित वेतन संरचनेत शासकीय कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असलेल्या वेतन स्तरातील (i) मूळ वेतन; आणि (ii) मूळ वेतनावरील समुचित महागाई भत्ता यांचा समावेश असेल;

(१४) "अनुसूची" म्हणजे या नियमांना जोडलेली अनुसूची.

४. **पदांची वेतनश्रेणी किंवा वेतन संरचना.-** या नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक पदाचा वेतन स्तर त्या पदासमोर स्तंभ (५) मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.

५. **सुधारित वेतन संरचनेमध्ये वेतन काढणे.-** या नियमांत, अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करुन शासकीय कर्मचारी, ज्या पदावर त्यास नेमले असेल त्या पदाला लागू असलेल्या सुधारित वेतन संरचनेतील वेतन स्तरामध्ये वेतन घेईल.

परंतु, ज्या दिनांकास विद्यमान वेतन संरचनेत लगतनंतरची किंवा पुढची कोणतीही वेतनवाढ त्याला देय होईल त्या तारखेपर्यंत किंवा तो आपले पद रिक्त करेपर्यंत किंवा त्या वेतन संरचनेत वेतन घेणे बंद होईपर्यंत, विद्यमान वेतन संरचनेत वेतन चालू ठेवण्याचा शासकीय कर्मचाऱ्यास विकल्प देता येईल :

परंतु, आणखी असे की, दिनांक १ जानेवारी २०१६ आणि हे नियम अधिसूचित करण्याच्या दिनांकाच्या दरम्यान पदोन्नती, पदाची श्रेणीवाढ इत्यादीमुळे उच्च वेतन संरचना घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास पदोन्नतीच्या, पदाच्या श्रेणीवाढीच्या दिनांकापासून सुधारित वेतन संरचनेची निवड करण्याचा विकल्प देता येईल.

**स्पष्टीकरण १.-** या नियमांच्या परंतुकांनुसार विद्यमान वेतन संरचना ठेवण्याचा विकल्प केवळ एका विद्यमान वेतन संरचनेबाबतच अनुज्ञेय राहील.

**स्पष्टीकरण २.-** दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर एखाद्या पदावर, शासकीय सेवेत प्रथमच किंवा दुसऱ्या पदावरुन बदली करुन नेमलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यास उपरोक्त विकल्प अनुज्ञेय असणार नाही आणि त्याला केवळ सुधारित वेतन संरचनेनुसारच वेतन मिळेल.

**स्पष्टीकरण ३.-** जेव्हा शासकीय कर्मचारी, नियमितपणे स्थानापन्न म्हणून त्याने धारण केलेल्या पदाच्या बाबतीत, त्या पदाला लागू असलेल्या कोणत्याही अन्य नियमांन्वये किंवा आदेशानुसार विद्यमान वेतन संरचनेतील वेतनाच्या विनियमनासाठी या नियमाच्या परंतुकानुसार ती सुधारित वेतन संरचना कायम ठेवण्याचा विकल्प देत असेल तेव्हा, ज्या कायम पदावर त्याचा धारणाधिकार असेल किंवा धारणाधिकार तहकूब झाला नसता तर त्याचा धारणाधिकार राहिला असता, त्या पदाच्या बाबतीत त्याने विद्यमान वेतन संरचना कायम ठेवली असती तर त्याने घेतले असते ते कायम वेतन, किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही आदेशानुसार कायम वेतनाचे स्वरुप प्राप्त झालेले स्थानापन्न पदाचे वेतन, यापैकी जे अधिक असेल ते त्याचे कायम वेतन राहील.

६. **विकल्प देणे.-**

(१) नियम ५ च्या परंतुकानुसार द्यावयाचा विकल्प, या नियमांना जोडलेल्या जोडपत्र- तीन मधील नमुन्यात लेखी द्यावा लागेल. हा विकल्प पोटनियम (२) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यास, ही अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत किंवा या नियमांत केलेल्या कोणत्याही सुधारणेमुळे विद्यमान वेतन संरचना सुधारण्यात आली असेल तेव्हा, त्या प्रकरणी अशा सुधारणेच्या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत पोहचेल अशा बेताने पाठविण्यात यावा:

परंतु,-

(एक) अशा प्रसिद्धीच्या दिनांकास किंवा यथास्थिती अशा आदेशाच्या दिनांकास शासकीय कर्मचारी भारताबाहेर रजेवर, किंवा प्रतिनियुक्तीवर किंवा स्वीयेतर सेवेत किंवा युध्दसेवेत असेल तेव्हा त्या बाबतीत अशा कर्मचाऱ्याने भारतात आपल्या पदाचा कार्यभार घेण्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उक्त प्राधिकाऱ्यास पोहचेल अशा रीतीने उक्त विकल्प द्यावा, आणि

(दोन) दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी शासकीय कर्मचारी निलंबनाधीन असेल तेव्हा, त्याचा कामावर परत येण्याचा दिनांक या पोटनियमांत विहित केलेल्या दिनांकानंतरचा असेल तर, त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्यास विकल्प देता येईल.

(२) शासकीय कर्मचारी हे आपला विकल्प या नियमांसोबतच्या जोडपत्र - तीन मधील नमुन्यात कार्यालय प्रमुखास कळवतील; आणि त्यासोबतच या नियमांसोबतच्या जोडपत्र - चार मधील नमुन्यात बंधपत्र सादर करतील.

(३) विकल्पासंबंधीची सूचना पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत मिळाली नाही तर, शासकीय कर्मचाऱ्याने १ जानेवारी २०१६ रोजी व त्याच दिवसापासून सुधारित वेतन संरचनेची निवड केली आहे असे समजण्यात येईल. अशा प्रकरणी कार्यालय प्रमुख अशा शासकीय कर्मचाऱ्यांकडून या नियमांसोबतच्या जोडपत्र - चार मधील नमुन्यातील बंधपत्र प्राप्त करून घेतील.

(४) एकदा दिलेला विकल्प अंतिम असेल.

**टीप १.-** १ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर ज्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आणि मृत्यु, मंजूर पदांच्या समाप्तीनंतरची कार्यमुक्ती, राजीनामा, शिस्तभंगाच्या कारणावरुन बडतर्फी किंवा कार्यमुक्ती यामुळे विहित कालमर्यादेत ज्यांना विकल्प देता आला नाही अशा व्यक्ती या नियमांचे लाभ मिळण्यास पात्र आहेत.

**टीप २.-** १ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर मृत्यु पावल्यामुळे ज्यांना विहित कालमर्यादेत विकल्प देता आला नाही, त्यांनी १ जानेवारी २०१६ रोजी व त्याच दिवसापासून किंवा सुधारित वेतन संरचना अधिक अनुकूल असल्यास त्यांच्या अवलंबितांना जास्तीत जास्त लाभदायक असेल अशा नंतरच्या तारखेपासून सुधारित वेतन संरचनेची निवड केली आहे, असे मानले जाईल. अशा प्रकरणांत थकबाकी प्रदान करण्याची आवश्यक कार्यवाही कार्यालय प्रमुखाने करावी:

परंतु, मृत कर्मचाऱ्याच्या थकबाकी मिळण्यास पात्र असलेल्या अबलंबितांकडून कार्यालय प्रमुख या नियमांसोबतच्या जोडपत्र - चार मधील नमुन्यातील बंधपत्र प्राप्त करून घेतील.

**टीप ३.-** १ जानेवारी २०१६ रोजी अर्जित रजेवर किंवा रजा वेतन प्रदेय असणाऱ्या इतर कोणत्याही रजेवर असलेले शासकीय कर्मचारी या नियमांचा लाभ मिळण्यास पात्र असतील.

**७. सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतननिश्चिती.-**

(१) १ जानेवारी २०१६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्याबाबत ज्याने नियम ६ च्या पोटनियम (१) अनुसार विकल्प दिला आहे किंवा नियम ६ च्या पोटनियम (३) अनुसार विकल्प दिल्याचे मानण्यात आले आहे अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत, राज्यपालांनी विशेष आदेशाद्वारे अन्यथा निदेश दिले नसल्यास, त्याचे प्रारंभिक वेतन, ज्या कायम पदावर त्याचा धारणाधिकार आहे किंवा तो धारणाधिकार तहकूब झाला नसता तर तो राहीला असता, त्या पदाच्या कायम वेतनाच्या बाबतीत आणि त्याने धारण केलेल्या स्थानापन्न पदाच्या बाबतीत, खालीलप्रमाणे स्वतंत्रपणे निश्चित केले जाईल:-

**(अ) सर्व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत :-**

(एक) १ जानेवारी २०१६ लगतपूर्वीच्या मूळ वेतनास २.५७ ने गुणून पूर्णांकित केलेली रक्कम संबंधित सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये अनुज्ञेय वेतन स्तरामधील सेलमध्ये (Cell) असल्यास ती रक्कम सुधारित वेतन ठरेल. जर ती रक्कम अनुज्ञेय वेतन स्तरामधील सेलमध्ये नसेल तर सदर पूर्णांकित रकमेच्या लगतच्या पुढील सेलमधील रक्कम सुधारित वेतन ठरेल.

(दोन) जर वरील (एक) प्रमाणे येणाऱ्या रकमेपेक्षा अनुज्ञेय सुधारित वेतन संरचनेच्या स्तरातील किमान वेतन अथवा पहिल्या सेलमधील रक्कम जास्त असेल तर त्या स्तारातील किमान वेतनावर अथवा पहिल्या सेलमधील वेतनावर वेतन निश्चित केले जाईल:

परंतु, वरीलप्रमाणे वेतननिश्चिती करताना विद्यमान वेतन संरचनेत यथास्थिती, वेतनबँड आणि ग्रेड वेतन किंवा श्रेणीमध्ये लागोपाठ दोन किंवा त्याहून अधिक टप्प्यांवर वेतन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन जेव्हा एकवटते म्हणजेच, वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तरामध्ये एकाच टप्प्यावर निश्चित होते; तेव्हा विद्यमान वेतन संरचनेतील एकवटणाऱ्या प्रत्येक दोन टप्प्यांना सुधारित वेतन संरचनेतील वेतन स्तरामध्ये एक याप्रमाणे वेतनवाढ देण्यात येईल आणि विद्यमान वेतन संरचनेत जास्त वेतन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन अनुज्ञेय वेतन स्तरातील पुढील सेलमध्ये निश्चित करण्यात येईल. त्यानंतर पुढील वेतनवाढ मंजूर करण्यासाठी नियम १० मधील तरतूदी लागू राहतील.

**स्पष्टीकरण.-** वरील परंतुकाच्या प्रयोजनार्थ, दोन शासकीय कर्मचाऱ्यांच्या विद्यमान वेतन संरचनेतील (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) वेतनांपैकी उच्च वेतन हे निम्न वेतनापेक्षा किमान ३% पेक्षा अधिक असेल तर ते दोन वेतन टप्पे ठरतील; जेथे हा फरक ३% पेक्षा कमी असेल त्या प्रकरणी हा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर १२०९/ प्र.क्र.२७ / सेवा ९, दिनांक २२ एप्रिल २००९ अन्वये प्रकाशित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या (इंग्रजी भाषांतरासोबत) जोडपत्र - तीन मध्ये दर्शविलेल्या विद्यमान वेतन संरचनेतील (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) नियुक्तीच्या किमान वेतनापेक्षा कमी असणारे सर्व वेतन टप्पे, वेतनांचे एकवटणे निश्चित करण्यासाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

परंतु आणखी असे की, जे कर्मचारी १ जानेवारी २०१६ रोजी विद्यमान वेतन संरचनेतील वेतनबँडच्या अथवा वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर दोन वर्षे वा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी कुंठित झाले असतील, अशा प्रकरणी १ जानेवारी २०१६ रोजी सुधारित वेतन संरचनेत कुंठिततेच्या प्रत्येकी दोन वर्षांसाठी एक वेतनवाढ देण्यात येईल. मात्र अशी वेतनवाढ (ढी) दिल्यामुळे सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तराच्या कमाल टप्प्यापेक्षा अधिक वेतन अनुज्ञेय असणार नाही. त्यानंतर पुढील वेतनवाढ मंजूर करण्यासाठी नियम १० मधील तरतूदी लागू राहतील.

(ब) विद्यमान वेतनश्रेणीतील वेतनाबरोबर विशेष वेतन अथवा भत्ता मिळणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत, जेथे सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तराबरोबर विशेष वेतन अथवा भत्ता अनुज्ञेय करण्यात आला नाही, त्याप्रकरणी सुधारित वेतन संरचनेत वरील खंड (अ) च्या तरतूदींनुसार वेतन निश्चित करण्यात येईल.

(क) शासकीय कर्मचाऱ्यास विद्यमान वेतनश्रेणीतील वेतनाबरोबर अन्य कोणत्याही नामाभिधानाने विशेष वेतन अथवा भत्ता मिळत असेल आणि सुधारित वेतन संरचनेत विशेष वेतन अथवा भत्ता पूर्वीच्याच अथवा सुधारित दराने अनुज्ञेय करण्यात आला असेल तर, त्याप्रकरणी सुधारित वेतन संरचनेत वरील खंड (अ) च्या तरतुदींनुसार वेतन निश्चित करण्यात येईल.

**टीप १.-** (एक) १ जानेवारी २०१६ रोजी रजा वेतन प्रदेय रजेवर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास सुधारित वेतन संरचना १ जानेवारी २०१६ अथवा विकल्पानुसार सुधारित वेतन संरचना स्वीकृतीच्या दिनांकापासून लागू होईल. तसेच, १ जानेवारी २०१६ रोजी अध्ययन रजेवर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास या नियमांचा लाभ १ जानेवारी २०१६ अथवा विकल्पानुसार सुधारित वेतन संरचना स्वीकृतीच्या दिनांकापासून लागू होईल.

(दोन) १ जानेवारी २०१६ पूर्वी वैद्यकीय कारणांस्तव असाधारण रजेवर असलेल्या आणि कार्यालयात रूजू न होता १ जानेवारी २०१६ रोजी अथवा त्यानंतर नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या किंवा मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन, लागू असणाऱ्या नियमांन्वये केवळ अनुज्ञेय सेवानिवृत्तिवेतनविषयक लाभ मंजूर करण्यासाठी या नियमानुसार सुधारित वेतन संरचनेत काल्पनिकरित्या निश्चित करण्यात येईल, मात्र सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चितीच्या परिणामी त्यास कोणतीही थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

(तीन) १ जानेवारी २०१६ पूर्वी वैद्यकीय कारणांखेरीज अन्य कारणांस्तव असाधारण रजेवर असलेल्या आणि कार्यालयात रूजू न होता १ जानेवारी २०१६ रोजी अथवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास या नियमांचे लाभ अनुज्ञेय असणार नाहीत. तथापि, लागू असणाऱ्या नियमांन्वये अनुज्ञेय सेवानिवृत्तिवेतनविषयक लाभ असुधारित वेतन संरचनेनुसार देण्यात येतील.

**टीप २. -** निलंबनाधीन असलेला शासकीय कर्मचारी विद्यमान वेतन संरचनेतच निर्वाह भत्ता आहरित करील आणि सुधारित वेतन संरचनेतील त्याचे वेतन, त्याच्या विरुद्ध सुरु असलेल्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीवरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहील.

**टीप ३. -** जेव्हा, कायम पद धारण करणारा शासकीय कर्मचारी नियमितपणे वरच्या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत असेल आणि या दोन्ही पदांना लागू असलेल्या वेतन संरचना वेतन मॅट्रिक्समधील एकाच वेतन स्तरामध्ये विलीन झाल्या असतील तेव्हा या पोटनियमानुसार केवळ स्थानापन्न पदाच्या संदर्भात वेतन निश्चित केले जाईल आणि असे निश्चित केलेले वेतन कायम वेतन म्हणून मानले जाईल.

वेगवेगळ्या विद्यमान वेतन संरचनांना एकच सुधारित वेतन संरचना लागू असलेली पदे स्थानापन्न नात्याने धारण करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास, या टीपेच्या तरतूदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

**टीप ४.-** जेव्हा, शासकीय कर्मचाऱ्याच्या विद्यमान वित्तलब्धी सुधारित वित्तलब्धीपेक्षा अधिक होत असतील, तेव्हा फरकाची रक्कम वैयक्तिक वेतन म्हणून दिली जाईल आणि ती वेतनातील पुढील वाढींमध्ये समावून घेतली जाईल.

**टीप ५. -** पोटनियम (१) अन्वये वेतन निश्चित करताना, जो शासकीय कर्मचारी, १ जानेवारी २०१६ च्या लगतपूर्वी, त्याच संवर्गातील आपल्या कनिष्ठ शासकीय कर्मचाऱ्यापेक्षा विद्यमान वेतन संरचनेत जास्त वेतन घेत होता त्याचे सुधारित वेतन संरचनेतील वेतन हे त्याच्या कनिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन दर्शविणाऱ्या वेतन सेलमधील वेतनापेक्षा कमी निश्चित होत असेल म्हणजेच, कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या वेतनापेक्षा कमी वेतनावर निश्चित होत असेल, तर त्या बाबतीत त्याचे वेतन कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या वेतनापर्यंत वाढविण्यात येईल.

**टीप ६. -** ज्या शासकीय कर्मचाऱ्यास १ जानेवारी २०१६ रोजी वैयक्तिक वेतन मिळत असेल त्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याच्या वैयक्तिक वेतनासहीत विद्यमान वित्तलब्धी सुधारित वित्तलब्धीपेक्षा अधिक होत असतील तर अशी फरकाची जादा रक्कम शासकीय कर्मचाऱ्यास वैयक्तिक वेतन म्हणून देण्यात येईल आणि ती वेतनातील पुढील वाढीत सामावून घेतली जाईल.

**टीप ७.-** दोन विद्यमान श्रेणींपैकी एक दुसरीची बढतीची श्रेणी असून या दोन्ही श्रेणी विलीन झाल्या असतील आणि विद्यमान खालच्या श्रेणीत समान अथवा निम्न वेतन घेणारा कनिष्ठ शासकीय कर्मचारी सुधारित वेतन संरचनेत विद्यमान वरच्या श्रेणीतील वरिष्ठ शासकीय कर्मचाऱ्याच्या वेतनापेक्षा अधिक वेतन घेत असेल अशा बाबतीत वरिष्ठ शासकीय कर्मचाऱ्याचे सुधारित वेतन संरचनेतील वेतन त्याच्या कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या वेतनापर्यंत त्या दिनांकापासून वाढविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील वेतनवाढ मंजूर करण्यासाठी नियम १० मधील तरतूदी लागू राहतील.

**टीप ८. -** (एक) १ जानेवारी २०१६ पूर्वी वरच्या पदावर बढती दिलेला वरिष्ठ शासकीय कर्मचारी सुधारित वेतन संरचनेत, १ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर वरच्या पदावर बढती मिळालेल्या त्याच्या कनिष्ठाहून कमी वेतन घेत असेल तेव्हा अशा प्रकरणी वरिष्ठ शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन त्याच्या कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या सुधारित वेतन वेतन संरचनेत निश्चित केलेल्या वेतनाच्या रकमेइतके वाढविण्यात यावे. ही वाढ कनिष्ठ शासकीय कर्मचाऱ्याच्या बढतीच्या तारखेपासून लागू करण्यात यावी. मात्र, त्यासाठी पुढील शर्ती पूर्ण कराव्या लागतील :-

(अ) कनिष्ठ व वरिष्ठ शासकीय कर्मचारी हे दोघेही एकाच संवर्गातील असावेत आणि ज्या पदांवर त्यांना बढती देण्यात आली असेल ती पदे त्याच संवर्गात समरुप असावीत;

(ब) ज्या खालच्या व वरच्या पदांवर वेतन मिळण्यास ते पात्र असतील त्या पदांच्या विद्यमान वेतन संरचना व सुधारित वेतन संरचना समरुप असाव्यात;

(क) वरिष्ठ शासकीय कर्मचारी बढतीच्यावेळी कनिष्ठ शासकीय कर्मचाऱ्याइतके किंवा त्यापेक्षा अधिक वेतन आहरित करीत असला पाहिजे ;

(ड) अशा बढतीनंतर सुधारित वेतनसंरचनेमध्ये वेतन विनियमित करण्यास लागू होणाऱ्या महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ११ च्या तरतूदी किंवा कोणताही दुसरा नियम किंवा आदेश यांचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून अशी विसंगती उद्भवलेली असावी:

परंतु, जर कनिष्ठ कर्मचारी खालच्या पदावर विद्यमान वेतन संरचनेमध्ये त्याला दिलेल्या आगाऊ वेतनवाढीमुळे वरिष्ठ कर्मचाऱ्यापेक्षा अधिक वेतन घेत असेल तर वरिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन वाढविण्यासाठी या टीपेच्या तरतुदींचा आधार घेता येणार नाही.

(दोन) वरील खंड (एक) नुसार वरिष्ठ शासकीय कर्मचाऱ्याच्या वेतन पुनर्निश्चितीचे आदेश महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ४० खाली निर्गमित करण्यात यावेत आणि वरिष्ठ शासकीय कर्मचाऱ्यास पुढील वेतनवाढ वेतन पुनर्निश्चितीपासून त्याची आवश्यक ती अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर अनुज्ञेय राहील.

उदाहरण :- १ नियम ७ (१) नुसार वेतननिश्चिती

१. विद्यमान वेतनबँड: पीबी- १
२. विद्यमान ग्रेड वेतन: रू. १९००
३. विद्यमान वेतनबँडमधील वेतन: रू. ६३५०
४. विद्यमान मूळ वेतन: रू. ८२५० (६३५०+१९००)
५. २.५७ या गुणांकाने गुणून येणारे वेतन:
८२५० x २.५७ = २१२०२.५० ( नजीकच्या रूपयात पूर्णांकित करून रू. २१२०३/-)
६. रू. १९०० या ग्रेड वेतनाशी समकक्ष वेतन स्तर: एस-६
७. वेतन मॅट्रिक्समधील सुधारित वेतन:
(रू. २१२०३/- इतकी किंवा वेतन स्तर एस-६ मधील त्यापुढील रक्कम) रू. २१७००/-

| वेतनबँड | पीबी-१ : रू. ५२००-२०२०० |
|---|---|
| ग्रेड वेतन: रू. | १९०० |
| स्तर | एस-६ |
| १. | १९९०० |
| २. | २०५०० |
| ३. | २११०० |
| ४. | २१७०० ← |
| ५. | २२४०० |

उदाहरण :- २

| |
|---|
| १. विद्यमान वेतनबँड: पीबी- २ |
| २. विद्यमान ग्रेड वेतन: रू. ४५०० |
| ३. विद्यमान वेतनबँडमधील वेतन: रू. २३५१०/- |
| ४. विद्यमान मूळ वेतन: रू. २८०१०/- (२३५१०+४५००) |
| ५. २.५७ या गुणांकाने गुणून येणारे वेतन: २८०१० x २.५७ = ७१९८५.७ ( नजीकच्या रूपयात पूर्णांकित करून रू. ७१९८६/-) |
| ६. रू. ४५०० या ग्रेड वेतनाशी समकक्ष वेतन स्तर: एस-१६ |
| ७. वेतन मॅट्रिक्समधील सुधारित वेतन: (रू. ७१९८६/- इतकी किंवा वेतन स्तर एस-१६ मधील त्यापुढील रक्कम) रू. ७२१००/- |

| **वेतनबँड** | **पीबी-२ : रू. ९३००-३४८००** |
|---|---|
| **ग्रेड वेतन: रू.** | ४५०० |
| **स्तर** | **एस-१६** |
| १५. | ६८००० |
| १६. | ७०००० |
| १७. | **७२१००** ← |
| १८. | ७४३०० |
| १९. | ७६५०० |

(२) पोटनियम (१) अन्वये स्थानापन्न पदाचे निश्चित केलेले वेतन कायम पदाच्या निश्चित केलेल्या वेतनाहून कमी असल्यास, नियम ५ च्या तरतूदींच्या अधिन राहून, स्थानापन्न पदाचे वेतन कायम पदाच्या वेतन टप्प्याइतक्या वेतनावर निश्चित करण्यात येईल.

८. **१ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर सरळसेवेने नियुक्ती झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याची सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती.-** १ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्याचे वेतन, त्यास ज्या पदावर नियुक्त करण्यात येईल त्या पदाला अनुज्ञेय असलेल्या वेतन स्तराच्या किमान वेतनावर किंवा वेतन स्तरातील पहिल्या सेलमधील वेतनावर निश्चित करण्यात येईल:

परंतु, १ जानेवारी २०१६ आणि सदर अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकादरम्यान नियुक्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन विद्यमान वेतन संरचनेत निश्चित केले असेल आणि त्याची विद्यमान वित्तलब्धी, सुधारित वेतन संरचनेनुसार निश्चित होणारे वेतन आणि त्यावरील महागाई भत्त्यापेक्षा अधिक असेल तर सदर फरकाची रक्कम वैयक्तिक वेतन म्हणून दिली जाईल आणि ती वेतनातील पुढील वाढीमध्ये सामावून घेतली जाईल.

९. **वेतन मॅट्रिक्समधील वेतनवाढ.-** वेतनवाढ वेतन मॅट्रिक्समधील अनुज्ञेय वेतन स्तरातील पहिल्या सेल पासून शेवटच्या सेलकडे जाणाऱ्या सेलमध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

(१) वेतन स्तर एस- १ मध्ये रू. १६००० मूळ वेतन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन त्याच वेतन स्तरामध्ये अधोगामी दिशेने जाऊन वेतनवाढीनंतर त्याचे मूळ वेतन रू. १६५००/- होईल.

(२) वेतन स्तर एस- ६ मध्ये रू. २११०० मूळ वेतन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन त्याच वेतन स्तरामध्ये अधोगामी दिशेने जाऊन वेतनवाढीनंतर त्याचे मूळ वेतन रू. २१७००/- होईल.

| वेतनबँड | -१ एस: रू. ४४४०-७४४० | पीबी -१: रू. ५२००-२०२०० |
|---|---|---|
| ग्रेड वेतन: रू. | १३०० | १९०० |
| **स्तर** | **एस-१** | **एस-६** |
| १. | १५००० | १९९०० |
| २. | १५५०० | २०५०० |
| ३. | १६००० | २११०० |
| | ↓ | ↓ |
| ४. | **१६५००** | **२१७००** |
| ५. | १७००० | २२४०० |

१०. **सुधारित वेतन संरचनेमध्ये पुढील वेतनवाढीचा दिनांक. -**

(१) वार्षिक वेतनवाढीच्या विद्यमान १ जुलै या दिनांकाऐवजी दरवर्षी १ जानेवारी आणि १ जुलै हे वार्षिक वेतनवाढीचे दोन दिनांक राहतील:

परंतु, नियुक्ती, पदोन्नती अथवा आर्थिक श्रेणीवाढीच्या दिनांकाच्या आनुषंगाने शासकीय कर्मचाऱ्यांस १ जानेवारी किंवा १ जुलै यापैकी एकाच दिनांकास वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहील.

(२) २ जानेवारी आणि १ जुलै (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत नियुक्त किंवा पदोन्नत झालेल्या किंवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसह अन्य आर्थिक श्रेणीवाढ झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास पुढील वर्षाच्या १ जानेवारी रोजी वेतनवाढ देण्यात येईल, आणि २ जुलै आणि १ जानेवारी (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत नियुक्त किंवा पदोन्नत झालेल्या किंवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसह अन्य आर्थिक श्रेणीवाढ झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास पुढील वर्षाच्या १ जुलै रोजी वेतनवाढ देण्यात येईल.

(३) १ जानेवारी किंवा १ जुलै रोजी शासकीय कर्मचाऱ्यास पदोन्नती मिळाल्यास किंवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसह अन्य आर्थिक श्रेणीवाढ मंजूर केली असल्यास आणि नियम १३ अन्वये पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय वेतन स्तरामध्ये वेतननिश्चिती केली असल्यास, अशा प्रकरणी पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय वेतन स्तरामध्ये, प्रथम वेतनवाढ यथास्थिती, पुढील १ जुलै अथवा १ जानेवारी रोजी देय राहील, परंतु यासाठी सहा महिन्यांच्या अर्हताकारी सेवेची पूर्तता अनिवार्य राहील. तथापि, त्यानंतरची पुढील वेतनवाढ एक वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतरच देय राहील.

उदाहरण :-

(१) २ जुलै २०१६ आणि १ जानेवारी २०१७ (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत नियुक्त किंवा सर्वसाधारण पदोन्नती साखळीमध्ये पदोन्नत झालेल्या किंवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसह अन्य आर्थिक श्रेणीवाढ झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांस प्रथम वेतनवाढ १ जुलै २०१७ रोजी देय राहील आणि त्यानंतरच्या वेतनवाढी १ वर्षानंतर देय राहतील.

(२) २ जानेवारी २०१६ आणि १ जुलै २०१६ (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत नियुक्त किंवा सर्वसाधारण पदोन्नती साखळीमध्ये पदोन्नत झालेल्या किंवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसह अन्य आर्थिक श्रेणीवाढ झालेल्या आणि १ जुलै २०१६ रोजी कोणतीही वेतनवाढ न घेतलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास पुढील वेतनवाढ १ जानेवारी २०१७ रोजी देय राहील आणि त्यानंतरच्या वेतनवाढी एक वर्षानंतर देय राहतील:

परंतु, १ जानेवारी २०१६ रोजी सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती केलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत ज्या वेतन स्तरामध्ये १ जानेवारी २०१६ रोजी वेतननिश्चिती केली आहे, त्या स्तरातील त्याची पुढील वेतनवाढ १ जुलै २०१६ रोजी देय होईल:

परंतु, आणखी असे की, १ जुलै २०१६ रोजी वेतनवाढ दिल्यानंतर त्यापुढील वेतनवाढ १ जुलै २०१७ रोजी देय होईल.

११. **दिनांक १ जानेवारी २०१६ च्या नंतर सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती.-** जो शासकीय कर्मचारी १ जानेवारी २०१६ रोजी त्याने धारण केलेल्या पदाच्या बाबतीत १ जानेवारी २०१६ नंतर त्याच्या पुढील वेतनवाढीच्या वा अन्य दिनांकापासून सुधारित वेतन संरचनेची निवड करतो, त्याची त्या दिनांकास सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती नियम ७ च्या पोटनियम (१) च्या खंड (अ) नुसार करण्यात येईल.

१२. **१ जानेवारी २०१६ या दिनांकापूर्वी धारण केलेल्या पदावर १ जानेवारी २०१६ नंतर पुनर्नियुक्ती झाल्यावर वेतननिश्चिती.-** ज्या शासकीय कर्मचाऱ्याने १ जानेवारी २०१६ पूर्वी एखाद्या पदावर स्थानापन्न म्हणून काम केले असेल पण त्या दिनांकास ते पद धारण करीत नसेल आणि जो त्या पदावर नंतर नेमणूक झाल्यावर सुधारित वेतन संरचनेत वेतन घेत असेल, त्या कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ११ च्या परंतुकाचा लाभ देण्यात येईल. हा लाभ १ जानेवारी २०१६ रोजी त्याने पद धारण केले असते आणि त्या दिनांकापासून सुधारित वेतन संरचनेची निवड केली असती तर अनुज्ञेय होणाऱ्या लाभाच्या मर्यादेइतका असेल.

१३. **१ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतरच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने वेतननिश्चिती.-**

१ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर पदोन्नत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत तो ज्या पदावरून पदोन्नत होईल त्या पदाच्या वेतन स्तरामध्ये एक वेतनवाढ देण्यात येईल आणि अशा प्रकारे येणारी रक्कम पदोन्नतीच्या पदाच्या वेतन स्तराच्या सेलमध्ये असल्यास त्या रकमेवर, मात्र अशी सेल उपलब्ध नसल्यास लगतच्या पुढील सेल मधील उच्च वेतनावर वेतननिश्चिती करण्यात येईल.

परंतु, १ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर पदोन्नत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास त्याची पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती पदोन्नतीच्या दिनांकापासून अथवा सुधारित वेतनसंरचनेतील वेतनवाढीच्या दिनांकापासून करण्याचा विकल्प देता येईल. मात्र शासकीय कर्मचाऱ्याने असा विकल्प या नियमांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत देणे आवश्यक राहील.

**उदाहरण :- १**

| | |
|---|---|
| १ | सुधारित वेतन संरचनेतील वेतन स्तर: एस-६ |
| २ | सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन (वेतन स्तर-एस-६) : रू. २१७०० |
| ३ | पदोन्नतीनंतर मंजूर वेतन स्तर : एस-७ |
| ४ | वेतन स्तर एस-६ मध्ये एक वेतनवाढ दिल्यानंतर होणारे वेतन : रू. २२४०० |
| ५ | एस-७ या वरिष्ठ वेतन स्तरामधील वेतन: रू. २२४०० (रू. २२४०० ही रक्कम पदोन्नतीच्या पदाच्या वेतन स्तराच्या सेलमध्ये आहे, त्यामुळे पुढील टप्पा विचारात घ्यायचा नाही.) |

| **वेतनबँड** | **पीबी -१: रू. ५२००-२०२००** | |
|---|---|---|
| **ग्रेड वेतन: रू.** | १९०० | २००० |
| **स्तर** | **एस-६** | **एस-७** |
| १. | १९९०० | २१७०० |
| २. | २०५०० | २२४०० |
| ३. | २११०० | २३१०० |
| ४. | २१७०० | २३८०० |
| ५. | २२४०० | २४५०० |

**उदाहरण :- २**

| | |
|---|---|
| १ | सुधारित वेतन संरचनेतील वेतन स्तर: एस-१४ |
| २ | सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन (वेतन स्तर-एस-१४) : रू. ४१००० |
| ३ | पदोन्नतीनंतर मंजूर वेतन स्तर : एस-१५ |

| **वेतनबँड** | **पीबी -२: रू. ९३००-३४८००** | |
|---|---|---|
| **ग्रेड वेतन: रू.** | ४३०० | ४४०० |
| **स्तर** | **एस-१४** | **एस-१५** |

| | |
|---|---|
| ४ | वेतन स्तर एस-१४ मध्ये एक वेतनवाढ दिल्यानंतर होणारे वेतन : रू. ४२२०० |
| ५ | एस-१५ वरिष्ठ वेतन स्तरामधील वेतन मधील वेतन : ( रू. ४२२०० इतके किंवा त्या लगतचा पुढील टप्पा ) रू. ४३१०० |

| | | |
|---|---|---|
| १. | ३८६०० | ४१८०० |
| २. | ३९८०० | **४३१००** |
| ३. | **४१०००** | ४४४०० |
| ४. | **४२२००** | ४५७०० |
| ५. | ४३५०० | ४७१०० |

१४. **वेतनाची थकबाकी प्रदान करण्याची पद्धती.-** (१) या नियमांनुसार वेतननिश्चितीच्या परिणामी शासकीय कर्मचाऱ्यास १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१८ (दोन्ही दिवस धरुन) या कालावधीतील वेतनाच्या अनुज्ञेय थकबाकीची रक्कम पुढील अटींच्या अधिन राहून आर्थिक वर्ष सन २०१९-२०२० पासून पुढील पाच वर्षात पाच समान हप्त्यांत शासकीय कर्मचाऱ्यांच्या यथास्थिती, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी किंवा लागू असणाऱ्या निवृत्तिवेतन योजनेच्या खात्यामध्ये जमा करण्यात येईल,-

(अ) थकबाकीच्या हप्त्याची रक्कम सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा केल्यापासून दोन वर्षे काढून घेता येणार नाही;

| 27 | 64700 | 69100 | 76500 | 83500 | 90200 | 96900 | 102800 | 106000 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 28 | 66600 | 71200 | 78800 | 86000 | 92900 | 99800 | 105900 | 109200 |
| 29 | 68600 | 73300 | 81200 | 88600 | 95700 | 102800 | 109100 | 112500 |
| 30 | 70700 | 75500 | 83600 | 91300 | 98600 | 105900 | 112400 | 115900 |
| 31 | 72800 | 77800 | 86100 | 94000 | 101600 | 109100 | 115800 | 119400 |
| 32 | 75000 | 80100 | 88700 | 96800 | 104600 | 112400 | 119300 | 123000 |
| 33 | 77300 | 82500 | 91400 | 99700 | 107700 | 115800 | 122900 | 126700 |
| 34 | 79600 | 85000 | 94100 | 102700 | 110900 | 119300 | 126600 | 130500 |
| 35 | 82000 | 87600 | 96900 | 105800 | 114200 | 122900 | 130400 | 134400 |
| 36 | 84500 | 90200 | 99800 | 109000 | 117600 | 126600 | 134300 | 138400 |
| 37 | 87000 | 92900 | 102800 | 112300 | 121100 | 130400 | 138300 | 142600 |
| 38 | 89600 | 95700 | 105900 | 115700 | 124700 | 134300 | 142400 | 146900 |
| 39 | 92300 | 98600 | 109100 | 119200 | 128400 | 138300 | 146700 | 151300 |
| 40 | 95100 | 101600 | 112400 | 122800 | 132300 | 142400 | 151100 | 155800 |

continued

| | Pay Band PB 3: Rs.15600-39100 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Grade Pay** | **5000** | **5400 in PB 2 and 5400 in PB 3** | **5500** | **5700 and 5800** | **6600** | **6900** | **7600** | **7900** |
| **Level** | **S-19** | **S-20** | **S-21** | **S-22** | **S-23** | **S-24** | **S-25** | **S-26** |
| 1 | 55100 | 56100 | 57100 | 60000 | 67700 | 71100 | 78800 | 82200 |
| 2 | 56800 | 57800 | 58800 | 61800 | 69700 | 73200 | 81200 | 84700 |
| 3 | 58500 | 59500 | 60600 | 63700 | 71800 | 75400 | 83600 | 87200 |
| 4 | 60300 | 61300 | 62400 | 65600 | 74000 | 77700 | 86100 | 89800 |
| 5 | 62100 | 63100 | 64300 | 67600 | 76200 | 80000 | 88700 | 92500 |
| 6 | 64000 | 65000 | 66200 | 69600 | 78500 | 82400 | 91400 | 95300 |
| 7 | 65900 | 67000 | 68200 | 71700 | 80900 | 84900 | 94100 | 98200 |
| 8 | 67900 | 69000 | 70200 | 73900 | 83300 | 87400 | 96900 | 101100 |
| 9 | 69900 | 71100 | 72300 | 76100 | 85800 | 90000 | 99800 | 104100 |
| 10 | 72000 | 73200 | 74500 | 78400 | 88400 | 92700 | 102800 | 107200 |
| 11 | 74200 | 75400 | 76700 | 80800 | 91100 | 95500 | 105900 | 110400 |
| 12 | 76400 | 77700 | 79000 | 83200 | 93800 | 98400 | 109100 | 113700 |
| 13 | 78700 | 80000 | 81400 | 85700 | 96600 | 101400 | 112400 | 117100 |
| 14 | 81100 | 82400 | 83800 | 88300 | 99500 | 104400 | 115800 | 120600 |
| 15 | 83500 | 84900 | 86300 | 90900 | 102500 | 107500 | 119300 | 124200 |
| 16 | 86000 | 87400 | 88900 | 93600 | 105600 | 110700 | 122900 | 127900 |
| 17 | 88600 | 90000 | 91600 | 96400 | 108800 | 114000 | 126600 | 131700 |
| 18 | 91300 | 92700 | 94300 | 99300 | 112100 | 117400 | 130400 | 135700 |
| 19 | 94000 | 95500 | 97100 | 102300 | 115500 | 120900 | 134300 | 139800 |
| 20 | 96800 | 98400 | 100000 | 105400 | 119000 | 124500 | 138300 | 144000 |
| 21 | 99700 | 101400 | 103000 | 108600 | 122600 | 128200 | 142400 | 148300 |
| 22 | 102700 | 104400 | 106100 | 111900 | 126300 | 132000 | 146700 | 152700 |
| 23 | 105800 | 107500 | 109300 | 115300 | 130100 | 136000 | 151100 | 157300 |
| 24 | 109000 | 110700 | 112600 | 118800 | 134000 | 140100 | 155600 | 162000 |
| 25 | 112300 | 114000 | 116000 | 122400 | 138000 | 144300 | 160300 | 166900 |
| 26 | 115700 | 117400 | 119500 | 126100 | 142100 | 148600 | 165100 | 171900 |
| 27 | 119200 | 120900 | 123100 | 129900 | 146400 | 153100 | 170100 | 177100 |
| 28 | 122800 | 124500 | 126800 | 133800 | 150800 | 157700 | 175200 | 182400 |
| 29 | 126500 | 128200 | 130600 | 137800 | 155300 | 162400 | 180500 | 187900 |
| 30 | 130300 | 132000 | 134500 | 141900 | 160000 | 167300 | 185900 | 193500 |
| 31 | 134200 | 136000 | 138500 | 146200 | 164800 | 172300 | 191500 | 199300 |
| 32 | 138200 | 140100 | 142700 | 150600 | 169700 | 177500 | 197200 | 205300 |
| 33 | 142300 | 144300 | 147000 | 155100 | 174800 | 182800 | 203100 | 211500 |
| 34 | 146600 | 148600 | 151400 | 159800 | 180000 | 188300 | 209200 | |
| 35 | 151000 | 153100 | 155900 | 164600 | 185400 | 193900 | | |
| 36 | 155500 | 157700 | 160600 | 169500 | 191000 | 199700 | | |
| 37 | 160200 | 162400 | 165400 | 174600 | 196700 | 205700 | | |
| 38 | 165000 | 167300 | 170400 | 179800 | 202600 | 211900 | | |
| 39 | 170000 | 172300 | 175500 | 185200 | 208700 | | | |
| 40 | 175100 | 177500 | 180800 | 190800 | | | | |

continued

| | Pay Band PB 4: 37400-67000 | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Grade Pay | 8700 | 8800 | 8900 | 10000 | 67000-79000 |
| Level | S-27 | S-28 | S-29 | S-30 | S-31 |
| 1 | 118500 | 124800 | 131100 | 144200 | 182200 |
| 2 | 122100 | 128500 | 135000 | 148500 | 187700 |
| 3 | 125800 | 132400 | 139100 | 153000 | 193300 |
| 4 | 129600 | 136400 | 143300 | 157600 | 199100 |
| 5 | 133500 | 140500 | 147600 | 162300 | 205100 |
| 6 | 137500 | 144700 | 152000 | 167200 | 211300 |
| 7 | 141600 | 149000 | 156600 | 172200 | 217600 |
| 8 | 145800 | 153500 | 161300 | 177400 | 220000 |
| 9 | 150200 | 158100 | 166100 | 182700 | |
| 10 | 154700 | 162800 | 171100 | 188200 | |
| 11 | 159300 | 167700 | 176200 | 193800 | |
| 12 | 164100 | 172700 | 181500 | 199600 | |
| 13 | 169000 | 177900 | 186900 | 205600 | |
| 14 | 174100 | 183200 | 192500 | 211800 | |
| 15 | 179300 | 188700 | 198300 | 218200 | |
| 16 | 184700 | 194400 | 204200 | | |
| 17 | 190200 | 200200 | 210300 | | |
| 18 | 195900 | 206200 | 216600 | | |
| 19 | 201800 | 212400 | | | |
| 20 | 207900 | | | | |
| 21 | 214100 | | | | |

(Accompaniment to the Government Notification, Finance Department,

No. RPS 2019/CR-1 / SER - 9 dated 30th January, 2019)

**ANNEXURE - III**

[*See* Rule 6(1)]

**FORM OF OPTION**

1. (A) Name of the Government servant *Mr./Mrs./Kum. ................................

   (B) Post held....................................*Substantive/Officiating

   (C) Existing pay structure Pay Band: PB - **....... Rs. .... Grade Pay Rs. .....

   (D) Revised pay structure – Level S -***......... Rs. .............

   (E) Name of the office in which employed............................

2 I * Mr./ Mrs./ Kum.............................................hereby :-

*(I) elect the revised pay structure of the post with effect from the 1st day of January 2016;

* ( II ) elect to retain the existing scale of the post until -

* the date of my next increment.

* the date of my subsequent increment rising my pay to Rs.........

* I vacate the post or cease to draw pay in the existingscale.

3 The option hereby exercised is final and will not be modified at any subsequent date.

Place : Signature :

Date : Name :

---

(To be filled by office only)

This is to certify that, Mr./Mrs./Kum ....... ..................................................

holder of the post of .................................in *substantive/officiating capacity, has submitted this option form duly signed and within prescribed date, to me.

Place: Signature

Date: Name................................................

Head of the Office..........................

* To be scored out if not applicable.
** Mention Pay Band Number.
*** Mention Pay Level Number.

(Accompaniment to the Government Notification, Finance Department,
No. RPS 2019 / CR-1 / SER - 9 dated 30th January, 2019)

## ANNEXURE - IV

### Undertaking

I,.................................................................. hereby undertake that any excess payment as a result of pay fixation in a manner contrary to the provisions contained in the Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 2019, or any other excess payment detected in the light of discrepancies noticed subsequently will be refunded by me to the Government either by adjustment against future payments due to me or otherwise.

Place: Signature

Date:-

Name:

Designation:

**महाराष्ट्र नागरी सेवा**
**<u>(सुधारित वेतन) नियम, २०१९</u>**
**वेतननिश्चितीसंबंधी स्पष्टीकरण**

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग

शासन परिपत्रक क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८ /सेवा-९

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक- २० फेब्रुवारी, २०१९

वाचा:

| | | |
|---|---|---|
| १. | शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-२०१९ /प्र.क्र. १ /सेवा-९, दिनांक- ३० जानेवारी, २०१९ | |
| २. | केंद्रीय वित्त मंत्रालय, व्यय विभाग, अधिसूचना जी. एस. आर. ७२१ (इ) दिनांक- २५ जुलै, २०१६ | |
| ३. | केंद्रीय वित्त मंत्रालय, व्यय विभाग, कार्यालयीन ज्ञापने | |
| | (१) | क्रमांक: १-५/२०१६/आय सी, दिनांक- २९ जुलै, २०१६ |
| | (२) | क्रमांक: १-६/२०१६/आय सी, दिनांक- ७ सप्टेंबर, २०१६ |
| | (३) | क्रमांक: १-६/२०१६/आय सी, दिनांक- ७ सप्टेंबर, २०१६ |
| | (४) | क्रमांक: /१-६/२०१६/आय सी (पी टी), दिनांक -२९ सप्टेंबर, २०१६ |
| | (५) | सं/ क्रमांक: /१-६/२०१६/आय सी (पी टी), दिनांक -१३ जून, २०१७ |
| | (६) | एफ. क्रमांक: ४-२१/२०१७-आय सी/ इ. III (ए), दिनांक- ३१ जुलै, २०१८ |
| | (७) | सं/ क्रमांक: /१-६/२०१६/आय सी,दिनांक- ३ ऑगस्ट, २०१७ |
| | (८) | क्रमांक: १-६/२०१६/आय सी/इ- III, दिनांक- ७ फेब्रुवारी, २०१९ |
| ४. | केंद्रीय मनुष्यबळ, सार्वजनिक तक्रार आणि निवृत्तिवेतन मंत्रालय, कार्यालयीन ज्ञापन क्र. ३/०२/२०१७- आस्था (वेतन-१), दिनांक- २७ जुलै, २०१७ | |

## <u>परिपत्रक</u>

शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-२०१९ /प्र.क्र. १ /सेवा-९, दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संचरना व त्यामधील प्रारंभिक वेतननिश्चितीबाबतचे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ प्रसिध्द करण्यात आले आहेत. या नियमांमधील नियम ६ नुसार शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना कोणत्या दिनांकापासून स्वीकारायची आहे, याबाबत विकल्प देता येईल. सदर विकल्पाचा नमुना नियमांना जोडलेल्या जोडपत्र - तीन मध्ये विहित केला आहे. शासकीय

कर्मचारी एक महिन्याच्या विहित कालावधीमध्ये वेगवेगळ्या दिनांकाला विकल्प देण्याची शक्यता आहे. कार्यालय प्रमुखांनी शासकीय कर्मचाऱ्यांकडून जसे जसे विकल्प प्राप्त होतील तशी तशी प्रत्येक कर्मचाऱ्याचे प्रारंभिक वेतन निश्चित करण्याची कार्यवाही करावी. ज्या शासकीय कर्मचाऱ्यांचे विकल्प विहित मुदतीत म्हणजे **दिनांक २ मार्च, २०१९** पर्यंत प्राप्त होणार नाहीत, अशांच्या बाबतीत नियम ६ (३) नुसार सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतन निश्चित करण्याची कार्यवाही त्यानंतर त्वरित करण्यात यावी आणि शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांमध्ये वेतननिश्चितीबाबतची योग्य ती नोंद कार्यालय प्रमुखाच्या दिनांकीत स्वाक्षरीने घेण्यात यावी.

२. एकाहून अधिक कार्यालय प्रमुखांकडे सेवा केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ च्या नियम ६ अन्वये विकल्प सादर करण्याच्या दिवशी तो ज्या कार्यालय प्रमुखांकडे कार्यरत असेल, त्यांनी वेतननिश्चितीसाठी लागणारी आवश्यक ती माहिती, संबंधित शासकीय कर्मचाऱ्याने पूर्वी ज्या कार्यालय प्रमुखांकडे सेवा केली असेल त्यांच्याकडून मागवावी व वेतननिश्चिती करावी.

३. सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतन निश्चित करण्याबाबतचे विवरणपत्र (जोडपत्र) यासोबत जोडण्यात आले आहे. त्यानुसार विहित नमुन्यातील वेतननिश्चितीबाबतचे विवरणपत्र तीन प्रतींत तयार करण्यात यावे. त्यातील एक प्रत शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात जोडण्यात यावी. दुसरी प्रत कार्यालयीन अभिलेखासाठी व तिसरी प्रत वेतन देयकाबरोबर उत्तर परिक्षणासाठी संबंधित अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / कोषागार अधिकारी यांना पाठविण्यात यावी.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील तरतुदींचे स्पष्टीकरण पुढे देण्यात आले आहे.

४. **नियम १ ते ४** – या नियमांतील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत.

५. **नियम ५ – सुधारित वेतन संरचनेमध्ये वेतन काढणे.**

(१) विद्यमान वेतन संरचनेमध्ये ( ६ व्या वेतन आयोगातील) वेतन घेण्याचा विकल्प देणारे कर्मचारी वगळून इतर सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेत ( ७ व्या वेतन आयोगातील) आणणे हा नियम ५ चा उद्देश आहे. जे कर्मचारी विद्यमान वेतन संरचना चालू ठेवण्याचा विकल्प देतील ते असुधारित दराने महागाई भत्ता आणि असल्यास, इतर अनुज्ञेय भत्ते घेत राहतील आणि निवृत्तिवेतन इत्यादीकरीता दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी अनुज्ञेय महागाई भत्ता वेतनाचा भाग म्हणून गणण्यात येईल. जर एखादा शासकीय कर्मचारी स्थायी पद (Permanent post) कायमपणे धारण करीत असेल आणि एका वरच्या पदावर स्थानापन्न

(Officiating) म्हणून काम करीत असेल किंवा तो जर प्रतिनियुक्ती इत्यादीवर नसता तर एक किंवा अधिक पदांवर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीला असता, अशा वेळी त्याला एकाच श्रेणीबाबत विद्यमान वेतन संरचना चालू ठेवण्याचा विकल्प राहील. असा शासकीय कर्मचारी एका स्थायी पदास लागू असलेली किंवा स्थानापन्न पदांपैकी एका पदास लागू असलेली विद्यमान वेतन संरचना चालू ठेवू शकेल. इतर पदांच्या बाबतीत त्याला सुधारित वेतन संरचनेतच आणावे लागेल.

(२) या नियमातील तरतूदीनुसार विद्यमान वेतन संरचना चालू ठेवण्याचा विकल्प केवळ एकाच विद्यमान वेतन संरचनेबाबत लागू असल्याने शासकीय कर्मचाऱ्यास केवळ एकच विद्यमान वेतन संरचना पुढे चालू ठेवण्याचा विकल्प देता येईल.

उदाहरण :-

शासकीय कर्मचाऱ्यास दिनांक २ जानेवारी, २०१६ ते ३० जून, २०१६ या कालावधीत पदोन्नती मिळाली असेल तर त्याला (i) दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी तो धारण करीत असलेल्या (पदोन्नतीपूर्वीच्या) पदाची सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती आणि (ii) पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चितीदेखील दिनांक १ जुलै, २०१६ या एकाच दिनांकास करण्याचे विकल्प देता येणार नाही.

तथापि, शासकीय कर्मचाऱ्याने दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी सुधारित वेतन संरचना स्वीकारण्याचा विकल्प दिल्यास, पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती दिनांक १ जुलै, २०१६ करण्याचा विकल्प देता येईल.

**६. नियम ६ - विकल्प देणे.**

६.१ - या नियमामध्ये शासकीय कर्मचाऱ्याने सुधारित वेतन संरचना स्वीकारण्याचा विकल्प कोणत्या प्रकारे व कुठल्या प्राधिकाऱ्यास सादर करावा या विषयीची पध्दती विहित करण्यात आली आहे.

सदर विकल्प नियमांच्या जोडपत्र - तीन मधील विहित नमुन्यात व विहित कालावधीत (म्हणजेच ३० दिवसांत), विकल्प सादर करण्याच्या दिवशी शासकीय कर्मचारी ज्या कार्यालय प्रमुखांकडे कार्यरत असेल त्याच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यासोबतच नियमांच्या जोडपत्र - चार मधील वचनपत्र देखील सादर करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे विहित मुदतीत प्राप्त झालेले विकल्प, कार्यालय प्रमुख वेतननिश्चिती करण्यास सक्षम नसल्यास, वेतननिश्चितीसाठी योग्य त्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे तात्काळ पाठविण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील. जेथे, शासकीय कर्मचारी, या नियमांच्या प्रसिध्दीच्या दिनांकास भारताबाहेर असेल, त्यांच्या बाबतीत विकल्पाची मुदत, त्यांनी भारतात आपल्या पदाचा कार्यभार घेतल्याच्या दिनांकापासून एक महिना इतकी असेल.

टीप :- <u>या नियमांसोबतच्या जोडपत्र - तीन मधील विकल्पाचा नमुना हा शासकीय कर्मचाऱ्यास ७ व्या आयोगानुसार सुधारित वेतन संरचना कोणत्या दिनांकापासून स्वीकारायची केवळ यासाठीच आहे.</u>

६.२ दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ जानेवारी, २०१९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले कर्मचारीही सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चितीचा विकल्प सादर करण्यास पात्र असतील.

६.३ विद्यमान वेतन संरचनेतील वेतनवाढीच्या दिनांकास विकल्प दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रस्तुत विकल्प हा विद्यमान वेतन संरचनेतील नियमित वेतनवाढीच्या दिनांकास देणे आवश्यक आहे. आगाऊ वेतनवाढ/ अन्य वेतनवाढ (असल्यास) ही नियमित वेतनवाढ नसल्यामुळे, त्या दिनांकास सुधारित वेतन संरचनेत येण्याचा विकल्प देता येणार नाही.

६.४ दिनांक १ जानेवारी, २०१६ नंतरच्या व अद्याप नियमित न झालेल्या निलंबन कालावधीमध्ये येणाऱ्या वेतनवाढीच्या दिनांकापासून सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्याचा विकल्प शासकीय कर्मचाऱ्यास देता येणार नाही.

**७. नियम ७ - सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतन निश्चित करणे.**

७.१ हा नियम, दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी सुधारित वेतन संरचनेत करावयाच्या प्रत्यक्ष वेतननिश्चितीबाबतचा आहे.

दिनांक १ जानेवारी, २०१६ या दिनांकास सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करताना विद्यमान वेतन संरचनेतील दिनांक १ जानेवारी, २०१६ लगतपूर्वीच्या मूळ वेतनास (वेतनबँडमधील वेतन + ग्रेड वेतन) २.५७ ने गुणण्यात यावे व येणारी रक्कम नजीकच्या रुपयामध्ये पूर्णांकित करण्यात यावी. अशी पूर्णांकित केलेली रक्कम सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये संबंधित संवर्गास/पदास अनुज्ञेय असलेल्या वेतन स्तरामधील सेलमध्ये (Cell) असल्यास त्या रकमेवर वेतननिश्चिती करण्यात यावी. जर ती रक्कम वेतन स्तरामधील सेलमध्ये नसेल तर सदर पूर्णांकित रकमेच्या लगतच्या पुढील सेलमधील रकमेवर वेतननिश्चिती करण्यात यावी.

जर वरील प्रमाणे येणाऱ्या रकमेपेक्षा अनुज्ञेय सुधारित वेतन संरचनेच्या स्तरातील किमान वेतन अथवा पहिल्या सेलमधील वेतन जास्त असेल तर त्या स्तरातील किमान वेतनावर अथवा पहिल्या सेलमधील वेतनावर वेतन निश्चित करण्यात यावे.

उदाहरण :- १

| | |
|---|---|
| १ | विद्यमान वेतनबँड: पीबी- २ : रू. ९३००-३४८०० |
| २ | विद्यमान ग्रेड वेतन: रू. ५४०० |
| ३ | विद्यमान वेतनबँडमधील वेतन: रू. २४५६०/- |
| ४ | विद्यमान मूळ वेतन: रू. २९९६०/- (२४५६०+५४००) |
| ५ | २.५७ या गुणांकाने गुणून येणारे वेतन : २९९६० x २.५७ = ७६९९७.२ ( नजीकच्या रूपयात पूर्णांकित करून रू. ७६९९७/- ) |
| ६ | रू. ५४०० या ग्रेड वेतनाशी समकक्ष वेतन स्तर : एस-२० |
| ७ | वेतन मॅट्रिक्समधील सुधारित वेतन: (रू. ७६९९७/- इतकी किंवा वेतन स्तर एस-२० मधील त्यापुढील सेलमधील रक्कम) **रू. ७७७०० /-** |

| वेतनबँड | पीबी- २: रू. ९३००-३४८०० |
|---|---|
| ग्रेड वेतन: रू. | ५४०० |
| स्तर | **एस-२०** |
| १० | ७३२०० |
| ११ | ७५४०० |
| १२ | **७७७००** ← |
| १३ | ८०००० |

उदाहरण :- २

| | |
|---|---|
| १ | विद्यमान वेतनबँड: पीबी- १ : रू. १५६००-३९१०० |
| २ | विद्यमान ग्रेड वेतन: रू. ५४०० |
| ३ | विद्यमान वेतनबँडमधील वेतन: रू. १६२३०/- |
| ४ | विद्यमान मूळ वेतन: रू. २१६३०/-(१६२३०+५४००) |
| ५ | २.५७ या गुणांकाने गुणून येणारे वेतन : २१६३० x २.५७ = ५५५८९.१ ( नजीकच्या रूपयात पूर्णांकित करून रू. ५५५८९ /- ) |
| ६ | रू. ५४०० या ग्रेड वेतनाशी समकक्ष वेतन स्तर : एस-२० |
| ७ | वेतन मॅट्रिक्समधील सुधारित वेतन: (रू. ५५५८९ ही रक्कम वेतन स्तराच्या किमान वेतनापेक्षा /पहिल्या सेलमधील रकमेपेक्षा कमी असल्याने वेतन स्तराच्या किमान वेतनावर/पहिल्या सेलमधील रकमेवर वेतननिश्चिती होईल.) **रू. ५६१००/-** |

| वेतनबँड | पीबी-१: रू.१५६००-३९१०० |
|---|---|
| ग्रेड वेतन: रू. | ५४०० |
| स्तर | **एस-२०** |
| १ | **५६१००** ← |
| २ | ५७८०० |
| ३ | ५९५०० |
| ४ | ६१३०० |

**टीप- नियम ७ (१) (ब) आणि (क) मध्ये नमुद केल्याप्रमाणे विशेष वेतन /भत्ता किंवा कोणतेही नामाभिधान असलेले विशेष वेतन सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करताना वेतन म्हणून विचारात घेऊ नये.**

**७.२** नियम ७ (२) मधील तरतुदीचा लाभ ज्या प्रकरणी एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यांने स्थायी पदाच्या बाबतीत सुधारित वेतन संरचनेची निवड केली आहे, परंतु स्थानापन्न पदाच्या बाबतीत विद्यमान वेतनश्रेणी चालू ठेवली आहे, त्या प्रकरणी अनुज्ञेय असणार नाही.

**७.३** सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करताना शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन, सुधारित वेतन स्तराच्या कमाल टप्प्याच्या रकमेपक्षा पुढील रकमेवर निश्चित होत असल्यास (म्हणजेच मूळ वेतनास २.५७ ने गुणून येणारी व नजीकच्या रुपयामध्ये पूर्णांकित केलेली रक्कम कमाल टप्प्याच्या रकमेपक्षा जास्त असल्यास) त्याचे वेतन, वेतन स्तराच्या कमाल टप्प्यावर निश्चित करण्यात यावे.

**७.४** महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ११ आणि १७ अनुसार शासकीय कर्मचाऱ्याचे मूळ वेतन संरक्षित करण्यासाठी त्याला मंजूर केलेले वैयक्तिक वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ च्या नियम ७ (१) च्या प्रयोजनार्थ मूळ वेतनाचा भाग म्हणून समजण्यात यावे आणि ते प्रारंभिक वेतनाच्या निश्चितीसाठी विचारात घेण्यात यावे.

**७.५** (अ) शासकीय कर्मचारी दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वेतन प्रदेय (रजा वेतन अनुज्ञेय ) रजेवर असल्यास, त्यास नियम ७ खालील टीप १ (एक) नुसार दिनांक १ जानेवारी, २०१६ किंवा त्याने दिलेल्या विकल्पानुसार सुधारित वेतन संरचनेची निवड केल्याच्या दिनांकापासून सुधारित वेतन संरचनेत वेतन मिळू शकेल. परंतु, शासकीय कर्मचारी दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वीच्या दिनांकापासून वेतन प्रदेय रजेवर असेल आणि प्रत्यक्ष सेवेत रुजू न होताच दिनांक १ जानेवारी, २०१६ नंतर सेवानिवृत्त झाला असेल, अशा कर्मचाऱ्याच्या बाबतीत तो रजेवर जाण्यापूर्वी घेत असलेल्या मूळ वेतनानुसार सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती नियम ७ नुसार करण्यात यावी. त्याला महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ च्या नियम ३६ व ३९ अथवा महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ च्या नियम १० अन्वये वेतनवाढ मिळणार नाही.

(ब) शासकीय कर्मचारी दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वी वैद्यकीय कारणांस्तव असाधारण रजेवर असेल आणि कार्यालयात रूजू न होताच दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी अथवा त्यानंतर नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाला किंवा मृत्यू पावला असेल तर त्याला नियम ७ खालील टीप १ (दोन) नुसार केवळ निवृत्तिवेतनविषयक नियमांन्वये अनुज्ञेय असलेले सेवानिवृत्तिवेतनविषयक लाभ मंजूर करण्यासाठी त्याची सुधारित वेतन संरचनेत काल्पनिकरित्या वेतननिश्चिती करण्यात यावी, मात्र अशा प्रकरणी शासकीय कर्मचारी असाधारण रजेवर असल्याने त्याला काल्पनिक वेतनवाढ तसेच सुधारित वेतन संरचनेतील काल्पनिक वेतननिश्चितीच्या परिणामी कोणतीही थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

(क) शासकीय कर्मचारी दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वी वैद्यकीय कारणांखेरीज अन्य कारणांस्तव असाधारण रजेवर असेल आणि कार्यालयात रूजू न होताच दिनांक १ जानेवारी,

२०१६ रोजी अथवा त्यानंतर सेवानिवृत्त झाला असेल तर त्यास सुधारित वेतन संरचनेचे लाभ अनुज्ञेय असणार नाहीत. तथापि, लागू असणाऱ्या प्रचलित सेवानिवृत्ति नियमांन्वये अनुज्ञेय असल्यास सेवानिवृत्तिवेतनविषयक लाभ असुधारित वेतन संरचनेनुसार देण्यात यावेत.

**७.६** (१) नियम ७ च्या पोटनियम (१) (अ) च्या परंतुकामध्ये विद्यमान वेतन संरचनेत सलग दोन पेक्षा अधिक टप्प्यांवर वेतन घेणाऱ्या ज्या कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेत एकच वेतन देय होते (वेतने एकवटतात), त्यांच्या बाबतीत अशी एकवटता दूर करण्यासाठी विद्यमान वेतन संरचनेतील एकवटणाऱ्या प्रत्येक दोन टप्प्यांसाठी सुधारित वेतन बँडमध्ये एक वेतनवाढ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र अशी वेतनवाढ (ढी) दिल्यामुळे सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तराच्या कमाल टप्प्यापेक्षा अधिक वेतन अनुज्ञेय असणार नाही.

प्रस्तुत तरतूद ६ व्या वेतन आयोगातील वेतन एकवटण्यासंदर्भातील तरतूदींच्या तुलनेत पूर्णत: स्वतंत्र तरतूद आहे.

वरील परंतुकाच्या प्रयोजनार्थ, दोन शासकीय कर्मचाऱ्यांच्या विद्यमान वेतन संरचनेतील (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) वेतनांपैकी उच्च वेतन हे निम्न वेतनापेक्षा किमान ३% पेक्षा अधिक असेल तर ते दोन वेतन टप्पे ठरतील; जेथे हा फरक ३% पेक्षा कमी असेल त्या प्रकरणी ते दोन वेतन टप्पे ठरणार नसल्याने वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर १२०९/ प्र.क्र.२७ / सेवा ९, दिनांक २२ एप्रिल, २००९ अन्वये प्रकाशित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या (इंग्रजी भाषांतरासोबत) जोडपत्र - तीन मध्ये दर्शविलेल्या विद्यमान वेतन संरचनेतील (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) नियुक्तीच्या किमान वेतनापेक्षा कमी असणारे सर्व वेतन टप्पे, वेतनांचे एकवटणे निश्चित करण्यासाठी विचारात घेऊ नयेत.

उदाहरण : -१ :-

| ६ व्या वेतन आयोगातील वेतन संरचना (पीबी - ४ आणि ग्रेड वेतन रु. ८९०० | ७ व्या वेतन आयोगातील वेतन मॅट्रिक्समध्ये वेतननिश्चिती (वेतन स्तर - एस - २९) (रु.) | | |
|---|---|---|---|
| वेतन (रु.) | २.५७ ने गुणून येणारे वेतन | दि. १ जानेवारी, २०१६ रोजी निश्चित केलेले वेतन | अभिप्राय |
| कर्मचारी **'क्ष'** - ४९२०० | १२६४४४ | १३११०० | --- |
| कर्मचारी **'य'** - ५०५०० (५०५०० - ४९२०० = १३०० हा दोन वेतन टप्प्यांमधील फरक ४९२००च्या ३% पेक्षा कमी आहे.) | १,२९,७८५ | १३११०० | (दोन वेतन टप्पे एकवटत नाहीत. त्यामुळे वेतनवाढ अनुज्ञेय नाही.) |

उदाहरण : -२ :-

| ६ व्या वेतन आयोगातील वेतन संरचना (पीबी - ४ आणि ग्रेड वेतन रु. ८९०० | ७ व्या वेतन आयोगातील वेतन मॅट्रिक्समध्ये वेतननिश्चिती (वेतन स्तर - एस - २९) (रु.) | | |
|---|---|---|---|
| वेतन (रु.) | २.५७ ने गुणून येणारे वेतन | दि. १ जानेवारी, २०१६ रोजी निश्चित केलेले वेतन | वेतन एकवटल्यानंतरचे वेतन (Pay after bunching) |
| कर्मचारी **'क्ष'** ४९२०० | १२६४४४ | १३११०० | १३११०० |
| कर्मचारी **'य'** ५०७१० [५०७१० आणि ४९२०० या दोन वेतन रकमांमधील फरक ४९२०० च्या ३ % पेक्षा जास्त आहे. त्यामुळे ते २ वेतन टप्पे ठरतात. [४९२०० + १४८० (४९२०० च्या ३%) = ५०६८० पेक्षा ५०७१० ही रक्कम जास्त आहे] | १,३०,२४८ | १३११०० | १३५००० (दोन वेतन टप्पे एकवटतात त्यामुळे १३११०० च्या पुढे १ **वेतनवाढ अनुज्ञेय आहे.**) |

उदाहरण -३ :-

| ६ व्या वेतन आयोगातील वेतन संरचना (पीबी - ४ आणि ग्रेड वेतन रु. ८९०० | ७ व्या वेतन आयोगातील वेतन मॅट्रिक्समध्ये वेतननिश्चिती (वेतन स्तर - एस - २९) (रु.) | | |
|---|---|---|---|
| वेतन (रु.) | २.५७ ने गुणून येणारे वेतन | दि. १ जानेवारी, २०१६ रोजी निश्चित केलेले वेतन | वेतन एकवटल्यानंतरचे वेतन (Pay after bunching) |
| कर्मचारी **'क्ष'** ४९२०० | १२६४४४ | १३११०० | १३११०० |
| कर्मचारी **'य'** ५०७१० [५०७१० आणि ४९२०० या दोन वेतन टप्प्यांमधील फरक ४९२०० च्या ३ % पेक्षा जास्त आहे. त्यामुळे ते २ वेतन टप्पे ठरतात. [४९२०० + १४८० (४९२०० च्या ३%) = ५०६८० पेक्षा ५०७१० ही रक्कम जास्त आहे] | १३०२४८ | १३११०० | १३५००० (दोन वेतन टप्पे एकवटतात त्यामुळे १३११०० च्या पुढे १ **वेतनवाढ अनुज्ञेय आहे.**) |
| कर्मचारी **'र'** ५२२६० (५०७१० + ५०७१० च्या ३% पेक्षा जास्त ) | १३४३०९ | १३५००० | १३५००० **वेतनवाढ अनुज्ञेय नाही.*** |

*** टीप- कर्मचारी 'य' आणि 'र' हे असुधारित वेतन संरचनेत दोन वेगवेगळ्या वेतनटप्प्यांवर वेतन घेत असून त्या दोन वेतन टप्प्यांमधील फरक ३% पेक्षा जास्त असला तरी ते दोन वेतन टप्पे सुधारित वेतन संरचनेत एकवटत नसल्याने वरील उदाहरणात कर्मचारी 'र' यास वेतनवाढ अनुज्ञेय नाही.**

(२) जे कर्मचारी दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी विद्यमान वेतन संरचनेतील वेतनबँडच्या अथवा वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर दोन वर्षे वा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी नियमित वेतनवाढी अभावी कुंठित झाले असतील, त्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी सुधारित वेतन संरचनेत कुंठिततेच्या प्रत्येकी दोन वर्षासाठी एक वेतनवाढ देण्यात यावी; म्हणजेच एखादा कर्मचारी कमाल टप्प्यावर चार वर्षे कुंठित झाल्यास त्याला दोन वेतनवाढी देण्यात याव्यात. मात्र अशी वेतनवाढ (ढी) दिल्यामुळे सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तराच्या कमाल टप्प्यापेक्षा अधिक वेतन अनुज्ञेय असणार नाही. त्यानंतर पुढील वेतनवाढ मंजूर करण्यासाठी नियम १० मधील तरतूदी लागू राहतील.

उदाहरण:-

| वेतनबँड आणि ग्रेड वेतन | पीबी-४ (रू. ३७४००-६७०००) + ग्रेड वेतन रू. ८९०० | पीबी-४ (रू. ३७४००-६७०००) ग्रेड वेतन रु. १०००० |
|---|---|---|
| अनुज्ञेय वेतनबँड आणि ग्रेड वेतनाचा कमाल टप्पा (रु.) | ६७०००+८९००= ७५९०० | ६७०००+१००००= ७७००० |
| अनुज्ञेय वेतनबँड आणि ग्रेड वेतनाच्या कमाल टप्प्यावर वेतन निश्चित केल्याचा दिनांक | ०१.०७.२०१४ | ०१.०७.२०१३ |
| सुधारित वेतन मॅट्रिक्समधील अनुज्ञेय वेतन स्तरामध्ये निश्चित केलेले सुधारित वेतन (रु.) | १९८३०० (७५९०० x २.५७ = १९५०६३ च्या पुढील टप्पा) | १९९६०० (७७००० x २.५७ = १९७८९० च्या पुढील टप्पा) |
| दि. १ जानेवारी, २०१६ रोजी अनुज्ञेय वेतनबँड आणि ग्रेड वेतनाच्या कमाल टप्प्यावर पूर्ण झालेली सेवा | १ वर्ष व ६ महिने | २ वर्ष व ६ महिने |
| दि. १ जानेवारी, २०१६ रोजी मंजूर करावयाच्या वेतनवाढी | **निरंक** | ०१ |
| दि. १ जानेवारी, २०१६ रोजी कुंठीत वेतनवाढ दिल्यानंतरचे सुधारित वेतन (रु.) | **१९८३००** | **२०५६००** |

**टीप :- वेतनबँड -१ एस, पीबी- १, पीबी-२ आणि पीबी-३ मध्ये वेतनबँडच्या कमाल टप्प्यावर १ वर्ष वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास लगतचा उच्च वेतनबँड मंजूर करण्याची तरतूद महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ मध्ये आहे. मात्र अशी तरतूद वेतनबँड पीबी -४ करिता त्या नियमांमध्ये नाही. त्यामुळे वेतनबँड पीबी -४ वगळता वरील अन्य चारही वेतनबँडमध्ये कमाल टप्प्यावर २ वर्षे अथवा त्यापेक्षा अधिक काळ वेतन घेण्याची स्थिती उद्भवणार नसल्याने सुधारित**

**वेतन संरचनेत कुंठिततेच्या प्रत्येकी दोन वर्षांसाठी एक वेतनवाढ देण्याची तरतूद केवळ वेतनबँड पीबी -४ करिता लागू आहे.**

**७.७** दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेले किंवा त्या दिनांकास किंवा त्यानंतर पदोन्नतीमुळे /समावेशनामुळे दुसऱ्या पदावर नियुक्त झालेले शासकीय कर्मचारी या नियमांच्या नियम ५ खालील परंतुकान्वये अनुज्ञेय असलेला विद्यमान वेतनश्रेणी ठेवण्याबाबतचा विकल्प देण्यास पात्र नाहीत. ते फक्त सुधारित वेतन संरचनेतच वेतन घेण्यास पात्र राहतील. अशा काही प्रकरणी सुधारित वेतन संरचनेमध्ये पूर्वलक्षी प्रभावाने वेतननिश्चिती केल्यामुळे होणारे प्रतिकूल परिणाम टाळण्याच्या दृष्टीने, वेतन सरंचना सुधारल्याच्या आदेशाच्या दिनांकाला विद्यमान वेतन संरचनेत प्रत्यक्षात घेतलेली विद्यमान वित्तलब्धी आणि सुधारित वित्तलब्धी यामधील फरक वैयक्तिक वेतन म्हणून देण्यात यावे आणि वेतनाच्या पुढील वाढीमध्ये ते सामावून घेण्यात यावे.

**७.८** दि. १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत शासकीय कर्मचाऱ्यास पदोन्नती मिळाली असेल आणि त्याने पदोन्नतीच्या दिनांकापासून पदोन्नतीपूर्वीच्या पदाची सुधारित वेतन संरचना स्वीकारण्याचा तसेच पदोन्नतीच्या दिनांकापासूनच पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती करण्याचा विकल्प दिला असेल तर, अशा प्रकरणी **पदोन्नतीच्या दिनांकास प्रथमत: पदोन्नतीपूर्वीच्या पदाची ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतन संरचना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यात यावी.** तद्नंतर पदोन्नतीच्या पदावरील त्याची वेतननिश्चिती पदोन्नतीच्या पदाच्या सुधारित वेतन संरचनेतच (७ व्या वेतन आयोगाच्या) करण्यात यावी.

उदाहरण :-

| | |
|---|---|
| १ | पदोन्नतीपूर्वीच्या निम्न पदाची असुधारित वेतन संरचना: वेतनबँड पीबी -१: रू. ५२००-२०२०० + ग्रेड वेतन: रू. २४०० |
| २ | पदोन्नतीपूर्वीच्या निम्न पदाचे मूळ वेतन रु. ११४८० (वेतनबँडमधील वेतन रु. ९०८०+ ग्रेड वेतन: रू. २४००) |
| ३ | पदोन्नतीपूर्वीच्या निम्न पदाची सुधारित वेतन संरचना: वेतन स्तर-एस- ८ |
| ४ | पदोन्नतीचा दिनांक: उदाहरणार्थ दि. ११ एप्रिल, २०१६ |

| **वेतनबँड** | **पीबी -१: रू. ५२००-२०२००** | |
|---|---|---|
| **ग्रेड वेतन: रू.** | **२४००** | **२८००** |
| **स्तर** | **एस-८** | **एस-१०** |
| १. | २५५०० | **२९२००** |

| | |
|---|---|
| ५ | पदोन्नतीच्या पदाची पदाची असुधारित वेतन संरचना: वेतनबँड पीबी -१: रू. ५२००-२०२०० + ग्रेड वेतन: रू. २८०० |
| ६ | पदोन्नतीच्या पदाची पदाची सुधारित वेतन संरचना: वेतन स्तर-एस- १० |
| ७ | **दि. ११ एप्रिल, २०१६ या पदोन्नतीच्या दिनांकास वेतन स्तर एस- ८ या सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती: रु. २९६००**/- (११४८० x २.५७ = २९५०३.६- नजीकच्या रूपयात पूर्णांकित करून रू. २९५०४ /- च्या लगतच्या पुढील सेलमधील रक्कम) |
| ८ | पदोन्नतीच्या पदावरील **दि. ११ एप्रिल, २०१६ रोजी** वेतननिश्चिती: (नियम -१३ नुसार) |
| | (१) वरील क्रमांक ७ नुसार पदोन्नतीपूर्वीच्या निम्न पदाचे वेतन स्तर-एस- ८ या सुधारित वेतन संरचनेतील वेतन: रु. २९६०० |
| | (२) नियम -१३ नुसार वेतन स्तर-एस- ८ मध्ये एक वेतनवाढ देऊन येणारे वेतन: **रु. ३०५००/-** |
| | (३) पदोन्नतीच्या एस- १० या वेतन स्तरामध्ये निश्चित होणारे वेतन: (रू. ३०५०० इतकी किंवा त्या लगतची वेतन स्तर एस- १० मधील पुढील सेलमधील रक्कम) **रु. ३१०००/-** |
| | (४) पदोन्नतीच्या पदावर एस- १० या वेतन स्तरामध्ये पुढील वेतनवाढ: **दि. १ जानेवारी, २०१७** |

| | | |
|---|---|---|
| २. | २६३०० | ३०१०० |
| ३. | २७१०० | **३१०००** |
| ४. | २७९०० | ३१९०० |
| ५. | २८७०० | ३२९०० |
| ६. | **२९६००** | ३३९०० |
| ७. | **३०५००** | ३४९०० |
| ८. | ३१४०० | ३५९०० |
| ९. | ३२३०० | ३७००० |

**७.९** (१) शासकीय कर्मचाऱ्याने दिनांक १ जानेवारी, २०१६ ते महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ अधिसूचित होण्याच्या दिनांकादरम्यानच्या कालावधीतील वेतननिश्चितीसाठी (म्हणजे वेतननिश्चितीचा दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ जानेवारी, २०१९ या कालावधीतील असेल) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ११

अन्वये यापूर्वी विकल्प दिला असल्यास संबंधित कर्मचाऱ्यास सुधारित विकल्प देण्याची मुभा राहील. तसेच ज्यांनी वरील कालावधीतील वेतननिश्चितीसाठी असा विकल्प दिला नसेल तर अशा कर्मचाऱ्यांनाही बदललेल्या परिस्थितीत वेतननिश्चितीचा विकल्प देण्याची मुभा राहील.

(२) दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वी कर्मचाऱ्यास पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ गिळाल्यानंतर त्याने महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ११ (१) (दोन) किंवा नियम ११ (२) (दोन) नुसार पुढील वेतनवाढीच्या दिनांकास वेतननिश्चितीचा विकल्प दिला असेल आणि त्याची निम्न पदावरील/निम्न वेतन संरचनेतील पुढील वेतनवाढ दिनांक १ जानेवारी, २०१६ नंतर येत असेल, तर अशा कर्मचाऱ्यास सुध्दा सुधारित विकल्प देण्याची मुभा देण्यात यावी, असा विकल्प महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ अधिसूचित झाल्यापासून ३० दिवसांत म्हणजे दिनांक २ मार्च, २०१९ पर्यंत देणे आवश्यक राहील.

(३) सुधारित वेतन संरचनेमध्ये पूर्वलक्षी प्रभावाने वेतननिश्चिती करण्यात येत असल्याने बदललेली स्थिती विचारात घेऊन वरील (१) व (२) प्रमाणे सुधारित विकल्प देण्याची मूभा देण्यात येत आहे. त्यामुळे, ज्या कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी, २०१६ पूर्वी पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वारित प्रगती योजनेचा लाभ मिळाला असेल आणि त्यांच्या पदोन्नतीच्या पदावरील अंतिम वेतननिश्चितीचा अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मंजूर वेतन संरचनेतील अंतिम वेतननिश्चितीचा दिनांक हा दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वीचाच असेल म्हणजेच या वेतननिश्चितीचा सुधारित वेतन संरचनेशी संबंध नसेल तर अशा कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चितीच्या आनुषंगाने विकल्प/ सुधारित विकल्प देता येणार नाही. (याबाबतचे आदेश दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ जानेवारी, २०१९ या कालावधीत निर्गमित केले असले तरी)

उदाहरणार्थ, एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यास दिनांक १५ मार्च, २०१५ पासून सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत पदोन्नतीच्या पदाची / वरिष्ठ वेतन संरचना मंजूर करण्याचे आदेश दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ जानेवारी, २०१९ या कालावधीत निर्गमित केले असतील आणि त्या आदेशांच्या आनुषंगाने शासकीय कर्मचाऱ्याने वेतननिश्चिती करण्याचा विकल्प दिला नसेल अथवा दिनांक १५ मार्च, २०१५ पासून अथवा दि. १ जुलै, २०१५ पुढील रोजीची पुढील वेतनवाढ घेऊन वेतननिश्चिती करण्याचा विकल्प दिला असेल तर, अशा प्रकरणी वेतननिश्चितीची प्रक्रिया दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वीच असुधारित वेतन संरचनेतच पूर्ण झालेली असल्याने पुन्हा सुधारित विकल्प देता येणार नाही.

**८. नियम ८ - दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी व त्यानंतर सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती -**

दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी व त्यानंतर सेवेत नियुक्त झालेले कर्मचारी केवळ सुधारित वेतन संरचनेतच वेतन घेण्यास पात्र राहतील.

दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्याचे वेतन, त्याला ज्या पदावर नियुक्त करण्यात येईल त्या पदाच्या वेतन स्तराच्या किमान वेतनावर/वेतन स्तरातील पहिल्या सेलमधील वेतनावर निश्चित करण्यात यावे.

परंतु, दिनांक १ जानेवारी २०१६ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ निर्गमित झाल्याच्या दिनांकादरम्यान नियुक्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांची विद्यमान वित्तलब्धी ही सुधारित वेतन संरचनेनुसार निश्चित होणारे वेतन आणि त्यावरील महागाई भत्त्यापेक्षा अधिक असेल तर सदर फरकाची रक्कम वैयक्तिक वेतन म्हणून देण्यात यावी आणि ती वेतनातील पुढील वाढीमध्ये सामावून घेण्यात यावी.

**९. नियम ९ - सुधारित वेतन संरचनेतील वेतनवाढ.**

या नियमातील तरतूद स्वयंस्पष्ट आहे.

**१०. नियम १० - सुधारित वेतन संरचनेमध्ये पुढील वेतनवाढीचा दिनांक.**

सुधारित वेतन संरचनेमध्ये वेतनवाढ कशा प्रकारे विनियमित करावी याबाबतची पध्दती या नियमामध्ये विहित केली आहे.

**(१)** नियम १० (१) नुसार सुधारित वेतन संरचनेमध्ये दि. १ जानेवारी, २०१६ नंतर वेतनवाढीचे १ जानेवारी आणि १ जुलै हे दोन दिनांक राहतील. परंतु, शासकीय कर्मचाऱ्यांस १ जानेवारी किंवा १ जुलै यापैकी एकाच दिनांकास वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहील: वेतनवाढ कोणत्या दिनांकास अनुज्ञेय होईल, ही बाब शासकीय कर्मचाऱ्याची नियुक्ती, पदोन्नती अथवा आर्थिक श्रेणीवाढ या प्रसंगी होणाऱ्या त्याच्या वेतननिश्चितीच्या दिनांकाच्या आनुषंगाने या नियमानुसार निश्चित होईल.

**<u>शासकीय कर्मचाऱ्यास स्वेच्छेने वेतनवाढीचा दिनांक निवडण्याचा विकल्प असणार नाही.</u>**

**(२) नियम १० (२)** - दिनांक २ जानेवारी आणि ३० जून (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत नियुक्त किंवा पदोन्नत झालेल्या किंवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसह अन्य आर्थिक श्रेणीवाढ झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास दिनांक १ जुलै रोजी कोणतीही वेतनवाढ (निम्न पदावरील / निम्न श्रेणीतील वेतनवाढदेखील) मिळाली नसेल तर त्याला पुढील वर्षाच्या १ जानेवारी रोजी वेतनवाढ देण्यात यावी. जर त्याला १ जुलै रोजी वेतनवाढ मिळाली असेल तर त्याला पुढील वर्षाच्या १ जुलै रोजी वेतनवाढ देण्यात यावी.

तसेच दिनांक २ जुलै आणि ३१ डिसेंबर (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत नियुक्त किंवा पदोन्नत झालेल्या किंवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसह अन्य आर्थिक श्रेणीवाढ झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास दिनांक १ जानेवारी रोजी कोणतीही वेतनवाढ (निम्न पदावरील / निम्न श्रेणीतील वेतनवाढदेखील) मिळाली नसेल तर त्याला पुढील वर्षाच्या १ जुलै रोजी वेतनवाढ देण्यात यावी. जर त्याला १ जानेवारी रोजी वेतनवाढ मिळाली असेल तर त्याला पुढील वर्षाच्या १ जानेवारी रोजी वेतनवाढ देण्यात यावी.

(३) **नियम १० (३)** - दिनांक १ जानेवारी किंवा १ जुलै रोजी शासकीय कर्मचाऱ्यास पदोन्नती मिळाली असेल किंवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसह अन्य आर्थिक श्रेणीवाढ मंजूर केली असेल आणि नियम १३ अन्वये पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय वेतन स्तरामध्ये वेतननिश्चिती केली असेल आणि त्याला दिनांक १ जानेवारी किंवा १ जुलै रोजी कोणतीही वेतनवाढ (निम्न पदावरील / निम्न श्रेणीतील वेतनवाढदेखील) मिळाली नसेल तर, अशा प्रकरणी पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय वेतन स्तरामध्ये प्रथम वेतनवाढ यथास्थिती, पुढील १ जुलै अथवा १ जानेवारी रोजी देय राहील, परंतु यासाठी सहा महिन्यांच्या अर्हताकारी सेवेची पूर्तता अनिवार्य राहील. तथापि, त्यानंतरची पुढील वेतनवाढ एक वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतरच देय राहील.

(४) दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ज्या वेतन स्तरामध्ये १ जानेवारी, २०१६ रोजी वेतननिश्चिती केली आहे, त्या स्तरातील त्यांची पुढील वेतनवाढ १ जुलै, २०१६ रोजी देय होईल.

मात्र दिनांक १ जुलै, २०१६ रोजी वेतनवाढ दिल्यानंतर त्यापुढील वेतनवाढ १ वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतर दिनांक १ जुलै, २०१७ रोजी देय होईल.

(५) महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ हे दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून अंमलात आले असल्याने **दिनांक २ जानेवारी, २०१५ ते दिनांक १ जुलै, २०१५ या कालावधीत शासकीय कर्मचाऱ्याची नियुक्ती, पदोन्नती अथवा आर्थिक श्रेणीवाढ झाली असेल तर त्यास दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.**

**११. नियम ११ - दिनांक १ जानेवारी, २०१६ च्या नंतर सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती.**

या नियमातील तरतूद स्वयंस्पष्ट आहे.

**१२. नियम १२ - दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वी धारण केलेल्या पदावर त्या दिनांकानंतर पूर्ननियुक्ती झाल्यानंतर वेतननिश्चिती.**

या नियमातील तरतूद स्वयंस्पष्ट आहे.

**१३. नियम १३ - दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी व त्यानंतरच्या पदोन्नतीच्या आनुषंगाने वेतननिश्चिती.**

या नियमामध्ये पदोन्नतीच्या आनुषंगाने वेतननिश्चिती कशाप्रकारे करण्यात यावी, हे उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आले आहे.

(१) दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर पदोन्नत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास त्याची पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती पदोन्नतीच्या दिनांकापासून अथवा सुधारित वेतनसंरचनेतील वेतनवाढीच्या दिनांकापासून करण्याचा विकल्प देण्याची तरतूद या नियमामध्ये आहे. दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३० जानेवारी, २०१९ या कालावधीत पदोन्नत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चितीचा सुधारित विकल्प **दिनांक २ मार्च, २०१९ पर्यंत** देता येईल.

(२) ज्या प्रकरणी पदोन्नतीचे पद हे अधिक कर्तव्ये व जबाबदारीचे असेल आणि पदोन्नतीच्या दिनांकास वेतननिश्चिती करण्याचा विकल्प दिला असेल तर पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील नियम १३ व त्यामध्ये दर्शविलेल्या उदाहरणांप्रमाणे पुढीलप्रमाणे करण्यात यावी:-

दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर पदोन्नत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत तो ज्या पदावरून पदोन्नत होईल त्या पदाच्या वेतन स्तरामध्ये एक वेतनवाढ देण्यात यावी आणि अशा प्रकारे येणारी रक्कम पदोन्नतीच्या पदाच्या वेतन स्तराच्या सेलमध्ये असल्यास त्या रकमेवर वेतननिश्चिती करण्यात यावी, मात्र अशी सेल पदोन्नतीच्या पदाच्या वेतन स्तरामध्ये उपलब्ध नसल्यास लगतच्या पुढील सेल मधील उच्च वेतनावर वेतननिश्चिती करण्यात यावी.

(अ) जर शासकीय कर्मचाऱ्याची पदोन्नती दिनांक २ जानेवारी, २०१६ ते ३० जून, २०१६ या कालावधीत झाली असेल आणि पदोन्नतीच्या दिनांकास वेतननिश्चिती करण्याचा विकल्प दिला असेल आणि दिनांक १ जुलै, २०१६ रोजी त्याला कोणतीही वेतनवाढ मिळाली नसेल तर त्याला पदोन्नतीच्या पदावरील प्रथम वेतनवाढ दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी देण्यात यावी. जर त्याला १ जुलै रोजी वेतनवाढ मिळाली असेल तर त्याला दिनांक १ जुलै, २०१७ रोजी पुढील वेतनवाढ देण्यात यावी.

(ब) शासकीय कर्मचाऱ्याची पदोन्नती दिनांक २ जानेवारी, २०१६ ते ३० जून, २०१६ या कालावधीत झाली असेल आणि त्याने त्याच्या पदोन्नतीपूर्वीच्या पदाची दिनांक १ जुलै, २०१६ रोजी अनुज्ञेय असलेली नियमित वेतनवाढ घेऊन पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती करण्याचा विकल्प दिला असेल, तर त्याची पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती पुढीलप्रमाणे होईल:-

(i) पदोन्नतीच्या दिनांकापासून दिनांक १ जुलै, २०१६ या पुढील वेतनवाढीच्या तारखेपर्यंत त्याचे वेतन तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीच्या पदाच्या वेतन स्तरातील लगतच्या पुढील सेलमधील रकमेवर निश्चित करण्यात यावे.

**उदाहरण:-**

| | |
|---|---|
| १ | सुधारित वेतन संरचनेतील वेतन स्तर: एस-८ |
| २ | सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन (वेतन स्तर-एस- ८): रू. २९६०० |
| ३ | पदोन्नतीनंतर मंजूर वेतन स्तर : एस-१० |
| ४ | एस-१० या वरिष्ठ वेतन स्तरामधील वेतन: (वेतन स्तर एस-१० मधील रू. २९६०० च्या लगतच्या पुढील सेल मधील रक्कम) रू. **३०१००** |
| ५ | पदोन्नतीच्या दिनांकापासून ते दिनांक १ जुलै, २०१६ या पुढील वेतनवाढीच्या दिनांकापर्यंतचे वेतन: रू. **३०१००** |

| **वेतनबँड** | **पीबी -१: रू. ५२००-२०२००** | |
|---|---|---|
| **ग्रेड वेतन: रू.** | **२४००** | **२८००** |
| **स्तर** | **एस-८** | **एस-१०** |
| १. | २५५०० | २९२०० |
| २. | २६३०० | **३०१००** |
| ३. | २७१०० | ३१००० |
| ४. | २७९०० | ३१९०० |
| ५. | २८७०० | ३२९०० |
| ६. | २९६०० | ३३९०० |
| ७. | ३०५०० | ३४९०० |

(ii) तद्नंतर वेतनवाढीच्या दिनांकास (दिनांक १ जुलै, २०१६) या शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन पदोन्नतीच्या वेतन स्तरामध्ये पुढीलप्रमाणे पुनर्निश्चित करण्यात यावे:-

शासकीय कर्मचारी ज्या पदावरू.न पदोन्नत झाला आहे त्या पदाच्या वेतन स्तरामध्ये २ वेतनवाढी (एक नियमित वार्षिक वेतनवाढ आणि दूसरी पदोन्नतीची वेतनवाढ) देण्यात याव्यात आणि अशा प्रकारे वेतनवाढी देऊन येणारी रक्कम पदोन्नतीच्या पदाच्या वेतन स्तराच्या सेलमध्ये असल्यास त्या रकमेवर वेतननिश्चिती करण्यात यावी. मात्र पदोन्नतीच्या पदाच्या वेतन स्तरामध्ये अशी सेल उपलब्ध नसल्यास लगतच्या पुढील सेल मधील उच्च वेतनावर वेतननिश्चिती करण्यात यावी.

**उदाहरण:-**

| | |
|---|---|
| १ | सुधारित वेतन संरचनेतील वेतन स्तर: एस-८ |
| २ | सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन (वेतन स्तर-एस- ८): रू. २९६०० |
| ३ | पदोन्नतीनंतर मंजूर वेतन स्तर : एस-१० |

| **वेतनबँड** | **पीबी -१: रू. ५२००-२०२००** | |
|---|---|---|
| **ग्रेड वेतन: रू.** | **२४००** | **२८००** |
| **स्तर** | **एस-८** | **एस-१०** |

| | |
|---|---|
| ४ | पदोन्नतीच्या दिनांकापासून ते पुढील वेतनवाढीच्या दिनांकापर्यंतचे वेतन: रू ३०१०० |
| ५ | वेतनवाढीच्या दिनांकास वेतन पुनर्निश्चिती: वेतन स्तर एस- ८ मध्ये २ वेतनवाढी दिल्यानंतर येणारे वेतन: रू. ३१४०० |
| ६ | पदोन्नतीच्या एस- १० या वेतन स्तरामध्ये (दिनांक १ जुलै, २०१६ रोजी) निश्चित होणारे वेतन: (रू. ३१४०० इतकी किंवा त्या लगतची एस-१० या वेतन स्तरामधील पुढील सेलमधील रक्कम) **रू. ३१९००** |
| ७ | **पदोन्नतीच्या पदावरील पुढील वेतनवाढीचा दिनांक: १ जुलै, २०१७** |

| | | |
|---|---|---|
| १. | २५५०० | २९२०० |
| २. | २६३०० | ३०१०० |
| ३. | २७१०० | ३१००० |
| ४. | २७९०० | **३१९००** |
| ५. | २८७०० | ३२९०० |
| ६. | **२९६००** | ३३९०० |
| ७. | **३०५००** | ३४९०० |
| ८. | **३१४००** | ३५९०० |
| ९. | ३२३०० | ३७००० |
| | | |

**या प्रकरणी दिनांक १ जुलै, २०१६ रोजी वेतनवाढ मिळालेली असल्याने पदोन्नतीच्या पदावरील पुढील वेतनवाढीचा दिनांक १ जुलै, २०१७ हा राहील.**

(३) काही संवर्गांना विशिष्ठ वर्षांच्या सेवेनंतर अकार्यात्मक वेतन स्तर मंजूर करण्यात येतो. अशा प्रकरणी वरील परिच्छेद ७.९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यास अकार्यात्मक वेतन स्तर स्वीकारण्याच्या दिनांकाचा सुधारित विकल्प देता येईल.

अकार्यात्मक वेतन स्तरातील वेतननिश्चिती पुढीलप्रमाणे करण्यात यावी:-

(i) शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाच्या मूळ वेतन स्तरामधील (अकार्यात्मक वेतन स्तर मंजूरीपूर्वीच्या) त्याच्या मूळ वेतनाइतकी रक्कम अकार्यात्मक वेतन स्तरातील सेलमध्ये असल्यास त्या रकमेवर वेतननिश्चिती करण्यात यावी. अशा प्रकरणी वेतनात वाढ होत नसल्याने अकार्यात्मक वेतन स्तर मंजूरीपूर्वीच्या वेतन स्तरामध्ये त्याला ज्या दिनांकास वेतनवाढ मिळाली असती त्याच दिनांकास त्याला पुढील वेतनवाढ मिळेल.

(ii) शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाच्या मूळ वेतन स्तरामधील (अकार्यात्मक वेतन स्तर मंजूरीपूर्वीच्या) त्याच्या मूळ वेतनाइतकी रक्कम अकार्यात्मक वेतन स्तरातील सेलमध्ये नसल्यास मूळ वेतनाच्या लगतच्या पुढील सेलमधील रकमेवर वेतननिश्चिती करण्यात यावी. अशा प्रकरणी नियम १० मधील तरतुदींनुसार त्याला वेतनवाढ देय होईल.

(४) नियम १३ नुसार वेतननिश्चिती केल्यानंतर पुढील वेतनवाढ त्याचप्रमाणे पुढील वेतनवाढीचा दिनांक नियम १० मधील तरतूदींनुसार विनियमित होईल.

(५) शासकीय कर्मचाऱ्यांना विहित मुदतीत वेतननिश्चितीचा विकल्प देता यावा यासाठी यापुढे विकल्प देण्याबाबतचा उल्लेख न चुकता पदोन्नतीच्या आदेशात करण्यात यावा, जेणेकरून प्रशासकीय त्रुटीगुळे विकल्प देण्यास विलंब होण्याची प्रकरणे उद्भवणार नाहीत.

**१४. नियम १४ - वेतनाची थकबाकी प्रदान करण्याची पध्दती.**

**१४.१** सुधारित वेतन संरचनेतील वेतन दिनांक १ जानेवारी, २०१९ पासून रोखीने देय आहे. दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंतच्या कालावधीतील थकबाकी, आर्थिक वर्ष २०१९-२०२० पासून पुढील ५ वर्षांत ५ समान हप्त्यांत संबंधित शासकीय कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाची आहे. या संदर्भातील तपशिलवार कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे:-

**(अ)** दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी ज्या प्रकरणी शासकीय कर्मचाऱ्याने भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये अगोदरच दिलेली नियमित वर्गणी सुधारित वेतन संरचनेत निश्चित केलेल्या वेतनाच्या आधारे भविष्य निर्वाह निधी नियमांनुसार विहित केलेल्या किमान वर्गणीपेक्षा कमी पडत असेल तर ती थकबाकीच्या रकमेतून वसूल करण्यात यावी.

**(ब)** भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाच्या थकबाकीची निव्वळ रक्कम खालीलप्रमाणे रकमा वजा/समायोजित करुन काढण्यात यावी :-

(१) वेतनाच्या सुधारित रकमेवर देय असलेली व्यवसाय कराच्या थकबाकीची रक्कम;

(२) शासकीय निवासस्थानामध्ये राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सुधारित वेतनावर देय असणाऱ्या अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम;

(३) दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत शासकीय कर्मचाऱ्याकडून काही शासकीय येणे असल्यास तीचे समायोजन;

**(क)** वेतनाच्या थकबाकीच्या जमा रकमेचा हिशेब ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांना वेगळा खाते क्रमांक देण्यात येणार नाही. यासाठी वर्गणीदारास देण्यात आलेला पूर्वीचाच भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक उपयोगात आणला जाईल. ही रक्कम प्रत्यक्ष जमा केल्यापासून २ वर्षांपर्यंत काढून घेता येणार नसल्यामुळे या रकमांचा हिशेब नियमित भविष्य निर्वाह निधी खात्यापासून वेगळा ठेवण्यात येईल.

उदा. - जर थकबाकीचा पहिला हप्ता जूलै, २०१९ मध्ये भविष्य निर्वाह निधीत जमा करण्यात आला असेल तर ती रक्कम काढून घेण्याचा प्रतिबंधीत कालावधी दिनांक ३० जून, २०२१ रोजी संपुष्टात येईल आणि नंतर जमा करण्यात येणाऱ्या हप्त्यांच्या बाबतीत देखील अशीच कार्यपध्दती राहील.

**(ड)** दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत सेवानिवृत्ति अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त झाल्या असतील, अशा कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून ते सेवेत असलेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील वेतनाची थकबाकी अनुज्ञेय असल्यास, सदर थकबाकी, वरील खंड (अ) व (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा/ समायोजित करुन पाच समान हप्त्यांत पाच वर्षांत रोखीने अदा करण्यात यावी.

**(इ)** थकबाकीचा एक अथवा अधिक हप्ते भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा केल्यानंतर सेवानिवृत्ति अथवा अन्य कारणास्तव सेवा समाप्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, थकबाकीची जमा झालेली रक्कम त्यांच्या नेहमीच्या भविष्य निर्वाह निधी वर्गणीच्या रकमेसोबत प्रचलित कार्यपध्दती नुसार अदा करण्यात यावी. अशा प्रकरणी भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करावयाच्या बाकी असलेल्या हप्त्यांची रक्कम (असल्यास), वरील खंड (अ) व (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा/समायोजित करुन समान हप्त्यात उर्वरित वर्षांत रोखीने अदा करण्यात यावी.

**(फ)** दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याच्या मृत्यूच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील वेतनाच्या थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास, वरील खंड (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा/समायोजित करुन एकाच हप्त्यात त्याच्या अवलंबिताना रोखीने अदा करण्यात यावी. त्याचप्रमाणे थकबाकीचा एक किंवा अधिक हप्ते भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा केल्यानंतर मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत भविष्य निर्वाह निधीत जमा केलेली रक्कम त्याच्या नेहमीच्या भविष्य निर्वाह निधी वर्गणीच्या रकमेसोबत प्रचलित कार्यपध्दतीनुसार अदा करण्यात यावी व जमा करावयाच्या बाकी असलेल्या हप्त्याची / हप्त्यांची रक्कमही त्याच्या अवलंबितांना वरील, खंड (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा / समायोजित करुन एकाच हप्त्यात रोखीने अदा करण्यात यावी.

| उदा.- दि. १ जानेवारी, २०१६ ते दि. ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीतील थकबाकीची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणे | | |
|---|---|---|
| १ | थकबाकीची रक्कम | रुपये ३,००,०००/- |
| २ | वरील खंड (अ) व (ब) नुसार वजा करायाची रक्कम | समजा, रुपये २५,०००/- |
| ३ | थकबाकीची उर्वरित रक्कम [अ.क्र. १ (-) अ.क्र. २ ] | २,७५,०००/- |
| ४ | वार्षिक हप्त्याची रक्कम (अ.क्र. ३ ÷ ५ हप्ते) | रुपये ५५,०००/- |
| ५ | रुपये ५५,०००/- ही थकबाकीच्या हप्त्याची रक्कम सन २०१९ ते २०२३ या पाच वर्षांत दरवर्षी दिनांक १ जुलै रोजी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करण्यात यावी. | |

| | |
|---|---|
| ६ | एखादा कर्मचारी थकबाकीचे दोन हप्ते भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा केल्यानंतर समजा ऑक्टोबर, २०२० मध्ये सेवानिवृत्त झाला तर, भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करावयाचे बाकी असलेले थकबाकीचे तीन हप्ते सन २०२१, २०२२ व २०२३ या वर्षांत रोखीने अदा करण्यात यावेत. अशा प्रकरणी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये अगोदरच जमा केलेली रक्कम सेवानिवृत्तिच्या वेळेस त्यांना देय असलेल्या भविष्य निर्वाह निधीतील अन्य रकमेबरोबरच प्रचलीत कार्यपध्दतीनुसार अदा करण्यात यावी. |

**१४.२** राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू नसल्याने, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

**१४.३** आहरण व संवितरण अधिकाऱ्यांने थकबाकीच्या हप्त्याची रक्कम सन २०१९ पासून दरवर्षी दिनांक १ जुलै रोजी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करावी. भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये त्या - त्या वर्षी जमा करावयाची थकबाकीची रक्कम प्रत्यक्षात कोणत्याही दिनांकास जमा केली असली तरी, त्या वर्षाच्या १ जुलै पासून त्या रकमेवर व्याज देय राहील.

वर नमूद केल्याप्रमाणे भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये थकबाकीची रक्कम प्रत्यक्ष कोणत्याही दिनांकास जमा केली असली तरी, ज्यावर्षी थकबाकीची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करायाची आहे त्या वर्षाच्या १ जुलै पासून त्यावर व्याज देय असल्याने थकबाकीची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये संबंधित वर्षात १ जुलै रोजी जमा केली जाईल याची विभागप्रमुख /कार्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी. या संदर्भात विलंब झाल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल.

**१४.४** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना मंजूर केल्यामुळे होणारा अतिरिक्त खर्च संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यावरील खर्च ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सर्व विभाग प्रमुखांनी आपले अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना या निमित्ताने येणारा अतिरिक्त खर्च विचारात घ्यावा. ही तरतूद योग्य त्या फेरफारांसह जिल्हा परिषदा व अनुदानप्राप्त संस्थांना देखील लागू राहील.

**१४.५** वेतनाच्या थकबाकीच्या हप्त्याची रक्कम संबंधित वर्षाच्या जून महिन्याच्या मासिक वेतन देयकाबरोबर काढण्यात यावी. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी ज्यांचे वेतन आस्थापना देयकावर काढण्यात येते, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्या वेतन देयकात संबंधित वर्षाच्या थकबाकीच्या रकमेची एक वेगळी बाब म्हणून मागणी करावी आणि प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये त्याच्या मासिक वर्गणीबरोबर वेगळी जमा करण्यात यावी. वेतन देयकाला जोडलेल्या विवरणपत्रात भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाच्या थकबाकीच्या रकमेसह थकबाकीचा हप्ता क्रमांक स्पष्टपणे लाल शाईने दाखवावा. एका कार्यालयातून/ विभागातून दुसऱ्या कार्यालय/विभागात बदली झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा

करावयाच्या संबंधित वर्षाच्या थकबाकीच्या हप्त्याची रक्कम, कर्मचारी संबंधित वर्षाच्या दिनांक १ जून रोजी कार्यरत असलेल्या कार्यालयाने काढावी. दिनांक १ जून रोजी अन्य कार्यालयात प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी ज्या कार्यालयात संबंधित वर्षात कर्मचारी कार्यरत होता, त्या कार्यालयाने थकबाकीच्या हप्त्याची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्याबाबतची कार्यवाही करावी.

**१४.६** पूर्व तपासणीच्या अभावी काही थकबाकी चुकीने परिगणित होण्याची शक्यता आहे आणि ती अतिप्रदान म्हणून ठरल्यास त्याची नंतर वसुली करावी लागेल. यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याला सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यापूर्वी नियमांसोबतच्या जोडपत्र - चार अनुसार असे लेखी वचनपत्र द्यावे लागेल की, वेतनाच्या निश्चितीमुळे काही जास्त रक्कम जमा झाली असे आढळून आल्यास ती भविष्यात देय होणाऱ्या रकमेशी समायोजित करुन अथवा इतर प्रकारे शासनास परत करील.

**१५.** सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांनी या परिपत्रकातील सूचना सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात.

**१६.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक **२०१९०२२०१९३०१६४१०५** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Nitin R. Gadre
Date: 2019.02.20 19:42:21 +05'30'

(नितीन गद्रे)

प्रधान सचिव (ले. व को.)

प्रति,

- राज्यपालांचे सचिव
- मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
- अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव
- सभापती / उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
- सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता
- सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
- मंत्रालयीन सर्व विभाग
- मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख.
- प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
- प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
- प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

- आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
- सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
- प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
- सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
- महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
- महालेखापाल-१ (लेखा व अनज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
- महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
- महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
- सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
- सर्व विभागीय आयुक्त
- सर्व जिल्हाधिकारी
- सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
- संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
- मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
- उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंब ई/ पुणे / नागपूर / औरंगाबाद/नाशिक/अमरावती
- निवासी लेखा परीक्षक, मुंबई
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
- लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद
- मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
- बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
- भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी .ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
- भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन,एस.व्ही.पटेल रोड,मुंबई-४
- भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
- इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
- नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन,फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट,मुंबई-२१
- शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
- निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

(शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८ /सेवा-९, दिनांक २० फेबुवारी, २०१९ सोबतचे जोडपत्र)

## जोडपत्र
## Annexure

### महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ अन्वये वेतननिश्चितीबाबतचे विवरणपत्र
### Statement of fixation of pay under Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 2019

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नाव :<br>Name of the office : | |
| २. | शासकीय कर्मचाऱ्याचे नाव :<br>Name of the Government Servant : | |
| ३. | (अ) दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी ज्या पदावर वेतन निश्चित करावयाचे आहे त्याचे पदनाम :<br>Designation of the post in which pay is to be fixed as on 1st January, 2016 : | |
| | (ब) कायम / स्थानापन्न :<br>Substantive / Officiating : | |
| ४. | असुधारित वेतन संरचना (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) किंवा वेतनश्रेणी :<br>Pre-revised Pay Band & Grade Pay or Scale : | |
| ५. | दि. १ जानेवारी, २०१६ रोजी असलेली विद्यमान वित्तलब्धी :<br>Existing emoluments as on 1st January, 2016 : | |
| | (अ) मूळ वेतन ( वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन किंवा अनुज्ञेय श्रेणीतील मूळ वेतन) :<br>Basic Pay (Pay in the applicable Pay Band plus applicable Grade Pay or Basic Pay in the applicable scale ) : | |
| | (ब) दि. १ जानेवारी, २०१६ रोजी मंजूर महागाई भत्ता :<br>Dearness Allowance sanctioned as on 1st January, 2016 : | |
| | (क) एकूण वित्तलब्धी (अ) + (ब) :<br>Total emoluments : | |
| ६. | असुधारित वेतन संरचनेतील दिनांक १ जानेवारी, २०१६ लगतपूर्वीचे मूळ वेतन ( वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन किंवा अनुज्ञेय श्रेणीतील मूळ वेतन) :<br>Basic Pay (Pay in the applicable Pay Band plus applicable Grade Pay or Basic Pay in the applicable scale) in the pre-revised pay structure immediately before 1st January, 2016 : | |
| ७. | अनुक्रमांक ४ येथील असुधारित वेतन संरचना (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) किंवा वेतनश्रेणीशी समकक्ष वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर :<br>Applicable Level in Pay Matrix corresponding to Pay Band & Grade Pay or scale shown at Sr. No. 4 : | |
| ८. | अनुक्रमांक ६ येथील मूळ वेतनास २.५७ ने गुणून येणारी रक्कम :<br>Amount arrived at by multiplying Basic Pay as at Sr. No. 6 by 2.57 : | |
| ९. | अनुज्ञेय वेतन स्तराच्या सेलमधील अनुक्रमांक ८ येथील रकमेइतकी अथवा त्यापुढील रक्कम :<br>Amount in applicable Cell in the Level either equal to or just above the amount at Sr. No. 8 : | |
| १०. | अनुक्रमांक ९ नुसार येणारे सुधारित मूळ वेतन:<br>Revised Basic Pay as per Sr. No. 9 : | |

| | | |
|---|---|---|
| ११ | वेतन एकवटण्याच्या परिणामी मंजूर वेतनवाढ (लागू असल्यास) [नियम ७ (अ) खालील पहिले परंतुक]<br>Grant of Increment on account of Bunching of Pay ( if applicable) [ First proviso to Rule 7(A)] | |
| १२ | नियम ७ (अ) खालील दुसऱ्या परंतुकान्वये कुंठीततेमुळे मंजूर वेतनवाढ (लागू असल्यास)<br>Grant of Increment on account of stagnation under Second proviso to Rule 7(A) ( if applicable) | |
| १३. | कनिष्ठ कर्मचाऱ्याइतके उंचावून दिलेले वेतन, असल्यास (नियम ७ खालील टीप ५ व ८) कनिष्ठ कर्मचाऱ्याचे नाव आणि वेतन स्पष्टपणे दर्शविण्यात यावे. :<br>Stepped up pay with reference to the Revised pay of Junior, if applicable (Note - 5 & 8 under Rule 7) Name & pay of the junior also be indicated distinctly. : | |
| १४. | स्थानापन्न पदाचे वेतन कायम पदाच्या वेतनापेक्षा कमी निश्चित होत असेल अशा प्रकरणी कायम पदाच्या अनुषंगाने निश्चित होणारे सुधारित वेतन, असल्यास [नियम ७ (२)] :<br>Revised pay with reference to the substantive pay in cases where the pay fixed in the officiating post is lower than the pay fixed in the substantive post, if applicable [Rule 7(2)] : | |
| १५. | वैयक्तिक वेतन, असल्यास (नियम ७ खालील टीप ४ व ६) :<br>Personal Pay, if any (Note 4 & 6 under Rule 7) : | |
| १६ | दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी सुधारित वित्तलब्धी :<br>Revised emoluments as on 1st January, 2016 : | |
| | (अ) सुधारित वेतन<br>Revised Pay : | |
| | (ब) महागाई भत्ता (दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी **० %** सुधारित दराने ) :<br>Dearness Allowance ( As per revised rate **0%** as on 1st January, 2016) : | |
| | (क) एकूण वित्तलब्धी (अ) + (ब) :<br>Total emoluments : | |
| १७. | पुढील वेतनवाढीचा दिनांक (नियम १०) आणि वेतनवाढीनंतरचे वेतन :<br>वेतनवाढीचा दिनांक :<br>वेतन मॅट्रिक्समधील अनुज्ञेय वेतन स्तरामध्ये वेतनवाढीनंतरचे वेतन:<br>Date of next increment (Rule10) and pay after grant of increment :<br>Date of Increment :<br>Pay after increment in applicable level of Pay Matrix : | |
| १८. | इतर आनुषंगिक माहिती :<br>Any other relevant Information : | |

दिनांक: कार्यालय प्रमुखाचे पदनाम व स्वाक्षरी (शिक्क्यासहीत)

Date: Signature and Designation of the Head of Office (With Stamp)

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक: वेपुर - २०१९/प्र.क्र.१५/सेवा-९**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक - १४ मे, २०१९

**वाचा:**

१. शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-२०१९ /प्र.क्र. १ /सेवा-९, दिनांक - ३० जानेवारी, २०१९

२. शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८ /सेवा-९, दिनांक - २० फेब्रुवारी, २०१९

३. शासन शासन निर्णयसामान्य प्रशासन विभाग क्रमांक टीआरएफ २००० / प्र. क्र - ३ /बारा, दिनांक - ६ ऑगस्ट,२००२

४. शासन परिपत्रक क्रमांक : सेनिवे २०१३/प्र.क्र.४६/सेवा-४, दि.१७ डिसेंबर, २०१३

५ संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्रमांक: संलेको-२०१९/ कोषा / उले१/एकस्तर/ ७ वावेआ/२०१९/११४, दिनांक - १४ मार्च, २०१९

६. संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्रमांक: संलेवको/वेपप/ प्रतिनियुक्ती/ वेतनिश्चिती/२०१९/३३/१५२४, दिनांक - ९ एप्रिल, २०१९

## परिपत्रक

शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-२०१९ /प्र.क्र.१ /सेवा-९, दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचना व त्यामधील प्रारंभिक वेतननिश्चितीबाबतचे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ प्रसिध्द करण्यात आले आहेत. या नियमांनुसार वेतननिश्चिती करण्याबाबत तसेच त्यानुषंगाने वेतनाची अनुज्ञेय थकबाकी अदा करण्याबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८ /सेवा-९, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तथापि, अद्याप वेतननिश्चितीच्या संदर्भातील विविध मुद्यांबाबत वित्त विभागाकडे विचारणा होत आहे. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे मुद्येनिहाय स्पष्टीकरण करण्यात येत आहे :-

**१. प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती :-**

प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती त्या कर्मचाऱ्याच्या सेवाविषयक (Service Matter) बाबी हाताळण्यास सक्षम असलेले कार्यालय प्रमुख /विभाग प्रमुख / प्रशासकीय विभाग यांनी करावी.

**२. कर्मचाऱ्यांनी दिनांक १ जानेवारी, २०१६ नंतर येणाऱ्या पुढील वेतनवाढीच्या अथवा नंतरच्या कोणत्याही वेतनवाढीच्या दिनांकास सुधारित वेतन संरचना स्वीकारल्यास सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करताना विचारात घ्यायचे मूळ वेतन :-**

दिनांक १ जानेवारी, २०१६ नंतर येणाऱ्या पुढील वेतनवाढीच्या अथवा त्यानंतरच्या कोणत्याही वेतनवाढीच्या दिनांकास सुधारित वेतन संरचना स्वीकृतीचा विकल्प दिल्यास, सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करताना त्या वेतनवाढीच्या दिनांकास त्याला विद्यमान (असुधारीत) वेतन संरचनेत वेतनवाढ मिळाल्यानंतर येणारे मूळ वेतन वेतननिश्चितीसाठी विचारात घेण्यात यावे.

**३. पदोन्नतीच्या / श्रेणीवाढीच्या दिनांकास अथवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अथवा अन्य योजनेंतर्गत वरिष्ठ श्रेणी मिळाल्याच्या दिनांकास सुधारित वेतन संरचना स्वीकृतीचा विकल्प दिलेल्या कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती:-**

याबाबत शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८/सेवा - ९, दिनांक - २० फेब्रुवारी, २०१९ मधील परिच्छेद क्रमांक ७.८ मध्ये सविस्तर स्पष्टीकरण करण्यात आले आहे. त्याकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

तसेच यासंदर्भात पुन्हा असे स्पष्ट करण्यात येते की, अशा प्रकरणी कर्मचारी दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी ज्या विद्यमान वेतन संरचनेत (वेतनबँड व ग्रेड वेतन) वेतन घेतो, ती वेतन संरचना प्रथम महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील नियमांनुसार सुधारित करणे आवश्यक आहे. तद्नंतर पदोन्नती / श्रेणीवाढ अथवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अथवा अन्य योजनेंतर्गत अनुज्ञेय वेतन स्तरामध्ये वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे.

उदाहरण १ :- दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वेतनबँड पीबी - १ : रु. ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रू. २८०० या वेतन संरचनेत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास दिनांक १ जानेवारी, २०१६ नंतर पदोन्नती / श्रेणीवाढीमुळे अथवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अथवा अन्य योजनेंतर्गत वेतनबँड पीबी - २ : रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रू. ४२०० ही वरिष्ठ वेतन संरचना अनुज्ञेय झाली असेल आणि सदर वरिष्ठ वेतन संरचना अनुज्ञेय झाल्याच्या दिनांकास ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचना स्वीकारण्याचा विकल्प दिला असेल तर, प्रथमत: वेतनबँड पीबी - १ : रु. ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रू. २८०० ही वेतन संरचना ७ व्या वेतन आयोगानुसार (२.५७ या वेतननिश्चितीच्या सुत्रानुसार) सुधारित करण्यात यावी, म्हणजेच प्रथम वेतन स्तर एस -१० मध्ये वेतननिश्चिती करण्यात यावी. तद्नंतर वेतन स्तर एस -१३ (वेतनबँड पीबी - २ : रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रू. ४२०० या वरिष्ठ वेतन संरचनेशी समकक्ष) मध्ये वेतननिश्चिती करण्यात यावी.

येथे स्पष्ट करण्यात येते की, प्रथम वेतनबँड पीबी - २ : रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रू. ४२०० या असुधारीत वेतनश्रेणीमध्ये वेतननिश्चिती करून त्यानंतर वेतन स्तर एस -१३ मध्ये २.५७ या वेतननिश्चितीच्या सुत्रानुसार सुधारीत वेतनसंरचनेत वेतननिश्चिती अनुज्ञेय नाही.

उदाहरण २ :- दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वेतनबँड पीबी - ३ : रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रू. ५४०० या वेतन संरचनेत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास दिनांक १ जानेवारी, २०१६ नंतर

पदोन्नती / श्रेणीवाढीमुळे अथवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अथवा अन्य योजनेंतर्गत वेतनबँड पीबी - ३ : रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रू. ६६०० ही वरिष्ठ वेतन संरचना अनुज्ञेय झाली असेल आणि सदर वरिष्ठ वेतन संरचना अनुज्ञेय झाल्याच्या दिनांकास ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचना स्वीकारण्याचा विकल्प दिला असेल तर, प्रथमत: वेतनबँड पीबी - ३ : रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रू. ५४०० ही वेतन संरचना ७ व्या वेतन आयोगानुसार ( २.५७ या वेतननिश्चितीच्या सुत्रानुसार) सुधारित करण्यात यावी, म्हणजेच प्रथम वेतन स्तर एस - २० मध्ये वेतननिश्चिती करण्यात यावी. तद्‌नंतर वेतन स्तर एस -२३ (वेतनबँड पीबी - ३ : रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रू. ६६०० या वरिष्ठ वेतन संरचनेशी समकक्ष) मध्ये वेतननिश्चिती करण्यात यावी.

येथे स्पष्ट करण्यात येते की, प्रथम वेतनबँड पीबी - ३ : रु.१५६००-३९१०० + ग्रेड वेतन रू. ६६०० मध्ये वेतननिश्चिती करून त्यानंतर वेतन स्तर एस -२३ मध्ये २.५७ या वेतननिश्चितीच्या सुत्रानुसार वेतननिश्चिती अनुज्ञेय नाही.

दिनांक ३० जानेवारी, २०१९ पर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ अंमलात आलेले नसल्याने दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ जानेवारी, २०१९ या कालावधीत पदोन्नती / श्रेणीवाढीमुळे अथवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अथवा अन्य योजनेंतर्गत वरिष्ठ श्रेणी अनुज्ञेय झाल्यानंतर ती ६ व्या वेतन आयोगातील असुधारित वेतन संरचनेतच (वेतनबँड व ग्रेड वेतन) मंजूर करणे क्रम:प्राप्त होते. मात्र सदर नियम दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात आल्याने या नियमांनुसार, दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी अथवा तद्‌नंतर पदोन्नती / श्रेणीवाढीमुळे अथवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / अन्य योजनेच्या लाभामुळे वरिष्ठ वेतन संरचना अनुज्ञेय होत असेल, तर ती वरिष्ठ वेतन संरचना ७ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तरामध्येच अनुज्ञेय राहील.

**४. विद्यमान वेतन संरचनेतील (वेतनबँड व ग्रेड वेतन) दोन वेतन टप्पे सुधारित वेतन संरचनेत ( सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर) एकवटणे (Bunching) :-**

यासंदर्भात शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८/सेवा - ९, दिनांक - २० फेब्रुवारी, २०१९ मधील परिच्छेद क्रमांक ७.६ (१) मध्ये स्पष्टीकरण करण्यात आले आहे. सदर परिच्छेदातील तिसऱ्या उप परिच्छेदात पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात आले आहे:-

"दोन शासकीय कर्मचाऱ्यांच्या विद्यमान वेतन संरचनेतील (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) वेतनांपैकी उच्च वेतन हे निम्न वेतनापेक्षा किमान ३% पेक्षा अधिक असेल तर ते दोन वेतन टप्पे ठरतील; जेथे हा फरक ३% पेक्षा कमी असेल त्या प्रकरणी ते दोन वेतन टप्पे ठरणार नसल्याने वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही."

वरील उप परिच्छेद पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा :-

"दोन शासकीय कर्मचाऱ्यांच्या विद्यमान वेतन संरचनेतील (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) वेतनांपैकी उच्च वेतन हे निम्न वेतनापेक्षा **किमान ३% अथवा त्यापेक्षा अधिक** असेल तर ते दोन वेतन

टप्पे ठरतील; जेथे हा फरक ३% पेक्षा कमी असेल त्या प्रकरणी ते दोन वेतन टप्पे ठरणार नसल्याने वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही."

५. शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८/सेवा - ९, दिनांक - २० फेब्रुवारी, २०१९ मधील परिच्छेद ७.१ खालील उदाहरण - २ मध्ये " वेतनबँड पीबी - १ ऐवजी पीबी - ३ असे वाचावे,"

६. आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती :-

**(अ) दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वी एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ मिळालेल्या व दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी अथवा त्यानंतर आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती :-**

अशा प्रकरणी संबंधित कर्मचारी दि. १ जानेवारी, २०१६ रोजी धारण करीत असलेल्या मूळ पदाची वेतन संरचना (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) तसेच एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत मिळालेली वेतन संरचना (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) या दोन्ही वेतन संरचना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ नुसार सुधारित करण्यात याव्यात.

**वर नमूद दोन्ही वेतन संरचना सुधारणेचे आदेश स्वतंत्रपणे न काढता एकाच आदेशान्वये एकत्रितच काढण्यात यावेत.**

**(ब) दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी अथवा त्यानंतर आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या व एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती :-**

अशा प्रकरणी प्रथमत: दि. १ जानेवारी, २०१६ रोजी संबंधित कर्मचारी धारण करीत असलेल्या मूळ पदाची वेतन संरचना (वेतनबँड आणि ग्रेड वेतन) महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ नुसार सुधारित करण्यात यावी. तद्नंतर मूळ पदाच्या सुधारित वेतन स्तरातून (सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर) एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत अनुज्ञेय सुधारित वेतन स्तरामध्ये वेतननिश्चिती करण्यात यावी.

वरील (अ) आणि (ब) मध्ये नमूद दोन्ही प्रकरणी सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तरामध्ये (Pay Level in Revised Pay Matrix) एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ६ ऑगस्ट, २००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय राहील.

**(क) आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असताना, एखादा कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त /स्वेच्छासेवानिवृत्त झाल्यास/ मृत्यू पावल्यास कर्मचाऱ्याचे निवृत्तिवेतन निश्चिती :-**

आदिवासी /नक्षलग्रस्त भागातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त /स्वेच्छासेवानिवृत्त झालेल्या/मृत्यू पावलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेबाबतीत ते आदिवासी /नक्षलग्रस्त भागात कार्यरत

नसते तर ज्या वेतनश्रेणीत त्यांचे वेतन आहरित केले गेले असते त्या वेतनश्रेणीत अनुज्ञेय मानीव अंतिम वेतनावर अशा कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनाची व इतर लाभाची परिगणना करण्यात यावी.

७. सदर परिपत्रक साप्रवि का.१२ च्या अनौपचारिक संदर्भ क्र. ९२५/२०१९-व वित्त विभाग, सेवा-४ कार्यासनाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९३/२०१९ च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०५१४१७०२५३३६०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2019.05.14 17:09:09 +05'30'

(भा.ज.गाडेकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
३. अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव
४. सभापती / उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता
७. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
८. मंत्रालयीन सर्व विभाग
९. मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख.
१०.प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
११.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
१२.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१३.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१४.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१५.आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
१६.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१७.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
१८. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
१९.सर्व विभागीय आयुक्त

२०.सर्व जिल्हाधिकारी

२१.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा

२२.महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई

२३.महालेखापाल-१ (लेखा व अनज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई

२४.महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर

२५.महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर

२६.सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली

२७.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई

२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

२९.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई

३०.उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.

३१.निवासी लेखा परीक्षक, मुंबई

३२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

३३.लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद

३४.मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका

३५.बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१

३६.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी .ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०

३७.भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन,एस.व्ही.पटेल रोड,मुंबई-४

३८. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३

३९.इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५

४०.नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन,फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१

४१.शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८

४२.निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९).

**०१ जानेवारी, २०१६ पूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांच्या दि.०१ जानेवारी, २०१६ रोजीच्या वेतननिश्चितीबाबत..........**

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
## शासन निर्णय क्रमांकः वेतन-२०१९ / प्र. क्र. २३ /सेवा-३

मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
तारीख: ०१ मार्च, २०१९

वाचा -

१) **शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दि.२२.०४.२००९**
२) **शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९, दि.२९.०४.२००९**
३) **शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०.०१.२०१९**
४) **शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२०.०२.२०१९**

**शासन निर्णय**

मा. बक्षी यांच्या अध्यक्षतेखालील राज्य वेतन सुधारणा समितीने दि.०१ जानेवारी २०१६ पूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला वा दुसरा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांची दि.०१ जानेवारी २०१६ रोजी वेतननिश्चिती कशी करावी याबाबत, त्यांच्या शिफारस अहवालामध्ये राज्य शासनास कोणतीही शिफारस केलेली नाही. त्यामुळे सदर बाबतची तरतुद शासन अधिसूचना वित्त विभाग दि.३०.०१.२०१९ मध्ये अंतर्भूत होऊ शकलेली नाही. यापूर्वी सहाव्या वेतन आयोगामध्ये दि.२२.०४.२००९ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेतील नियम क्रमांक १४ मध्ये "दि.०१ जानेवारी २००६ पूर्वी कालबद्ध पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती कशी करावी," याबाबत तरतुद केलेली आहे. शासन अधिसुचना वित्त विभाग दि.२२.०४.२००९, शासन परिपत्रक वित्त विभाग, दि.२९.०४.२००९, मधील तरतुदीनुसार दि.०१.०१.२००६ पूर्वी ज्यांनी कालबद्ध पदोन्नती योजना अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतलेला आहे, त्यांची दि.०१.०१.२००६ रोजी सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेत वेतननिश्चिती त्या त्या विभागाकडून झालेली आहे. त्यामुळे आता त्यापैकी ज्या कर्मचारी / अधिकारी यांनी यथास्थिती दि.०१.०४.२०१०, दि.२१.०५.२०१०, दि.०५.०७.२०१०, दि.०१.०७.२०११, दि.०६.०९.२०१४, दि.१०.०२.२०१५, दि.०९.१२.२०१६ तसेच दि.११.०५.२०१७ मधील तरतुदीनुसार दि.०१.१०.२००६ ते दि.३१.१२.२०१५ पर्यंतच्या कालावधीत सुधारीत सेवांतर्गत आश्वासित

प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ घेतला आहे, अशा दोन्ही प्रकारच्या कर्मचारी / अधिकारी यांची दि.०१ जानेवारी २०१६ रोजी वेतननिश्चिती कशी करावी याबाबतची तरतुद आता पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

(अ) दि.०१.०१.२०१६ पूर्वी यथास्थिती सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला अथवा दुसरा लाभ मिळाल्यानंतर, दि.०१.०१.२०१६ पूर्वी कार्यात्मक पदोन्नती मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्याची वेतन निश्चिती ही वेतन मॅट्रीक्समधील अनुज्ञेय वेतनस्तरामध्ये शासन अधिसुचना वित्त विभाग दि.३०.०१.२०१९ मधील यथास्थिती नियम ७ किंवा नियम ११ नुसार करण्यात यावी.

(A) The pay fixation of the Government Servant who got the first or second benefit of Modified Assured Career Progression Scheme (MACPS), as the case may be, prior to 1st January 2016, and who received functional promotion prior to 1st January 2016, shall be done, in admissible Pay Level in the Pay Matrix as per Rule 7 or Rule 11, as provided in Government Notification Finance Department dated 30.01.2019.

(ब) दि.०१.०१.२०१६ पूर्वी यथास्थिती सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ मिळाल्यानंतर, दि.०१.०१.२०१६ पूर्वी पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असूनही कार्यात्मक पदोन्नती न मिळालेल्या, शासकीय कर्मचाऱ्याची वेतन निश्चिती ही वेतन मॅट्रीक्समधील अनुज्ञेय वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तरामध्ये शासन अधिसुचना वित्त विभाग दि.३०.०१.२०१९ मधील यथास्थिती नियम ७ किंवा नियम ११ नुसार करण्यात यावी.

(B) The pay fixation of the Government Servants, who did not get the functional promotion, despite having promotional opportunities, after receiving the first or second benefit of Modified Assured Career Progression Scheme(MACPS), as the case may be, prior to 1st January 2016, shall be done in the admissible Level in the Pay Matrix of the promotional post, as per Rule 7 or Rule 11, as provided in Government Notification Finance Department dated 30.01.2019.

उदाहरण १ :- दि.०१.०१.२०१६ पूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळाला तथापि लाभाच्या पदावर कार्यात्मक पदोन्नती न झालेल्या कर्मचाऱ्याची दि.०१.०१.२०१६ रोजीची वेतननिश्चिती पुढील प्रमाणे होईल.

| | | |
|---|---|---|
| १. | कर्मचाऱ्याचे मुळच्या पदाचे वेतन बँड व ग्रेड पे | पे बँड रु. ५२००-२०२०० व ग्रेड पे १९०० |
| २. | दि.०१.०१.२०१६ पूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ पुढील पदोन्नतीच्या वेतनसंरचनेत मंजूर केला | (पीबी-२) रुपये ९३००-३४८०० व ग्रेड पे रु.४३०० |
| ३. | लाभाच्या वेतनबँडमधील मूळ वेतन | रुपये ११,००० |
| ४. | विद्यमान मूळ वेतन | रुपये १५,३०० (११,०००+४,३००) |
| ५. | २.५७ या गुणांकाने गुणून येणारे वेतन | रुपये १५,३०० X २.५७= ३९,३२१ |
| ६. | रुपये ४३०० या ग्रेड वेतनाशी समकक्ष वेतनस्तर | एस-१४ |
| ७. | वेतनमॅट्रीक्स मधील दि.०१.०१.२०१६ रोजीचे सुधारीत वेतन (रु.३९,३२१ ही रक्कम वेतनस्तर एस-१४ च्या सेलमध्ये येत नसल्याने, त्यापुढील टप्पा) | रु.३९,८००/- |
| ८. | पुढील वेतनवाढीचे दिनांक | ०१.०७.२०१६ ----रु. ४१,०००/-<br>०१.०७.२०१७ ---- रु.४२,२००/-<br>०१.०७.२०१८ ---- रु.४३,५००/- |

(क) दि.०१.०१.२०१६ पूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला वा दुसरा लाभ मिळालेल्या व पदोन्नतीची संधी नसलेल्या कर्मचाऱ्यांची, प्रथम या योजनेच्या लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीत, अनुज्ञेय असलेल्या वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तरामध्ये, शासन अधिसुचना वित्त विभाग दि.३०.०१.२०१९ मधील यथास्थिती नियम ७ किंवा नियम ११ नुसार वेतननिश्चिती करण्यात यावी. त्या नंतर

या कर्मचाऱ्यांनी दि.०१.०१.२०१६ पूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा फक्त १ लाभ घेतला आहे, त्यांना लगतच्या पुढील वेतनस्तरामधील उचित सेल मध्ये देण्यात यावा. तर ज्या कर्मचाऱ्यांनी दि.०१.०१.२०१६ पूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे दोन लाभ घेतले आहेत, त्यांना नजिकच्या वेतनस्तरापुढील वेतनस्तरामधील उचित सेल देण्यात यावा.

(C) The pay fixation of the Government Servants who received, the first or second benefit of Modified Assured Career Progression Scheme (MACPS) prior to 1st of January, 2016 and who are not having promotional opportunities, will be first done in the appropriate Pay Level, in the Pay Matrix corresponding to the existing Pay Structure , as per the provision of Rule 7 or Rule 11, as provided in Government Notification Finance Department dated 30.01.2019. Thereafter they will be given the appropriate cell in the immediate next Level, in case of those employees, who received only one benefit of MACPS before 01.01.2016. However, the employees who received two benefits of MACPS, prior to 01.01.2016, they will be given appropriate cell in next to next level.

उदाहरण २:- पदोन्नतीची संधी नसलेल्या पदावर कार्यरत ज्या कर्मचाऱ्यांना दि.०१.०१.२०१६ पूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ (First Benefit of MACPS) मंजूर झाला आहे, त्यांची दिनांक ०१ जानेवारी २०१६ रोजीची वेतननिश्चिती पुढीलप्रमाणे होईल.

| | | |
|---|---|---|
| १ | कर्मचाऱ्याचे मुळच्या पदाचे वेतनबँड व ग्रेड पे | पे बँड रु. ५२००-२०२०० व ग्रेड पे १९०० |
| २ | दि.०१.०१.२०१६ पूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ हा पुढे नमूद एकाकी पदाच्या वेतनसंरचनेत मंजूर केला | (पीबी-१)( रुपये ५२००-२०२०० व ग्रेड पे रु.१९००+२००*) |
| ३ | लाभाच्या वेतनबँडमधील मूळ वेतन | रुपये ८,२२० |
| ४ | लाभ मंजूरीच्या दिनांकास विद्यमान मूळ वेतन | रुपये १०,३२० (८,२२०+१,९००+२००*) |

| | | |
|---|---|---|
| ५ | शासन निर्णय वित्त विभाग दि.०६.०९.२०१४ व दि.१०.०२.२०१५ नुसार मूळ वेतन | रुपये १०,४२० (रुपये १०,३२०+ रुपये १००**) |
| ६ | दि.३१.१२.२०१५ रोजीचे प्रत्यक्षात विद्यमान मूळ वेतन | रु. १०,४२० |
| ७ | २.५७ या गुणांकाने गुणून येणारे वेतन : | रुपये १०,४२० X २.५७= २६,७७९.४० (नजिकच्या रुपयात पूर्णांकित करुन रु.२६,७८०) |
| ८ | रुपये १९०० या ग्रेड वेतनाशी समकक्ष वेतनस्तर एस-६.<br>एस-६ वेतनस्तरामध्ये रु.२६,७८० या रकमेची सेल नसल्याने, या वेतनस्तरातील नजिकच्या सेलमध्ये दि.०१.०१.२०१६ रोजी होणारी वेतन निश्चिती. | रु.२६,८०० |
| ९ | तथापि दि.०१.०१.२०१६ पासून लागू केलेल्या तीन लाभाच्या योजनेमध्ये एकाकी पदासाठी नजिकचा वेतनस्तर अनुज्ञेय केला असल्याने, या ठिकाणी देखील नजिकचा एस-७ हा वेतनस्तर संबंधितास अनुज्ञेय राहील. या एस-७ वेतनस्तरामध्ये मूळ वेतन रु.२६,८०० इतक्या रकमेची सेल असल्यामुळे रुपये २६,८०० इतके वेतन निश्चित होईल. | दि.०१.०१.२०१६ रोजी एस-७ या वेतनस्तरामध्ये रु.२६,८००/- इतके वेतन निश्चित होईल. |
| १०. | पुढील वेतनवाढीचे दिनांक | ०१.०७.२०१६ ----रु.२७,६००/-<br>०१.०७.२०१७ ---- रु. २८,४००/-<br>०१.०७.२०१८ ---- रु. २९,३००/- |

* शासन अधिसुचना वित्त विभाग दिनांक २२.०४.२००९ मधील नियम क्रमांक १४ (३)(अ) मधील तरतुदीनुसार

** शासन निर्णय वित्त विभाग, दि.०६.०९.२०१४ व शासन शुद्धीपत्रक वित्त विभाग दि.१०.०२.२०१५ मधील तरतुदीनुसार

उदाहरण ३ :- पदोन्नतीची संधी नसलेल्या पदावर कार्यरत ज्या कर्मचाऱ्यांना दि.०१.०१.२०१६ पूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ (Second Benefit of MACPS) मंजूर झाला आहे, त्यांची दिनांक ०१ जानेवारी २०१६ रोजीची वेतननिश्चिती पुढीलप्रमाणे होईल.

| | | |
|---|---|---|
| १ | कर्मचाऱ्याचे मुळच्या पदाचे वेतनबँड व ग्रेड पे | पे बँड रु. ५२००-२०२०० व ग्रेड पे १९०० |
| २ | पदोन्नतीची संधी नसलेल्या पदावर कार्यरत कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदाच्या वेतन संरचनेत बदल न करता त्याला, अनुज्ञेय असलेल्या ग्रेड वेतनामध्ये दुसरा लाभ मंजूरीच्या अनुषंगाने दि.०१.०१.२०१६ पूर्वी समुचित ग्रेड वेतन, स्वतंत्रपणे अनुज्ञेय करण्यात आले. अशा प्रकारे वेतन संरचना पी.बी.-१ ग्रेड पे रु.१९०० अशीच राहून रु.८५०/- इतके समुचित ग्रेड वेतन स्वतंत्रपणे अनुज्ञेय केले. | (पीबी-१) ( रुपये ५२००-२०२०० व ग्रेड पे --- रु.१९००<br>प्रथम लाभ --- ३०० (२००*+१००**)<br>द्वितीय लाभ --- ५५० (४५०***+१००**)<br>एकूण ग्रेड वेतन --- रु २,७५०/- |
| ३ | लाभाच्या तारखेस वेतनबँडमधील मूळ वेतन | रुपये ११,६९० |
| ४ | लाभ मंजूरीच्या दिनांकास विद्यमान मूळ वेतन | रुपये १४,४४० (११६९०+२७५०) |
| ५ | दि.३१.१२.२०१५ रोजीचे प्रत्यक्षात विद्यमान मूळ वेतन | रुपये - १४,४४० |
| ६ | २.५७ या गुणांकाने गुणून येणारे वेतन : रुपये १४,४४० X २.५७= ३७,११०.८० (नजिकच्या रुपयात पूर्णांकित करुन रु.३७,१११) | रुपये ३७,१११ |

| | | |
|---|---|---|
| ७ | रुपये १९०० या ग्रेड वेतनाशी समकक्ष वेतनस्तर एस-६. या एस-६ वेतनस्तरामध्ये रु.३७,१११ या रकमेची सेल नसल्याने, या वेतनस्तरातील नजिकच्या सेलमधील रु.३७,२०० इतके वेतन निश्चित होईल. | (वेतनस्तर एस-६) रुपये ३७,२०० |
| ८ | उपरोक्त (क) येथील तरतुदीनुसार दि.३१.१२.२०१५ पर्यंत ज्या कर्मचाऱ्यांनी दुसरा लाभ घेतला आहे, अशा कर्मचाऱ्यांची दि.०१.०१.२०१६ रोजी वेतननिश्चिती करतांना त्यांना नजिकच्या वेतनस्तरानंतर येणारा लगतचा वेतनस्तर (Next to Immediate Next) अनुज्ञेय राहील.<br>त्यानुसार या ठिकाणी एस-६ या वेतनस्तरानजीकचा वेतनस्तर हा एस-७ असून या वेतनस्तरामध्ये रु.३७,२०० ची सेल असल्याने, या सेलमध्ये वेतननिश्चित होईल. तथापि संबंधित कर्मचाऱ्याने दोन लाभ घेतले असल्याने त्यास अनुज्ञेय वेतनस्तर हा एस-८ आहे. या एस-८ वेतनस्तरामध्ये रु.३७,२०० ची सेल नसल्याने नजीकच्या रु.३७,५०० या सेल मध्ये संबंधित कर्मचाऱ्याचे दि.०१.०१.२०१६ रोजीचे मूळ वेतन, वेतन निश्चित होईल. | (वेतनस्तर एस-८) रुपये ३७,५०० |
| ९ | पुढील वेतनवाढीचे दिनांक | ०१.०७.२०१६ ----रु. ३८,६००/-<br>०१.०७.२०१७ ---- रु. ३९,८००/-<br>०१.०७.२०१८ ---- रु. ४१,०००/- |

* शासन अधिसुचना वित्त विभाग दिनांक २२.०४.२००९ मधील नियम क्रमांक १४ (३)(अ) मधील तरतुदीनुसार

** शासन निर्णय वित्त विभाग, दि.०६.०९.२०१४ व शासन शुद्धीपत्रक वित्त विभाग दि.१०.०२.२०१५ मधील तरतुदीनुसार

*** शासन निर्णय वित्त विभाग, दि.०५.०७.२०१०

टिप-१:- दि.०१.०१.२०१६ पूर्वीच्या पहिल्या व दुसऱ्या लाभ धारकांच्या विद्यमान मूळ वेतनास, २.५७ या गुणांकाने गुणल्यानंतर (When multiplied by fitment factor) येणारी रक्कम ही, दोन सेलमधील रकमांच्या दरम्यानची रक्कम असल्यास, (Amount falling in between two cells ) अशा वेळीच दोन सेलपैकी नंतरच्या सेल मधील रक्कम (immediate next) संबंधितास अनुज्ञेय राहील. अन्य प्रसंगी (In rest of the other cases) वरीलप्रमाणे गुणल्यानंतर येणारी रक्कम (Amount arrived after multiplication ) ही संबंधित वेतन स्तरामधील सेल मध्ये आढळून येत असल्यास (If found in the cell), तेवढी रक्कम संबंधितांस अनुज्ञेय राहील.

टिप-२:- हकीम समितीच्या शिफारशीनुसार सहाव्या वेतन आयोगात पदोन्नतीच्या संधी नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात पदांच्या वेतन संरचनेत (In the Pay Structure i.e. Pay Band &Admissible Grade Pay) मध्ये कोणताही बदल न करता, अतिरिक्त ग्रेड वेतन (Additional Grade Pay) गंजूर करुन आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करण्याची संकल्पना त्या वेळच्या परिस्थितीनुसार अस्तित्वात होती. त्यामुळे पहिल्या वा दुसऱ्या लाभ मंजूरीच्या अनुषंगाने, एकाकी पदावरील कर्मचारी व अधिकारी यांच्या ग्रेड वेतनात वाढ झाली (Increase In Grade Pay) असली तरी त्यांच्या पदास, ६ व्या वेतन आयोगात अनुज्ञेय केलेली वेतन संरचना बदलली असा अर्थ होत नाही (That does not mean that Pay Structure of the post has changed). तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या शिफारशीतील शिफारस क्रमांक ५.५.४ खालीलप्रमाणे आहे.

"५.५.४ एकाकी पदावरील कर्मचारी / अधिकारी यांना दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत लाभ अनुज्ञेय झाल्यास, सदर लाभ त्यांना पुढीलप्रमाणे मंजूर होईल:-

या प्रकारामध्ये येणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना या नवीन योजनेअंतर्गत त्यांची पे मॅट्रीक्समधील लेव्हल विचारात घेऊन नजिकच्या लेव्हलमध्ये वेतननिश्चितीचा लाभ, हा पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या लाभ मंजूरीच्या अनुषंगाने अनुज्ञेय राहील."

टिप-३:- उपरोक्त शिफारस राज्य शासनाने स्विकारली आहे. त्यामुळे एकाकी पद अथवा पदोन्नतीच्या संधी नसलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत नजीकच्या लेव्हलमध्ये उचित सेलमध्ये वेतननिश्चितीचा लाभ देणे क्रमप्राप्त आहे. (उदा. एस-५ मधील कर्मचाऱ्यास या योजनेअंतर्गत एस-६ हा वेतनस्तर मधील उचित सेल मध्ये मंजूर होणे क्रमप्राप्त आहे.) तसेच दि.०१.०१.२०१६ रोजीचे वेतन निश्चित करताना, वाढीव अतिरिक्त ग्रेड वेतनाचा लाभ हा मूळ वेतनात मिळवून संबंधित कर्मचारी / अधिकारी यास दिला जाणार आहे. परिणामी दि.०१.०१.२०१६ पूर्वीचा पहिला लाभ व दुसरा लाभ धारकास, दि.०१.०१.२०१६ रोजीचे वेतन निश्चित केल्यानंतर, अनुज्ञेय ठरणारे वेतन, हे त्याने दि.०१.०१.२०१६ पूर्वी यथास्थिती एक अथवा दोन लाभ घेतला आहे, हे विचारात घेऊन, यथास्थिती पहिल्या लाभाच्या अनुषंगाने विद्यमान वेतन स्तराच्या, लगतच्या नजिकच्या, वेतन स्तरामध्ये आणि दुसऱ्या लाभाच्या अनुषंगाने लगत नंतरच्या वेतनस्तरामध्ये देऊ करण्यात येणार आहे. म्हणजेच, ६ व्या वेतन आयोगात, १ ल्या वा २ ऱ्या लाभ मंजूरीमुळे मूळ ग्रेड वेतनात, अतिरिक्त ग्रेड वेतन मिळवून होणाऱ्या एकूण ग्रेड वेतनाप्रमाणे, समकक्ष वेतन स्तर, सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्समध्ये देणे, अपेक्षित नसल्याने, दिला जाणार नाही, तर सहाव्या वेतन आयोगाची संबंधित पदाची मूळ वेतन संरचना प्रमाणभूत माणून, त्या आधारे वर नमूद केल्याप्रमाणे उचित वेतनस्तर संबंधितास अनुज्ञेय होणार आहे. (मूळ ग्रेड वेतनाच्या आधारेच)

या शासन निर्णयान्वये वरीलप्रमाणे केलेली तरतुद तसेच त्या खाली मार्गदर्शक म्हणून दर्शविलेली उदाहरणे विचारात घेऊन विचारात घेऊन दि.०१ जानेवारी २०१६ पूर्वी यथास्थिती कालबद्ध पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांची दि.०१ जानेवारी, २०१६ रोजीची वेतननिश्चितीची कार्यवाही करावी, असे सर्व मंत्रालयीन विभाग यांना तसेच त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख / प्रादेशिक विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०११७२७३७४६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93c75178c3c4e1daaeb069f4e437a48fd302aabd765450129e4447d5a1da1f2a, serialNumber=d2671e08dbf49e6a42b865d026c3f07bc1eb8254056eab8fa6b4b0fb72dd47ba, cn=Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2019.03.01 17:31:01 +05'30'

( भा. ज.गाडेकर )
उप सचिव, वित्त विभाग

**प्रत,**

१. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
२. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
३. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
४. महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, गुंबई,
७. सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नार्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
८. राज्यपालांचे सचिव,
९. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
१०. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
११. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य
१३. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई
१४. सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
१५. सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई
१६. मंत्रालयीन सर्व विभाग,
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१९. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
२०. *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
२१. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२२. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, गुंबई,
२३. *प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२४. *सहसंचालक, ऑल इंडीया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई,

**राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना सुधारीत दराने घरभाडेभत्ता मंजूर करण्याबाबत..........**

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

## शासन निर्णय क्रमांकः घभाभ-२०१९ / प्र. क्र. २ /सेवा-५

मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
तारीख: ५ फेब्रुवारी, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर-१२८७/६४३/सेवा-१०, दि.२५ एप्रिल, १९८८
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१०९८/प्र.क्र.८२/९८/सेवा-५, दि. ११ डिसेंबर, १९९८
३) शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग क्र. घभाभ-१०९८/प्र.क्र.८२/९८/सेवा-५, दि. ५ जानेवारी, १९९९
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, घभाभ-१००३/प्र.क्र.४५/सेवा-५, दि.१० नोव्हेंबर, २००३
५) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१००५/प्र.क्र.१३/सेवा-५, दि. १७ जून, २००५
६) शासन निर्णय, वित्त विभाग, संकीर्ण-१००९/प्र.क्र.४०/सेवा-५, दि. १३ मे, २००९
७) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१००९/प्र.क्र.६७/सेवा-५, दि. २४ ऑगस्ट, २००९
८) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक २/५/२०१४-ई.II(बी), दिनांक २१ जुलै, २०१५ चे ज्ञापन
९) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५, दि. १६ डिसेंबर, २०१६
१०) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक २/५/२०१७-ई.II(बी), दिनांक ७ जुलै, २०१७ चे ज्ञापन
११) शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०.०१.२०१९

## प्रस्तावना

सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने केंद्रिय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या वेतन मॅट्रीक्स व वेतन स्तर या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९, अन्वये वेतन मॅट्रीक्स व वेतन स्तर लागू केले आहे. तसेच केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना, सातव्या वेतन आयोगाच्या कालावधीत उपरोक्त अनुक्रमांक (१०) येथील दिनांक ०७ जुलै, २०१७ च्या आदेशान्वये सुधारीत दराचा घरभाडे भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या सातव्या वेतन आयोगाच्या घरभाडे भत्त्याच्या दरामध्ये, उपरोक्त दि.०७.०७.२०१७ च्या ज्ञापनान्वये झालेली सुधारणा विचारात घेऊन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व इतर पात्र कर्मचाऱ्यांना शहरे व गांवे यांचे सुधारीत पुनर्वर्गीकरण विचारात घेऊन, सातव्या वेतन आयोगाच्या कालावधीत सुधारीत दराचा घरभाडे भत्ता अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय

शासन आता असे आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचारी यांना घरभाडे भत्ता मंजूर करण्यासाठी शहरांचे/गावांचे शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १६.१२.२०१६ अन्वये यापूर्वीच पुर्नवर्गीकरण करण्यात आलेले आहे. सदर बदललेले / सुधारीत वर्गीकरण विचारात घेऊन, संबंधित शहरांना / गावांना, त्यांच्यासमोर स्तंभ-४ मध्ये दर्शविल्यानुसार ७ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणीच्या आधारे सुधारीत दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्यात यावा.

हे आदेश दिनांक ०१.०१.२०१९ पासून अंमलात येतील.

| अ.क्र. | शहरांचे / गावांचे वर्गीकरण | घरभाडे भत्याचे विद्यमान दर (मूळ वेतनाची टक्केवारी) | घरभाडे भत्याचे सुधारीत दर (मूळ वेतनाची टक्केवारी) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | X एक्स | ३० टक्के | २४ टक्के |
| २ | Y वाय | २० टक्के | १६ टक्के |
| ३ | Z झेड | १० टक्के | ८ टक्के |

तथापि X, Y व Z वर्गीकृत शहरांना अनुक्रमे किमान रु.५४००, रु.३६०० व रु.१८०० इतका घरभाडे भत्ता अनुज्ञेय राहील. ज्यावेळी सातव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय केलेला महागाई भत्ता हा २५ टक्क्याची मर्यादा ओलांडेल त्यावेळी वरीलप्रमाणे वर्गीकृत शहरांना अनुक्रमे २७%, १८% व ९% दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्यात यावा. तसेच ज्यावेळी सातव्या वेतन आयोगानुसार मिळणारी महागाई भत्त्याची रक्कम ही ५० टक्क्यापेक्षा अधिक होईल त्यावेळी वरीलप्रमाणे वर्गीकृत शहरांना, अनुक्रमे ३०%, २०% व १० % अशा वाढीव दराने, घरभाडे भत्ता मंजूर करण्यात यावा.

सुधारीत दराने घरभाडे भत्याची परिगणना करण्यासाठी मूळ वेतनामध्ये, "विशेष वेतन" इत्यादी सारख्या वेतनाचा समावेश नसेल.

२. घरभाडे भत्त्याच्या अनुज्ञेयतेसंबंधीच्या विद्यमान आदेशातील इतर सर्व तरतूदी व अटी जशाच्या तशा लागू राहतील.

३. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत या आदेशाच्या परिणामी होणारा घरभाडेभत्त्यावरील वाढीव खर्च हा त्यांचे वेतन व भत्ते यासंबंधिचा खर्च ज्या संबंधित लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येतो, त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत घरभाडेभत्त्यावरील खर्च संबंधित प्रमुख लेखाशिर्षाखाली, ज्या उपलेखाशिर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाचा खर्च खर्ची टाकण्यात येतो. त्या उपलेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सर्व विभागप्रमुख, सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कृषि व कृषितर विद्यापिठांचे कुलसचिव यांनी याबाबत होणारा जादा खर्च सुधारीत अंदाजपत्रक तयार करतांना विचारात घ्यावा.

४. स्थानिक पुरक भत्ता व वाहतूक भत्ता हे दोन्ही भत्ते हे ६ व्या वेतन आयोगाच्या कालावधीत, ज्या दराने अदा करण्यात येत होते, त्याच दराने अदा करण्यात यावेत.

५. हे आदेश दि. ०१.०१.२०१९ पासून अंमलात आले आहेत असे समजण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२०५१४३६४६२००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93c75178c3c4e1daaeb069f4e437a48fd302aabd765450129e4447d5a1da1f2a, serialNumber=d2671e08dbf49e6a42b865d026c3f07bc1eb8254056eab8fa6b4b0fb72dd47ba, cn=Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2019.02.05 14:38:56 +05'30'

**( भा. ज.गाडेकर )**
उप सचिव, वित्त विभाग

**प्रत,**

१. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
२. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
३. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
४. महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
७. सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नार्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
८. राज्यपालांचे सचिव,
९. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
१०. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
११. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य
१३. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई
१४. सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
१५. सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई
१६. मंत्रालयीन सर्व विभाग,
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१९. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
२०. *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
२१. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२२. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२३. *प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२४. *सहसंचालक, ऑल इंडीया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई,
२५. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती),
२६. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती),
२७. नगर विकास विभाग (यूडी-१०), मंत्रालय, मुंबई (२० प्रती),

२८. कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती),
२९. आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती),
३०. संचालक, लेखा व कोषागार, मुंबई,
३१. मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
३२. उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
३३. जिल्हा लेखापरिक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा - अहमदनगर
३४. जिल्हा लेखापरिक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा - रत्नागिरी
३५. जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
३६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
३८. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
३९. उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
४०. कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती)
४१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (१०० प्रती)
४२. *सचिव राज्य माहिती आयोग
४३. संचालक, तांत्रिक शिक्षण, द्वारा तंत्र शिक्षण संचालक, मुंबई (२५० प्रती)
४४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक (प्रत्येकी १० प्रती)
४५. सर्व विभागीय तंत्र शिक्षण उपसंचालक (प्रत्येकी १० प्रती)
४६. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी
४७. आयुक्त, महानगर पालिका, नागपूर
४८. प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगरपालिकांची शिक्षण मंडळे यांसह) मुख्य अधिकारी, सर्व नगर पालिका
४९. कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/ देहू रोड/देवळाली/अहमदनगर
५०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
५१. संचालक आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक (१० प्रती)
५२. संचालक समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
५३. संचालक आदिवासी संशोधन व शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
५४. आदिवासी विकास आयुक्त, नाशिक
५५. सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
५६. अपर आयुक्त, आदिवासी उपयोजना, नाशिक/नागपूर
५७. सर्व समाजकल्याण अधिकारी, वर्ग-१
५८. सर्व आदिवासी कल्याण अधिकारी
५९. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
६०. कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर,
६१. कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
६२. कुलसचिव, पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
६३. कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
६४. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई,

सातव्या वेतन आयोगामध्ये, तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत.......

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वेतन -१११९ /प्र.क्र.३ /२०१९/सेवा- ३**
खो.क्र.३३५ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : ०२ मार्च, २०१९.

**वाचा-**

१) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र:एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ८ जून, १९९५.
२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र:एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.३३/९५/बारा, दिनांक ०१ नोव्हेंबर, १९९५.
३) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र:एसआरव्ही-१०९६/प्र.क्र.३३/९५/बारा, दिनांक २० मार्च, १९९७.
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २० जूलै, २००१.
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.वेतन २००२ /प्र.क्र.१/सेवा-३, दिनांक ११ जानेवारी, २००२.
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.संकीर्ण २००२ /प्र.क्र.१२/सेवा-३, दिनांक २१ एप्रिल, २००३.
७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:असंक-१००१/प्र.क्र.२१(भाग-४)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि.२६ मार्च, २००४.
८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.वेतन ११०६ /प्र.क्र.३०/सेवा-३, दिनांक १० सप्टेंबर, २००७ व दि.०१ नोव्हेबर २००८.
९) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:वेतन ११०९/प्र.क्र.१/०९/सेवा-३, दिनांक १५ ऑक्टोबर, २००९.
१०) शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग, क्र. वेतन ११०६ /प्र.क्र.३०/सेवा-३, दिनांक ११ जानेवारी, २०१०.
११) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक १ एप्रिल, २०१०.
१२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:वेतन ११०९/प्र.क्र.१/सेवा-३, दिनांक २१ मे, २०१०.
१३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:वेतन ११०९/प्र.क्र.४१/सेवा-३, दिनांक ५ जुलै, २०१०.
१४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३, दिनांक १ जुलै, २०११.
१५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:आप्रयो १०१२/प्र.क्र.७१/सेवा-३, दि.१९ जानेवारी, २०१३.
१६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.०६ सप्टेंबर, २०१४.
१७) शासन पुरकपत्र, वित्त विभाग, क्र:आप्रयो-१०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.१०फेब्रुवारी, २०१५.
१८) शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग, क्र:मप्रन्या-१०१५/प्र.क्र.९७/सेवा-३, दि.१०डिसेंबर, २०१५.
१९) शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग, क्र:आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि.२३ डिसेंबर,२०१५.
२०) शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग, क्र:आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि.२३ डिसेंबर,२०१५.
२१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:याचिका-१०१२/प्र.क्र.७४/सेवा-३, दि.०३ मार्च, २०१६.
२२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:वेतन-१०१४/प्र.क्र.१६/सेवा-३, दि.१६ जुलै, २०१६.
२३) शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग, क्र:वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३, दिनांक ९ डिसेंबर, २०१६.
२४) शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग, क्र:वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३, दिनांक ११ मे, २०१७.
२५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र:एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या-१२, दि.१५ डिसेंबर, २०१७.
२६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:वेतन १११९/प्र.क्र.३/सेवा-३, दिनांक १ जानेवारी, २०१९.

२७) शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र: वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३० जानेवारी, २०१९.
२८) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र: वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२० फेब्रुवारी, २०१९.
२९) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:वेतन २०१९/प्र.क्र.२३/सेवा-३, दिनांक ०१ मार्च, २०१९.

**<u>प्रस्तावना -</u>**

राज्य शासनाने चौथ्या, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगामध्ये राज्य शासकीय तसेच जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकरिता यथास्थिती कालबद्ध पदोन्नती योजना, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तसेच सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केल्या होत्या. कालबद्ध पदोन्नती योजना व सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, ह्या दोन योजना, संपूर्ण सेवा कालावधीमध्ये एक लाभाच्या योजना होत्या. तर सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही संपूर्ण सेवा कालावधीत दोन लाभाची योजना होती. ज्या कर्मचाऱ्यांनी कालबद्ध पदोन्नतीचा लाभ घेतला आहे, त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय नव्हता. तसेच सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी ज्या कर्मचाऱ्यांनी अगोदरच्या वर नमूद दोन योजनांपैकी एका योजनेचा लाभ घेतला होता, त्यांचा सदर एक लाभ हा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दोन लाभांपैकी एक लाभ ठरत होता. वर नमूद तीनही योजनेअंतर्गत अनुज्ञेय केलेला पहिला लाभ हा, संबंधितास त्यांच्या मूळ नियुक्तीपासून १२ वर्षाच्या नियमित सेवा पूर्ण केल्यानंतर, पात्रतेनुसार अनुज्ञेय करण्यात आला होता. तर सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ हा पहिल्या लाभाच्या प्राप्तीच्या तारखेपासून १२ वर्षाच्या सेवेनंतर, पात्रतेनुसार अनुज्ञेय करण्यात आला होता.

२. सातव्या केंद्रीय वेतन आयोगाचा शिफारस अहवाल विचारात घेऊन, केंद्र शासनाने सुधारीत वेतनश्रेणी, तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तसेच अन्य सेवाविषयक लाभ केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना यापूर्वीच लागू केलेले आहेत. केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना, केंद्र शासनाने लागू केलेल्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या स्वरुपामध्ये उचित फेरफार करुन राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषद शिक्षकेतर कर्मचारी व अन्य शिक्षकेतर कर्मचारी यांना त्यांच्या १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनंतर तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याची शिफारस व अनुषंगिक शिफारशी, श्री. के.पी.बक्षी, अध्यक्ष, राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीने, राज्य शासनास केल्या होत्या. सदर शिफारशी मध्ये, किंचित फेरफार करुन सदर शिफारशी स्वीकारण्याबाबतचा निर्णय, राज्य मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्या अनुषंगाने, १०, २० व ३० वर्षांनतर पात्रतेनुसार अनुज्ञेय करणारी, तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याची शिफारस, स्वीकृत, करण्याबाबतचा शासन निर्णय, वित्त विभाग दि.०१.०१.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, पूर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२ / २४ वर्षांनंतर (दि.३१.१२.२०१५ पर्यंत तसेच दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत), ज्या कर्मचारी / अधिकारी यांनी यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, त्यांना तसेच दि.०१.०१.२०१९ नंतर शासन सेवेत सरळसेवा भरतीने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना १० / २० /३० वर्षांनतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, कशाप्रकारे अनुज्ञेय करता येईल, याबाबत, पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये, १०, २० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.०१.०१.२०१६ पासून पुढीलप्रमाणे अंमलात येईल.

**योजनेचा तपशील**

(i) सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे रु.५४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी / अधिकारी यांना लागू राहील. संबंधित कर्मचारी / अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

(ii) या योजनेखाली पात्र कर्मचारी / अधिकारी यांना संपूर्ण सेवा कालावधीत, पात्रतेनुसार तीन वेळा, या योजनेचा लाभ मंजूर करण्यात येईल. मात्र, ज्या कर्मचारी / अधिकारी यांना दोन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना या योजनेखाली फक्त एकच लाभ अनुज्ञेय होईल. थोडक्यात संबंधित कर्मचारी / अधिकारी यांना एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून त्यांची एकूण नियमित व सलग सेवा ३० वर्ष असल्यास, या ३० वर्षाच्या कालावधीत झालेल्या कार्यात्मक पदोन्नती व लाभ यांची संख्या, किमान तीन असावी. त्याशिवाय ज्या कर्मचारी / अधिकारी यांना तीन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना या योजनेअंतर्गत एकही लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.

(iii) या योजनेअंतर्गत एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून झालेल्या संपूर्ण सेवा कालावधीत, संबंधितास सुरुवातीस लाभ मंजूर झाला असल्यास व तदनंतर लाभाच्या वेतनश्रेणीत त्याची कार्यात्मक पदोन्नती झाल्यास, पुन्हा वेतननिश्चीतीचा लाभ अनुज्ञेय नसल्याने, अशा पदोन्नतीची गणना एकूण तीन कार्यात्मक पदोन्नतीच्या संख्येमध्ये करण्यात येणार नाही.

(iv) या तीन लाभाच्या योजनेच्या लाभार्थीस, पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, ज्येष्ठता, पात्रता, अर्हता परीक्षा, विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे, गोपनीय अहवालाची प्रतवारी, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे (शासन निर्णय सा.प्र.वि. दि.१५.१२.२०१७ नुसार ), यथास्थिती जातीवैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे, अशा पदोन्नतीच्या कार्यपद्धतीची, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पूर्तता करणे आवश्यक आहे.

(v.) तीन लाभांच्या योजनेचा पहिला व दुसरा लाभ - ज्या कर्मचारी / अधिकारी यांनी यापूर्वी अनुज्ञेयतेनुसार यथास्थिती कालबद्ध पदोन्नती योजना अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला वा दुसरा लाभ यापूर्वी घेतलेला आहे, त्यांचे सदर लाभ हे तीन लाभाच्या योजनेखालील प्रकरणपरत्वे पहिला वा दुसरा लाभ समजण्यात येतील.

(vi) विवक्षित सेवा कालावधीनंतर (After specified number of years of service), संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा (Non-Functional Pay Structure) मंजूर करण्यात आलेला / येणारा, लाभ, हा या योजनेखालील पहिला लाभ ( First benefit of MACPS) समजण्यात येईल. उदा. मंत्रालय / विधानमंडळ सचिवालय कक्ष अधिकाऱ्यांना चार वर्षांच्या नियमित सेवेनंतर देण्यात येत असलेली अकार्यात्मक वेतनसंरचना.

ज्या कर्मचारी / अधिकारी यांना पहिला लाभ म्हणून ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे, त्या पदाला विवक्षित सेवा कालावधीनंतर, त्या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ न होता, अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतनसंरचना मंजूर करण्यात येत असेल तर ती अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचना हा दुसरा लाभ ( Second benefit of MACPS ) म्हणून मंजूर करण्यात येईल.

(vii) पूर्वी १२ व २४ वर्षांच्या सेवेनंतर मिळणारे लाभ, सातव्या वेतन आयोगात १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनंतर पात्रतेनुसार अनुज्ञेय केले आहेत. त्यामुळे ज्या कर्मचारी / अधिकारी यांना दि.०१.०१.२०१६ पूर्वी अनुज्ञेयतेनुसार यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर झाला आहे, अशा कर्मचारी / अधिकारी यांना उर्वरित यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ पुढील तक्त्यात नमूद केल्यानुसार, पात्रतेनुसार, अनुज्ञेय राहील.

| **दि.०१.०१.२०१६ पूर्वी १२ वा २४ वर्षाच्या सेवेनंतर घेतलेला लाभ** | **दुसऱ्या लाभाची अनुज्ञेयता** | **तिसऱ्या लाभाची अनुज्ञेयता** |
|---|---|---|
| पहिला लाभ | पहिल्या लाभापासून आठ वर्षांनंतर (१२+८) | दुसऱ्या लाभापासून दहा वर्षांनंतर (२०+१०) |
| दुसरा लाभ | लागू नाही. | दुसऱ्या लाभापासून सहा वर्षांनतर (२४+६) |

(viii) ज्या कर्मचाऱ्यास दि.०१.०१.२०१६ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती १२ वा २४ वर्षांच्या सेवेनंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर झाला आहे, त्यांना २० (१२+८) व ३०(२४+६) एवढ्या वर्षाच्या नियमित सेवेनंतर, पात्रतेनुसार, यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ मंजूर करण्यात यावा.

दि.०१.०१.२०१६ ते सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश, निर्गमित होण्याच्या तारखेपर्यंत ज्यांना, शासन निर्णय वित्त विभाग दि.०१.०४.२०१० नुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, अशा कर्मचारी / अधिकारी यांचे असुधारीत लाभाचे, यापूर्वीचे आदेश रद्द करुन त्यांना तीन लाभाच्या योजनेनुसार सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्सनुसार, पदोन्नतीच्या पदाच्या सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत, सदर लाभ सुधारीतरित्या मंजूर करण्यात येतील. त्या अनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करुन, फरकाची रक्कम संबंधितांना अनुज्ञेय करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| उदा. "क्ष" कर्मचारी नियुक्ती दिनांक ०१.०७.२००६<br><br>मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक<br><br>पे बँड ५२००-२०२०० व ग्रेड पे १९०० | शासकीय सेवेत १२ वर्ष पूर्ण दिनांक ०१.०७.२०१८ | तीन लाभाच्या सु.से.आ.प्र.योजने खाली सदर लाभ १० वर्षांनतर अनुज्ञेय असल्यामुळे दिनांक ०१.०७.२०१६ पासून पहिला लाभ अनुज्ञेय होईल व यापूर्वी मंजूर केलेला १२ वर्षाचा लाभ रद्द करुन सुधारीत दिनांकास लाभ मंजूर करण्यात यावा व फरकाची रक्कम अनुज्ञेय असल्यास संबंधितांना अदा करण्यात यावी. |
| उदा. "ज्ञ" कर्मचारी नियुक्ती दिनांक ०१.०७.१९९४<br><br>मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक<br><br>पे बँड ५२००-२०२०० व ग्रेड पे १९०० | शासकीय सेवेत १२ वर्ष पूर्ण झाल्याने पहिला लाभ दिनांक ०१.०७.२००६ अनुज्ञेय झाला आहे.<br><br>दुसरा लाभ दिनांक ०१.०७.२०१८ रोजी अनुज्ञेय झाला आहे. | तीन लाभाच्या सु.से.आ.प्र.योजना खाली दुसरा लाभ २० वर्षांनतर म्हणजेच दिनांक ०१.०७.२०१४ पासून सुधारीत दुसरा लाभ अनुज्ञेय होईल. तथापि सदर योजना दि.०१.०१.२०१६ पासून अंमलात आल्याने यापूर्वी दि.०१.०७.२०१८ रोजीचा मंजूर केलेला २४ वर्षाचा लाभ रद्द करुन सुधारीत दिनांकास, म्हणजेच दि.०१.०१.२०१६ रोजी अनुज्ञेय होईल व फरकाची रक्कम अनुज्ञेय असल्यास संबंधितांना देण्यात यावी. |

(ix) ज्या कर्मचारी / अधिकारी यांच्या नियमित सेवेची १० वर्षे दिनांक ३१.१२.२०१५ पूर्वी किंवा दि.३१.१२.२०१५ रोजी पूर्ण होतील, त्यांना, तीन लाभाच्या योजनेअंतर्गत पहिला लाभ हा दि.०१.०१.२०१६ रोजी पात्रतेनुसार अनुज्ञेय होईल.

| | | |
|---|---|---|
| उदा. "य" कर्मचारी नियुक्ती दिनांक ०१.०७.२००५ | शासकीय सेवेत १० वर्ष पूर्ण झाल्याने पहिला लाभ दिनांक ०१.०७.२०१५ अनुज्ञेय झाला आहे. | तीन लाभाची सु.से.आ.प्र.योजना दि.०१.०१.२०१६ पासून अंमलात आल्याने या योजनेखाली पहिला लाभ दि.०१.०१.२०१६ रोजी अनुज्ञेय होईल. |

ज्या कर्मचारी / अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावर दि.०१.०१.२०१६ पूर्वीच पहिला लाभ मंजूर केला आहे, अशा कर्मचाऱ्यांना त्यांची १२+८ अशी २० वर्षाची सेवा, ही दि.०१.०१.२०१६ पूर्वी पूर्ण होत असल्यास, संबंधितास दुसरा लाभ (Second benefit on promotional post) दि.०१.०१.२०१६ पासून पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरेल.

| | | |
|---|---|---|
| उदा. "क्ष" कर्मचारी नियुक्ती दिनांक ०१.०७.१९९४<br><br>मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक<br><br>पे बँड ५२००-२०२०० व ग्रेड पे १९०० | शासकीय सेवेत १२ वर्ष पूर्ण झाल्याने पहिला लाभ दिनांक ०१.०७.२००६ अनुज्ञेय झाला आहे.<br><br>दुसरा लाभ दिनांक ०१.०७.२०१८ रोजी अनुज्ञेय आहे. | तीन लाभाच्या सु.से.आ.प्र.योजना खाली दुसरा लाभ २० (१२+८) वर्षांनतर अनुज्ञेय असला तरी दिनांक ०१.०७.२०१४ पासून दुसरा लाभ अनुज्ञेय होईल. तथापि सदर योजना दि.०१.०१.२०१६ पासून अंमलात आल्याने, सदर लाभ दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय होईल व यापूर्वी दि.०१.०७.२०१८ रोजी २४ वर्षाचा लाभ मंजूर केला असल्यास तो लाभ रद्द करुन सुधारीत दिनांकास (दि.०१.०१.२०१६) दुसरा लाभ मंजूर करण्यात यावा व फरकाची रक्कम अनुज्ञेय असल्यास देण्यात यावी. तिसरा लाभ दि. ०१.०१.२०२६ रोजी अनुज्ञेय होईल. |

वरीलप्रमाणे ज्या कर्मचारी / अधिकारी यांची २० वर्षाची सेवा ही दि.०१.०१.२०१६ रोजी व नंतरच्या तारखेस पूर्ण होईल, त्यांना, तिसरा लाभ हा दुसऱ्या लाभापासून १० वर्षांनंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर (Third benefit on promotional post ) अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| उदा. "क्ष" कर्मचारी नियुक्ती दिनांक ०१.०७.१९९७<br>मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक<br>पे बँड ५२००-२०२०० व ग्रेड पे १९०० | शासकीय सेवेची १२ वर्ष पूर्ण झाल्याने दिनांक ०१.०७.२००९ रोजी पहिला लाभ अनुज्ञेय झाला आहे.<br>शासकीय सेवेची २० (१२+८) वर्ष पूर्ण झाल्याने दिनांक ०१.०७.२०१७ रोजी दुसरा लाभ अनुज्ञेय झाला. | तीन लाभांच्या सु.से.आ.प्र.योजने खाली दुसरा लाभ दि.०१.०७.२०१७ रोजी अनुज्ञेय झाल्याने, तिसरा लाभ १० वर्षांनतर म्हणजेच दिनांक ०१.०७.२०२७ पासून अनुज्ञेय होईल. |

(x) ज्या कर्मचारी / अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार दि.०१.०१.२०१६ पूर्वीच पदोन्नतीच्या साखळीतील पदावर दुसरा लाभ मंजूर केला आहे, अशा कर्मचाऱ्यांना त्यांची २४+६ अशी ३० वर्षाची सेवा, ही दि.०१.०१.२०१६ पूर्वी पूर्ण होत असल्यास, संबंधितास तिसरा लाभ दि.०१.०१.२०१६ पासून पात्रतेनुसार अनुज्ञेय करण्यात यावा. तसेच ज्यांची तिसऱ्या लाभाच्या अनुज्ञेयतेसाठी ३० वर्षांची सेवा ही दि.०१.०१.२०१६ रोजी व नंतरच्या तारखेस पूर्ण होत असल्यास, त्यांना संबंधित तारखेस पात्रतेनुसार, तिसरा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| उदा. "क्ष" कर्मचारी नियुक्ती दिनांक ०१.०७.१९८५<br>मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक<br>पे बँड ५२००-२०२०० व ग्रेड पे १९०० | शासकीय सेवेची १२ वर्ष पूर्ण झाल्यामुळे दिनांक ०१.०७.१९९७ रोजी पहिला लाभ अनुज्ञेय झाला आहे.<br>शासकीय सेवेची २४ वर्ष पूर्ण झाल्यामुळे दिनांक ०१.०७.२००९ रोजी दुसरा लाभ अनुज्ञेय झाला आहे. | तीन लाभाच्या सु.से.आ.प्र.योजना दि. ०१.०१.२०१६ रोजी अस्तित्वात आली असल्यामुळे खाली तिसरा लाभ (२४+६) वर्षांनतर म्हणजेच दि.०१.०७.२०१५ पूर्ण होत असले तरी त्यांना सदर लाभ दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय होईल. |
| उदा. "ज्ञ" कर्मचारी नियुक्ती दिनांक ०१.०७.१९८६<br>मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक<br>पे बँड ५२००-२०२०० व ग्रेड पे १९०० | शासकीय सेवेची १२ वर्ष पूर्ण झाल्यामुळे दिनांक ०१.०७.१९९८ रोजी पहिला लाभ अनुज्ञेय झाला आहे.<br>शासकीय सेवेची २४ वर्ष पूर्ण झाल्यामुळे दिनांक ०१.०७.२०१० रोजी दुसरा लाभ अनुज्ञेय झाला आहे. | तीन लाभाच्या सु.से.आ.प्र.योजने खालील तिसरा लाभ ३० (२४+६) वर्षांनतर म्हणजेच दि.०१.०७.२०१६ रोजी अनुज्ञेय होईल. |

(xi) दि.०१ जानेवारी, २०१६ व त्यानंतरच्या पदोन्नतीच्या वेळी, म.ना.से.(सुधारीत वेतन) नियम, २०१९ या अधिसुचनेतील नियम क्रमांक १३ नुसार वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय केला जाणार असल्यामुळे त्याच तरतुदीनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावरील पदधारकास नवीन योजनेमध्ये वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय राहील.

(xii) एकाकी पदावरील कर्मचारी / अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार दि.०१.०१.२०१६ पूर्वीच पहिला लाभ मंजूर केला आहे, अशा कर्मचाऱ्यांना त्यांची २० (१२+८) वर्षांची सेवा ही दि.०१.०१.२०१६ पूर्वी पूर्ण होत असल्यास, संबंधितास दुसरा लाभ हा सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्समधील नजिकच्या वेतनस्तरामध्ये (Immediate Next Level) दि.०१.०१.२०१६ पासून पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरेल.

| | | |
|---|---|---|
| उदा. "क्ष" कर्मचारी नियुक्ती दिनांक ०१.०७.१९९५<br>मूळ नियुक्ती-वाहन चालक<br>सदर पदास सहाव्या वेतन आयोगातील अनुज्ञेय वेतन संरचनेशी समकक्ष वेतनस्तर एस-६ | शासकीय सेवेची १२ वर्ष पूर्ण झाल्यामुळे दिनांक ०१.०७.२००७ रोजी पहिला लाभ अनुज्ञेय झाला आहे.<br>"क्ष" कर्मचाऱ्याच्या शासकीय सेवेची २० (१२+८) वर्षे ही दि.०१.०७.२०१५ रोजी पूर्ण झाली.<br>"क्ष" कर्मचाऱ्याची शासन निर्णय वित्त विभाग दि.०१ मार्च २०१९ मधील तरतुदीनुसार, दि.०१.०१.२०१६ रोजीची वेतननिश्चिती ही एस-७ या वेतनस्तरामध्ये करण्यात येणे अपेक्षित आहे. | तीन लाभाची सु.से.आ.प्र.योजना दि. ०१.०१.२०१६ रोजी अस्तित्वात आली असल्यामुळे दुसरा लाभ हा, सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्स मधील नजिकच्या वेतन स्तरामध्ये (Immediate Next Level), दि.०१.०१.२०१६ रोजी वेतनस्तर एस-८ मध्ये अनुज्ञेय होईल. |

(xiii) दि.०१.०१.२०१९ पूर्वी शासन सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना दि.०१.०१.२०१९ रोजी व नंतर तीन लाभाच्या योजनेतील यथास्थिती पहिला, दुसरा व तिसरा लाभ हा पात्रतेनुसार, सातव्या वेतन आयोगाच्या वेतनमॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत अनुज्ञेय राहील.

(xiv) सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीतील सुधारणा तसेच तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.०१.०१.२०१६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे जे कर्मचारी व अधिकारी हे पूर्वीच्या योजनानुसार यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेऊन दि.०१.०१.२०१६ पूर्वीच शासन सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत / मृत्यू पावले आहेत, त्यांना यथास्थिती १२+८ व २४+६ याप्रमाणे सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.

तथापि ज्या कर्मचारी / अधिकारी यांना कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना /सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, यांचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ हा दि.३१.१२.२०१५ पूर्वी प्राप्त होऊन ते दि.०१.०१.२०१६ रोजी वा नंतरच्या तारखेस सेवानिवृत्त झाले आहेत /मृत्यू पावले आहेत, अशा कर्मचारी / अधिकारी यांच्या लाभाच्या तारखेपासून यथास्थिती ८ वर्षाची सेवा तसेच ६ वर्षाची सेवा ही त्यांच्या निवृत्तीच्या तारखेस / मृत्युच्या तारखेस पूर्ण होत आहे, अशा कर्मचारी /अधिकारी यांना अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार यथास्थिती दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| उदा. "क्ष" कर्मचारी नियुक्ती दिनांक ०१.०७.१९८६<br><br>मूळ नियुक्ती-लिपिक टंक लेखक<br><br>पे बँड ५२००-२०२०० व ग्रेड पे १९०० | शासकीय सेवेत १२ वर्ष पूर्ण दिनांक ०१.०७.१९९८ रोजी पहिला लाभ व दुसरा लाभ दि.०१.०७.२०१० रोजी अनुज्ञेय झाले आहेत.<br><br>सेवानिवृत्ती दिनांक ३१.०३.२०१८ | संबंधित कर्मचाऱ्यांस यापूर्वी दोन लाभ मंजूर करण्यात आलेले आहेत व दि.३१.०३.२०१८ रोजी सेवानिवृत्त होण्यापूर्वी दि.०१.०७.२०१६ रोजी त्यांची ३० (२४+६) वर्षाची सेवा पूर्ण झाली असल्यामुळे सदर दिनांकास तिसरा लाभ अनुज्ञेय होईल. |

(xv) एकाकी अथवा एकाकी संवर्गातील पदावर कार्यरत राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी, यांना दि.०१.०१.२०१६ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती १२ वा २४ वर्षाच्या सेवेनंतर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर झाला आहे, त्यांना २० (१२+८) व ३०(२४+६) एवढ्या वर्षाच्या सेवेनंतर पात्रतेनुसार यथास्थिती दुसरा वा तिसरा लाभ सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्समधील नजिकच्या वेतनस्तरामध्ये ( Immediate Next Level ) मंजूर करण्यात यावा.

(xvi) एकाकी अथवा एकाकी संवर्गातील पदावर कार्यरत राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी, यांना दि.०१.०१.२०१६ ते सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश निर्गमित होण्याच्या तारखेपर्यंत ज्यांना शासन निर्णय वित्त विभाग दि.०५.०७.२०१० नुसार यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर केला आहे, त्याबाबतचे आदेश रद्द करुन, सर्व संबंधितांस, सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्सनुसार, सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार, सदर लाभ सुधारीतरित्या मंजूर करण्यात येतील. त्या अनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करुन फरकाची रक्कम संबंधितांना अनुज्ञेय करण्यात यावी.

(xvii) दि.०१.०१.२०१९ रोजी व नंतर शासन सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर अथवा एकाकी पदावर किंवा एकाकी संवर्गावर, सरळसेवा प्रवेशाने नियुक्त होणाऱ्या कर्मचारी / अधिकारी यांना यथास्थिती १०, २० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतर, सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार, वेतन मॅट्रीक्समधील

विद्यमान वेतनस्तर विचारात घेऊन, नजिकच्या वेतनस्तरामध्ये (immediate next level) यथास्थिती पहिला, दुसरा व तिसरा लाभ, हे पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरतील.

(xviii) वरील सर्व प्रसंगांमध्ये वेतनमॅट्रीक्समधील एस-२० या वेतनस्तरामध्ये वेतन आहरित करेपर्यंतच, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांस यथास्थितीं पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय ठरेल. पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ घेतल्यामुळे, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना एस-२१ हा वेतनस्तर लागू झाला कि, त्यास त्यापुढील लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

(xix) संबंधित कर्मचारी / अधिकाऱ्यास, तीन लाभाच्या योजनेअंतर्गत पहिल्या वा दुसऱ्या वा तिसऱ्या लाभाच्या अनुज्ञेयतेसाठी, गोपनीय अहवाल प्रतवारीच्या सरासरीचा निकष हा निकटच्या पदोन्नतीच्या पदासाठी सामान्य प्रशासन विभागाने विहीत केल्यानुसार राहील. तसेच वर्ग-४ मधील कर्मचारी व मागासवर्गीय कर्मचारी यांच्या पदोन्नतीकरीता सामान्य प्रशासन विभागाने विहीत केलेले आदेश तसेच धोरण विचारात घेऊन संबंधितांची या योजनेअंतर्गत लाभासाठी पात्रता तपासण्यात येईल.

(xx) या योजनेचा पहिला अथवा दुसरा लाभ मिळाल्यानंतर कर्मचाऱ्यास पदोन्नतीच्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल व त्यानंतर पदोन्नती साखळीत पुढील पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसेल तर, तो ज्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन घेत आहे ते पद जणूकाही एकाकी पद आहे असे समजून संबंधित कर्मचाऱ्यास त्यांचा वेतनमॅट्रीक्समधील, विद्यमान वेतनस्तर विचारात घेऊन, नजिकच्या वेतनस्तरामध्ये (सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार नुसार) अनुज्ञेय लाभ, पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

(२) कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी / अधिकारी यांस भविष्यात होणाऱ्या / झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षांच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहीत अटी व शर्तीच्या पूर्ततेनंतर, या योजनेअंतर्गत यथास्थिती पहिला / दुसरा / तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

(३) या योजनेखाली पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात येईल.

(४) रोजंदारीवरील, कार्यव्ययी आस्थापनेवरील, कंत्राटी तत्वावरील व तदर्थ (Ad-hoc) नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०२१८०९३२६४०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant
Devidasrao
Londhe

Digitally signed by Shrikant Devidasrao Londhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra,
ou=Finance Department, postalCode=400032
st=Maharashtra,
2.5.4.20=79c7a1a5cbac6bb04095733674ead2e48
4e7eee68c06c510363ef7c9edf4ac2
serialNumber=[illegible]
cn=Shrikant Devidasrao Londhe
Date: 2019.03.02 18:12:11 +05'30'

**( श्री.दे.लोंढे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई
सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई
मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई.
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा),मुंबई.
#सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई.
# सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
#प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
#मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई
# आयुक्त राज्य माहिती आयोग,(सर्व)
# सचिव राज्य निवडणूक आयोग,मुंबई.
# प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/ औरंगाबाद.
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५
नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८
वित्त विभागातील सर्व कार्यासने

| | |
|---|---|
| महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे<br>सर्व विभागीय आयुक्त.<br>सर्व जिल्हाधिकारी<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.<br>महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई<br>महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर<br>महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर<br>सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,<br>संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई<br>अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई<br>मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब,मुंबई<br>उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब,मुंबई/पुणे/ नागपूर /औरंगाबाद/ नाशिक /अमरावती.<br>जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर,<br>जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब,कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी,<br><br># पत्राने | निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-३) |



-१०८-

## परिशिष्ट.

(शासन निर्णय, वित्त विभाग, क्र:वेतन १११९/प्र.क्र.३/सेवा-३, दिनांक ०२ मार्च, २०१९ सोबतचे)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (से.आ.प्र.यो.) | | | | |
| | (१) | दि. ०१.०१.२०१९ वा त्यानंतर शासन सेवेत / जिल्हा परिषदेत / अनुदानित संस्थेत रुजू झालेल्या प्रकरणी | | |
| | (२) | विभागात पदोन्नतीची वेतनश्रेणी नसलेल्या, एकमेव संवर्ग असलेल्या पदावरील प्रकरणी | | |
| | (३) | विभागात पदोन्नतीची वेतनश्रेणी नसलेल्या, एकमेव पदावरील प्रकरणी | | |
| | कोणत्या वेतनश्रेणीत नियुक्ती | सेआप्रयो अंतर्गत अनुज्ञेय वेतनश्रेणी | सेआप्रयो अंतर्गत अनुज्ञेय वेतनश्रेणी | सेआप्रयो अंतर्गत अनुज्ञेय वेतनश्रेणी |
| | सुरुवातीस | नियुक्तीपासून १० वर्षाच्या सेवेनंतर | नियुक्तीपासून २० वर्षाच्या सेवेनंतर किंवा किंवा मागील पदोन्नतीच्या तारखेपासून १० वर्षाच्या सेवेनंतर | नियुक्तीपासून ३० वर्षाच्या सेवेनंतर किंवा किंवा मागील पदोन्नतीच्या तारखेपासून १० वर्षाच्या सेवेनंतर |
| अ.क्र. | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | एस-१ | एस -२ | एस -३ | एस -४ |
| २ | एस -२ | एस -३ | एस -४ | एस -५ |
| ३ | एस -३ | एस -४ | एस -५ | एस -६ |
| ४ | एस -४ | एस -५ | एस -६ | एस -७ |
| ५ | एस -५ | एस -६ | एस -७ | एस -८ |
| ६ | एस -६ | एस -७ | एस -८ | एस -९ |
| ७ | एस -७ | एस -८ | एस -९ | एस -१० |
| ८ | एस -८ | एस -९ | एस -१० | एस -११ |
| ९ | एस -९ | एस -१० | एस -११ | एस -१२ |
| १० | एस -१० | एस -११ | एस -१२ | एस -१३ |
| ११ | एस -११ | एस -१२ | एस -१३ | एस- १४ |
| १२ | एस -१२ | एस -१३ | एस- १४ | एस- १५ |
| १३ | एस -१३ | एस- १४ | एस- १५ | एस- १६ |
| १४ | एस- १४ | एस- १५ | एस- १६ | एस -१७ |
| १५ | एस- १५ | एस- १६ | एस -१७ | एस -१८ |
| १६ | एस- १६ | एस -१७ | एस -१८ | एस -१९ |
| १७ | एस -१७ | एस -१८ | एस -१९ | एस -२० |
| १८ | एस -१८ | एस -१९ | एस -२० | एस -२१ |
| १९ | एस -१९ | एस -२० | एस -२१ | लागू नाही |
| २० | एस -२० | एस -२१ | लागू नाही | लागू नाही |

**अर्जित रजेचे रोखीकरण सुधारीत वेतन संरचनेनुसार करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अरजा-२०१९/प्र.क्र.१२/सेवा-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४ मे, २०१९

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : अरजा-२४०१/८/सेवा-९, दिनांक १५ जानेवारी २००१
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : अरजा-२००९/प्र.क्र.२१/सेवा-६, दिनांक २७ ऑगस्ट २००९.
३) शासन पूरकपत्र, वित्त विभाग, क्रमांक : अरजा-२००९/प्र.क्र.२१/सेवा-६, दिनांक १० नोव्हेंबर २००९.
४) शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक : वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९ दिनांक ३० जानेवारी २०१९.

**<u>प्रस्तावना</u> :**

अर्जित रजेचे रोखीकरण करण्याची २४० दिवसांची मर्यादा ३०० दिवसांपर्यंत वाढविण्याबाबतचा संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय वित्त विभाग हा दिनांक १५.०१.२००१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच अलीकडेच राज्य शासनाने केंद्र शासनाच्या सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या आधारे दिनांक १ जानेवारी २०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतन संरचना लागू केली आहे. त्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त/ निधन झालेल्या/ होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या रोखीकरणाच्या परिगणनेसाठीचे वेतन हे मॅट्रीक्समधील वेतन स्तरानुसार ग्राह्य धरावे किंवा कसे? याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त/ शासन सेवेत असताना निधन झालेल्या/ होणाऱ्या तसेच वरील संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २(२) व परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणी, शासकीय कर्मचाऱ्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या रोखीकरणाच्या परिगणनेसाठी 'वेतन' या संज्ञेचा अर्थ, हा उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ येथील अधिसूचनेतील नियम क्रमांक ३(१२) अन्वये अंमलात आलेल्या मूळ वेतनाच्या व्याख्येनुसार राहील.

२. तसेच उपरोक्त परिच्छेद-२ मध्ये नमूद केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे सुधारीत वेतन संरचनेतील वेतन विचारात घेऊन त्यांना नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या शिल्लक अर्जित रजेच्या संबंधातील रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम, एका ठोक रकमेत रोखीने प्रदान करण्यात यावी. जर संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांस दिनांक ०१.०१.२०१६ ते दिनांक ३१.०१.२०१९या कालावधीत असुधारीत वेतनसंरचनेतील वेतनाच्या आधारे शिल्लक अर्जित रजेच्या रोख सममूल्याची रक्कम यापूर्वी अदा केलेली असल्यास, त्यांना या शासन निर्णयाच्या अनुषंगाने फरकाची रक्कम,ठोक रकमेद्वारे रोखीने प्रदान करण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्र २०१९०५२४१५१६२३२२०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhalchandra Jagannath Gadekar

(भा.ज. गाडेकर)
शासनाचे उप सचिव.

**प्रति,**

१ मा. राज्यपालांचे सचिव.
२ मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३ मा.विरोधी पक्ष नेते, विधान सभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४ सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५ मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६ सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव व सचिव,मंत्रालय,मुंबई.
७ महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई .
८ महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर .
९ महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
१० महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
११ महालेखापाल (वाणिज्य लेखा परीक्षा), मुंबई.
१२ महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१३ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४ आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय ,पुणे.
१५ संचालक, शालेय शिक्षण (प्राथमिक) विभाग ,पुणे.

१६ संचालक, शालेय शिक्षण (माध्यमिक ) विभाग ,पुणे.
१७ संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे.
१८ संचालक, तंत्र शिक्षण विभाग,मुंबई.
१९ संचालक, व्यवसाय शिक्षण ,मुंबई.
२० संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन , मुंबई.
२१ संचालक, आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई.
२२ कुलगुरु/ कुलसचिव, कृषि विद्यापीठे/बिगर कृषि विद्यापीठे.
२३ सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.
२४ निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२५ प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
२६ प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
२७ सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२८ सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२९ प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
३० मुख्य माहिती आयुक्त , मुंबई.
३१ आयुक्त, राज्य माहिती आयोग ( सर्व ).
३२ सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२.
३३ ग्रंथपाल,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
३४ विशेष आयुक्त,नवीन महाराष्ट्र सदन,कस्तुरबा गांधी मार्ग, के.जी.मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.
३५ मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
३६ सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी.
३७ सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३८ सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३९ सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परिक्षक (शिक्षण).
४० संचालक , महानगरपालिका प्रशासन, मुंबई.
४१ बृहन्मुंबई महानगरपालिका,भविष्य निर्वाह निधी विभाग, प्रमुख लेखापाल यांचे कार्यालय, मुंबई.
४२ सर्व आयुक्त महानगरपालिका /सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद.
४३ सर्व मंत्रालयीन विभाग.
४४ इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई.
४५ भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी. ओ. बॅरेक नं.-१, योगक्षेम समोर, नरीमन पॉईट, मुंबई ४०० ०२०.
४६ नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईट.

४७ शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ०२८.

४८ बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान,मुंबई ४०० ००१.

४९ भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी,३१४,राजभवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४०० ००४.

५० भारतीय कम्युनिस्ट पार्टी , ( मार्क्सवादी ) , महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल , ग्लोबल मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०० ०१३.

५१ वित्त विभागातील सर्व कार्यासने.

५२ निवडनस्ती (सेवा-६).

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९
राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित
अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या
कर्मचाऱ्यांच्या थकबाकी प्रदानासंबंधी स्पष्टीकरण

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक- ३० मे, २०१९

वाचा :

१. **शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-२०१९ /प्र.क्र. १ /सेवा-९, दिनांक - ३० जानेवारी, २०१९**
२. **शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८ /सेवा-९, दिनांक - २० फेब्रुवारी, २०१९**

**परिपत्रक**

शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-२०१९ /प्र.क्र. १ /सेवा-९, दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये, दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचना व त्यामधील प्रारंभिक वेतननिश्चितीबाबतचे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ प्रसिध्द करण्यात आले आहेत. या नियमांनुसार वेतननिश्चिती करण्याबाबत तसेच त्यानुषंगाने वेतनाची अनुज्ञेय थकबाकी अदा करण्याबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८ /सेवा-९, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू नसल्याने, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील, असे वरील परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार वेतनाची अनुज्ञेय थकबाकी अदा करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

**वेतनाची थकबाकी प्रदान करण्याची पध्दती:-**

१. राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू नसल्याने, अशा कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंतच्या कालावधीतील सुधारित वेतन संरचनेतील वेतनाची अनुज्ञेय थकबाकी, आर्थिक वर्ष २०१९-२०२० पासून पुढील ५ वर्षांत ५ समान हप्त्यांत पुढे नमूद केल्याप्रमाणे रोखीने अदा करण्यात यावी:-

**(अ)** दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी ज्या प्रकरणी शासकीय कर्मचाऱ्याने निवृत्तिवेतन खात्यामध्ये अगोदर (असुधारित वेतनानुसार) दिलेली नियमित वर्गणी, सुधारित वेतन संरचनेत निश्चित केलेले वेतन विचारात घेता

नियमांनुसार विहित केलेल्या किमान वर्गणीपेक्षा कमी पडत असेल तर, ती थकबाकीच्या रकमेतून वसूल करून त्यावरील शासनाच्या उचित अंशदानासह अशी रक्कम स्तर - १ खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

**(ब)** उर्वरीत रोखीने द्यावयाच्या थकबाकीची निव्वळ रक्कम खालीलप्रमाणे सर्व शासकीय देय रकमा वजा /समायोजित करुन काढण्यात यावी :-

(१) वेतनाच्या सुधारित रकमेवर देय असलेली व्यवसाय कराच्या थकबाकीची रक्कम;

(२) शासकीय निवासस्थानामध्ये राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सुधारित वेतनावर देय असणाऱ्या अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम;

(३) दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत शासकीय कर्मचाऱ्याकडून काही शासकीय येणे असल्यास तीचे समायोजन;

**(क)** दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत सेवानिवृत्ति अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त झाल्या असतील, अशा कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून ते सेवेत असलेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील वेतनाची थकबाकी अनुज्ञेय असल्यास, सदर थकबाकी, वरील खंड (अ) व (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा / समायोजित करुन पाच समान हप्त्यांत पाच वर्षांत रोखीने अदा करण्यात यावी.

**(ड)** थकबाकीचा एक हप्ता अथवा अधिक हप्ते रोखीने अदा केल्यानंतर सेवानिवृत्ति अथवा अन्य कारणास्तव सेवा समाप्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, अदा करावयाच्या बाकी असलेल्या हप्त्यांची रक्कम (अनुज्ञेय असल्यास), वरील खंड (अ) व (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा /समायोजित करुन समान हप्त्यात उर्वरित वर्षांत रोखीने अदा करण्यात यावी.

**(इ)** दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याच्या मृत्यूच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील वेतनाच्या थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास, वरील खंड (अ) आणि (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा /समायोजित करुन एकाच हप्त्यात त्याच्या अवलंबिताना रोखीने अदा करण्यात यावी. त्याचप्रमाणे थकबाकीचा एक किंवा अधिक हप्ते रोखीने अदा केल्यानंतर मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अदा करावयाच्या बाकी असलेल्या हप्त्याची / हप्त्यांची रक्कमही त्याच्या अवलंबितांना वरील, खंड (अ) आणि (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा / समायोजित करुन एकाच हप्त्यात रोखीने अदा करण्यात यावी.

| उदा.- दि. १ जानेवारी, २०१६ ते दि. ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीतील थकबाकीची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणे | | |
|---|---|---|
| १ | थकबाकीची रक्कम | रुपये ४,००,०००/- |
| २ | वरील खंड (अ) व (ब) नुसार वजा करायाची रक्कम | समजा, रुपये ५०,०००/- |
| ३ | थकबाकीची उर्वरित रक्कम [अ.क्र. १ (-) अ.क्र. २ ] | ३,५०,०००/- |
| ४ | वार्षिक हप्त्याची रक्कम (अ.क्र. ३ ÷ ५ वर्षे) | रुपये ७०,०००/- |
| ५ | रुपये ७०,०००/- ही थकबाकीच्या हप्त्याची रक्कम सन २०१९ ते २०२३ या पाच वर्षांत दरवर्षी दिनांक १ जुलै रोजी रोखीने अदा करण्यात यावी. | |
| ६ | एखादा कर्मचारी थकबाकीचे दोन हप्ते रोखीने अदा केल्यानंतर उदा. ऑक्टोबर, २०२० मध्ये सेवानिवृत्त झाला/अथवा त्याच्या सेवा समाप्त झाल्या तर, त्याला अदा करावयाचे बाकी असलेले थकबाकीचे तीन हप्ते सन २०२१, २०२२ व २०२३ या वर्षांत रोखीने अदा करण्यात यावेत. | |

२. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी थकबाकीच्या हप्त्याची रक्कम सन २०१९ पासून दरवर्षी दिनांक १ जुलै रोजी रोखीने अदा करावी.

थकबाकीची रक्कम संबंधित वर्षात दिनांक १ जुलै रोजी अदा केली जाईल याची विभागप्रमुख /कार्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी. या संदर्भात विलंब झाल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल.

३. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना मंजूर केल्यामुळे होणारा अतिरिक्त खर्च संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्च ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सर्व विभाग प्रमुखांनी आपले अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना या बाबीवर येणारा अतिरिक्त खर्च विचारात घ्यावा. ही तरतूद योग्य त्या फेरफारांसह जिल्हा परिषदा व अनुदानप्राप्त संस्थांना देखील लागू राहील.

४. वेतनाच्या थकबाकीच्या हप्त्याची रक्कम संबंधित वर्षाच्या जून महिन्याच्या मासिक वेतन देयकाबरोबर काढण्यात यावी. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी ज्यांचे वेतन आस्थापना देयकावर काढण्यात येते, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्या वेतन देयकात संबंधित वर्षाच्या थकबाकीच्या रकमेची एक वेगळी बाब म्हणून मागणी करावी. वेतन देयकाला जोडलेल्या विवरणपत्रात रोखीने अदा करावयाच्या थकबाकीच्या रकमेसह थकबाकीचा हप्ता क्रमांक स्पष्टपणे लाल शाईने दाखवावा. एका कार्यालयातून / विभागातून दुसऱ्या कार्यालय / विभागात बदली झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, रोखीने अदा करावयाच्या संबंधित वर्षाच्या थकबाकीच्या हप्त्याची रक्कम, असा कर्मचारी संबंधित वर्षाच्या दिनांक १ जून रोजी ज्या कार्यालयात कार्यरत होता त्या कार्यालयाने काढावी. दिनांक १ जून रोजी अन्य कार्यालयात

प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी तो ज्या कार्यालयात कार्यरत होता, त्या कार्यालयाने किंवा यथास्थिती विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख अशा त्याच्या आस्थापनाविषयक बाबी हाताळण्यास सक्षम अधिकाऱ्यांनी थकबाकीच्या हप्त्याची रक्कम रोखीने अदा करण्याबाबतची कार्यवाही करावी.

५. राज्य शासनाच्या एकत्रित निधीव्यतिरिक्त इतर निधीमधून वेतन घेणाऱ्या प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत संबंधित कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत होता, त्याच कार्यालयाने थकबाकीची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी.

६. पूर्व तपासणीच्या अभावी काही थकबाकी चुकीने परिगणित होण्याची शक्यता आहे आणि ती अतिप्रदान म्हणून ठरल्यास त्याची नंतर वसुली करावी लागेल. यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याला त्याची सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यापूर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ सोबतच्या जोडपत्र - चार अनुसार असे लेखी वचनपत्र द्यावे लागेल की, वेतनाच्या निश्चितीमुळे काही जास्त रक्कम जमा झाली असे आढळून आल्यास ती भविष्यात देय होणाऱ्या रकमेशी समायोजित करुन अथवा इतर प्रकारे शासनास परत करील.

७. सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांनी या परिपत्रकातील सूचना सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात.

८. सदर परिपत्रक कार्यारान सेवा - ४ च्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १००, दिनांक २६ एप्रिल, २०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०५३०१६०८०८४९०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2019.05.30 16:38:07 +05'30'

(भा.ज.गाडेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
३. अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव
४. सभापती / उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता

७. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
८. मंत्रालयीन सर्व विभाग
९. मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख.
१०.प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
११.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
१२.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१३.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१४.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१५.आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
१६.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१७.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
१८. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
१९.सर्व विभागीय आयुक्त
२०.सर्व जिल्हाधिकारी
२१.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
२२.महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
२३.महालेखापाल-१ (लेखा व अनज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
२४.महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
२५.महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
२६.सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
२७.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
३०.उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/ नागपूर/
३१.औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
३२.निवासी लेखा परीक्षक, मुंबई
३३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३४.लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद
३५.मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
३६.बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
३७.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी .ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
३८. भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन,एस.व्ही.पटेल रोड,मुंबई-४
३९.भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३

४०.इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५

४१.नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन,फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१

४२.शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८

४३.निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९).

Our Logo

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# पिंपरी ४११ ०१८

# * शासन निर्णय *

## सेवानिवृत्त वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन, सेवा उपदान व निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण

**दिनांक १ जानेवारी २०१६ पूर्वीच्या निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात / कुटुंब निवृत्तिवेतनात ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ जानेवारी २०१९.

**संदर्भ :** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : न्यायाप्र-२०१५/एसएलपी/प्र.क्र.५/सेवा-४, दि.२७.१२.२०१८.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निवेसु-२०१८/प्र.क्र.१३०/सेवा-४, दि.०१.०१.२०१९.
३) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्रमांक : निवेसु-२०१८/प्र.क्र.१३०/सेवा-४, दि.०४.०१.२०१९.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाने सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या आधारे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनामध्ये सुधारणा करण्यासाठी श्री.के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन केली होती. या समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने संदर्भाधीन दि.१.१.२०१९ चा शासन निर्णय व दि.४.१.२०१९ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनामध्ये / कुटुंब निवृत्तिवेतनामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दि.१.१.२०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात / कुटुंब निवृत्तिवेतनात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

२. या आदेशामध्ये ---

(अ) "विद्यमान निवृत्तिवेतनधारक" म्हणजे दिनांक ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत सेवानिवृत्त झालेला व दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी निवृत्तिवेतन घेत असलेला / घेण्यास पात्र असलेला निवृत्तिवेतनधारक.

(ब) "विद्यमान कुटुंब निवृत्तिवेतनधारक" म्हणजे दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी कुटुंब निवृत्तिवेतन घेत असलेला / घेण्यास पात्र असलेला कुटुंब निवृत्तिवेतनधारक.

(क) "विद्यमान मूळ निवृत्तिवेतन" म्हणजे दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी देय असलेले व त्यात निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग असल्यास तो धरुन मूळ निवृत्तिवेतन. यामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील किंवा शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या निवृत्तिवेतनाच्यावेळी लागू असलेल्या इतर कोणत्याही निवृत्तिवेतन नियमातील निवृत्तिवेतनाच्या सर्व प्रकारांचा (जखम / इजा निवृत्तिवेतन वगळून) समावेश होतो.

(ड) "महागाई वाढ" म्हणजे निवृत्तिवेतनाधारकांना सातव्या वेतन आयोगात दिनांक १ जानेवारी २०१६ पासून देय असलेली खाली नमूद केलेल्या कालावधीसाठी अनुज्ञेय असलेली वाढ -

| अ.क्र. | कालावधी | महागाई वाढीचा दर |
|---|---|---|
| १ | १ जानेवारी २०१६ पासून | ०% |
| २ | १ जुलै २०१६ पासून | २% |

| | | |
|---|---|---|
| ३ | १ जानेवारी २०१७ पासून | ४% |
| ४ | १ जुलै २०१७ पासून | ५% |
| ५ | १ जानेवारी २०१८ पासून | ७% |
| ६ | १ जुलै २०१८ पासून | ९% |

३. सातव्या केंद्रीय वेतन आयोगाने दि.१.१.२०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या संदर्भात केलेल्या शिफारशीप्रमाणे राज्यातील निवृत्तिवेतनधारकांच्या विद्यमान मूळ निवृत्तिवेतनास (यामध्ये महागाई वाढीचा समावेश नसेल) २.५७ ने गुणुन अनुज्ञेय होणारे सुधारीत निवृत्तिवेतन देण्याचा निर्णय संदर्भाधीन शासन निर्णय व शासन शुध्दीपत्रकान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार दि.१.१.२०१६ पूर्वीच्या सेवानिवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांचे निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन निश्चित करण्यात यावे. सदर रक्कम अपूर्णांकात येत असल्यास त्यास पुढील रुपयामध्ये पूर्णांकित करण्यात येईल. सुधारीत निवृत्तिवेतन निश्चितीकरणाची सोपी परिगणना लक्षात घेता याकरिता शिघ्रगणकाची आवश्यकता वाटत नाही. तथापि, असे करताना एखाद्या निवृत्तिवेतनधारकांचे / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन रु.७५००/- पेक्षा कमी निश्चित होत असल्यास ते किमान रु.७५००/- इतके निश्चित करण्यात येईल.

४. विद्यमान निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना यथास्थिती, महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई किंवा महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर यांच्या प्राधिकारपत्राशिवाय, एकत्रित दराने निवृत्तिवेतनाचे प्रदान करण्यासाठी, सर्व निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / कोषागार अधिकारी यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. ज्या प्रकरणी निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी हयात असेल व त्यानंतर मृत्यू पावला असेल अशा प्रकरणी त्याचे कायदेशीर वारसदार दिनांक १ जानेवारी २०१६ पासून निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूच्या दिनांकापर्यंतची हयातकालीन थकबाकी मिळण्यास पात्र ठरेल / ठरतील. यासाठी कायदेशीर वारसदारांनी यथास्थिती, निवृत्तिवेतन संवितरण / मंजूर प्राधिकाऱ्याकडे म्हणजे अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / कोषागार अधिकारी / विभाग / कार्यालय प्रमुखाकडे अर्ज करावा. हयातकालीन थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातून प्रलंबित वसुलीच्या रकमा असल्यास त्या समायोजित करुन एकाच हप्त्यात त्यांच्या कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी. त्याचप्रमाणे थकबाकीचे एक किंवा अधिक हप्ते रोखीने अदा केल्यानंतर मृत्यु पावलेल्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या बाबतीत उर्वरीत थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातून प्रलंबित वसुलीच्या रकमा समायोजित करुन एकाच हप्त्यात कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी.

६. निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात दिनांक १.१.२०१६ पासून सुधारणा करण्यात यावी. मात्र सुधारीत वेतन संरचनेत निवृत्तिवेतनाचा प्रत्यक्ष लाभ दिनांक १.१.२०१९ पासून अदा करण्यात यावा. दिनांक १.१.२०१६ ते दिनांक ३१.१२.२०१८ या कालावधीतील देय होणाऱ्या थकबाकीची रक्कम पुढील पाच वर्षात समान हप्त्यात रोखीने अदा करण्यात यावी. सन २०१९ मध्ये अदा करावयाचा पहिला हप्ता माहे जून २०१९ च्या मासिक निवृत्तिवेतनासोबत प्रदान करण्यात यावा.

तसेच उर्वरीत हप्ते प्रतिवर्षी माहे जूनच्या मासिक निवृत्तिवेतनासोबत अदा करावेत. नियमानुसार आयकर कपातीची कार्यवाही निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजेच यथास्थिती अधिदान व लेखा अधिकारी / कोषागार अधिकारी यांनी करावी.

७. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये आणि कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय योग्य त्या फेरफारांसह लागू राहतील.

८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदाचे निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

९. सदर शासन निर्णयातील तरतुदी अखिल भारतीय सेवेतील निवृत्तिवेतनधारक /राजकीय निवृत्तिवेतनधारक / स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतनधारक / शौर्यपदकभत्ता निवृत्तिवेतनधारक / जखम अथवा इजा निवृत्तिवेतनधारक तसेच सार्वजनिक उपक्रम / स्वायत्त संस्था / स्थानिक संस्था यामध्ये समावेशन होऊन निवृत्तिवेतनाच्या १/३ ठोक रकमेचे पुनर्स्थापन करण्यासाठी पात्र ठरलेले राज्य शासकीय कर्मचारी यांना लागू होणार नाहीत.

१०. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदात नमूद केलेल्या निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तथापि, आवश्यक असल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील सुधारीत निवृत्तिवेतनासंबंधीचे खर्च भागविण्यासाठी विधिमंडळाच्या येत्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१९०१२४१९०३००३५०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: CN = INDRAJEET SAMBHAJI GORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FINANCE DEPUTY SECRETARY
Date: 2019.01.24 19:20:02 +05'30'

**(इंद्रजित गोरे)**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.

४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
७) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
९) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.
१०) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक.
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद.
१४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
१५) राज्यपालांचे सचिव.
१६) मुख्यमंत्र्यांचे सचिव.
१७) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
१८) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई.
१९) *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
२०) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२१) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२२) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२३) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व).
२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२८) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१.
२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
३०) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेजसमोर, पुणे ४११ ०३०.
३१) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन, बेळगांव.
३२) मंत्रालयातील सर्व विभाग.
३३) सर्व विभागीय आयुक्त.
३४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३५) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
३६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३७) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३८) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३९) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण).
४०) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई.
४१) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
४२) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक.

४३) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठे, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
४४) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
४५) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
४६) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
४७) कुल सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड.
४८) कुल सचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
४९) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - ४०० ००१.
५०) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०.
५१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई - ४०० ००४.
५२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - ४०० ०१३.
५३) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
५४) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
५५) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई - ४०० ०२८.
५६) ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५८) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५९) कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६०) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
६१) निवड नस्ती.
* पत्राद्वारे.



-१२५-

**Revision of pension / family pension of pre $1^{st}$ January 2016 Pensioners / Family Pensioners as per $7^{th}$ Pay Commission.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Finance Department**
**Government Resolution No. : PEN-2019/C.R. 58/SER -4**
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai- 400032.
Date : 24 January 2019.

**Reference :**
1) Government Resolution, Finance Department No. COC-2015/SLP/C.R.5/ SER-4, dated 27/12/2018.
2) Government Resolution, Finance Department No. PEN -2018/C.R.130/ SER -4, dated 01/01/2019.
3) Government Corrigendum, Finance Department No. PEN -2018/C.R.130/ SER -4, dated 04/01/2019.

**Government Resolution:**

In view of the recommendations of the Seventh Pay Commission of Central Government, the State Government had set up the State Pay Revision Committee 2017 under the Chairmanship of Shri.K.P.Bakshi. As per the recommendations of the Committee, State Government vide Government Resolution dated 01.01.2019 and Corrigendum dated 04.01.2019 mentioned above at Serial No.2 and 3 respectively has taken decision to revise pension / family pension. Accordingly, the pension / family pension of pensioner who retired before $1^{st}$ January 2016 is revised as follows:

2. In these orders

a) "Existing Pensioner" means the Pensioner retired upto $31^{st}$ December 2015, who was drawing / entitled to draw pension on $1^{st}$ January 2016.

b) "Existing Family Pensioner" means Family Pensioner drawing / entitled to draw family pension on $1^{st}$ January 2016.

c) "Existing Basic Pension" means the basic pension inclusive of commuted portion, if any, due on $31^{st}$ December 2015. It covers all classes of pensions (except wound / injury pension) under Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 or under any other pension rules under which the Government Servant was governed at the time of retirement.

d) "Dearness Relief" means the relief applicable to the pensioner / family pensioner in the Seventh Pay Commission from 1st January 2016 for the following period.

| Sr. No. | Period | Existing Dearness Relief |
|---|---|---|
| 1 | From 1st January 2016 | 0% |
| 2 | From 1st July 2016 | 2% |
| 3 | From 1st January 2017 | 4% |
| 4 | From 1st July 2017 | 5% |
| 5 | From 1st January 2018 | 7% |
| 6 | From 1st July 2018 | 9% |

3. As regards to the state government pensioner who retired before 1st January 2016 the state government has decided by the above referred Government Resolution and Corrigendum that the existing basic pension (exclusive of Dearness Relief) is to be multiplied by 2.57, which will be the revised basic pension / family pension on the lines of recommendation made by Central Seventh Pay Commission. Accordingly the pension / family pension of the pensioners / family pensioners drawing pension before 1.1.2016 should be fixed. If the amount of pension so fixed, is in fraction, it should be rounded off to the next rupee. As the revision is based on a simple formula a Ready Reckoner for the same is not necessary. However, if the revised basic pension is below Rs.7500/-, it will be fixed at minimum Rs.7500/-.

4. All Pension Disbursing Authorities (i.e. Pay and Accounts Officer Mumbai /Treasury Officers, as the case may be) are hereby authorised to make payment of revised Pension to the existing pensioners at the consolidated rates without any further authorisation from the Accountant General (A&E)-I, Maharashtra, Mumbai or Accountant General (A&E)-II, Maharashtra, Nagpur as the case may be.

5. In cases where the pensioner / family pensioner was alive as on 1st January 2016 and subsequently died, his legal heir / heirs is / are entitled for Life Time Arrears of pension / family pension with effect from 1st January 2016, till the death of pensioner / family pensioner. For this purpose legal heir / heirs of pensioner / family pensioner may apply to Pension Disbursing / Sanctioning Authorities i.e. the Pay and Accounts Officer, Mumbai / Treasury Officer / Head of Department / Office, as the case may be. Further the Life Time Arrears of pension / family pension are to be paid to the legal heir / heirs, in one instalment in cash after adjustment of recovery amount, if any. In case, where death of pensioner / family pensioner has occurred after receiving one or more

instalments of arrears, the remaining amount may be paid in cash in single instalment to the legal heir / heirs after adjustment of recovery amount, if any.

6. Pension should be revised from 1st January 2016. But the pensioners will get actual benefit of revised pension from 1st January 2019. The arrears due to revision with effect from 1st January 2016 to 31st December 2018 should be paid in cash in five equal instalments over the next five years. The first instalment, due in the year 2019, will be paid along with monthly pension of the month of June 2019. Further, the remaining instalments should be paid along with monthly pension of June every year. Pension Disbursing Authorities means the Pay and Accounts Officer/ Treasury Officer as the case may be, will be solely responsible for deduction of Income Tax as per rule, wherever necessary.

7. Government is also pleased to direct that the above decision should mutatis mutandis apply with necessary changes to those pensioners of Recognized and Aided Educational Institutions, Non Agriculture Universities and affiliated Non-Governmental Colleges and Agricultural Universities, etc. to whom pension scheme is made applicable.

8. In exercise of the powers conferred by the proviso under Section 248 of Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samitis Act 1961 (Maharashtra Act number Five of 1962) and of all other powers enabling it on that behalf, Government is further pleased to decide that above decision will be applied to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

9. The Provisions of this Government Resolution will not be applicable to the Pensioners of All India Services / Political Pensioner / Freedom Fighter Pensioner / Gallantry Medal Allowance Pensioner / Wound / Injury Pensioner and to the state government employees those were absorbed, while in service, in the Public Sector Undertakings / Autonomous Institution / Local Bodies and entitled to restoration of 1/3rd commuted portion of pension.

10. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the pensions of the pensioners mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder. However, if necessary, concerned Administrative Department of Mantralaya should take necessary steps to present Supplementary Demands in the ensuing session of the Legislature to cover expenditure to be incurred in respect of aforesaid pensioners.

11. This Government Resolution is available on the website of Government of Maharashtra i.e. www.maharashtra.gov.in and its computer code number is 201901241903003505. This order has been signed digitally.

By order and in the name of Governor of Maharashtra

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: CN = INDRAJEET SAMBHAJI GORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FINANCE DEPUTY SECRETARY
Date: 2019.01.24 19:20:29 +05'30'

**(Indrajeet Gore)**
**Deputy Secretary to Government.**

**८० वर्षे व त्यावरील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनात दि.१ जानेवारी २०१९ पासून वाढ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५९/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ जानेवारी २०१९.

**संदर्भ :** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-१०१४/प्र.क्र.२६/सेवा-४, दि.०९.०६.२०१४.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निवेसु-२०१८/प्र.क्र.१३०/सेवा-४, दि.०१.०१.२०१९.
३) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्रमांक : निवेसु-२०१८/प्र.क्र.१३०/सेवा-४, दि.०४.०१.२०१९.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.२४.०१.२०१९.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाने सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या आधारे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनामध्ये सुधारणा करण्यासाठी श्री.के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन केली होती. या समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने संदर्भाधीन दि.१.१.२०१९ चा शासन निर्णय व दि.४.१.२०१९ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये ८० वर्षे व त्यावरील राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनामध्ये / कुटुंब निवृत्तिवेतनामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ८० वर्षे व त्यावरील राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना सहाव्या वेतन आयोगानुसार निश्चित झालेल्या मूळ निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनात दि.०१.०४.२०१४ पासून १०% वाढ करण्यात आली आहे. आता सदर दर दि.०१.०१.२०१९ पासून पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | वय वर्षे ८० ते ८५ | मूळ निवृत्तिवेतनात १०% वाढ |
| २ | वय वर्षे ८५ पेक्षा अधिक ते ९० | मूळ निवृत्तिवेतनात १५% वाढ |
| ३ | वय वर्षे ९० पेक्षा अधिक ते ९५ | मूळ निवृत्तिवेतनात २०% वाढ |
| ४ | वय वर्षे ९५ पेक्षा अधिक ते १०० | मूळ निवृत्तिवेतनात २५% वाढ |
| ५ | वय वर्षे १०० पेक्षा अधिक | मूळ निवृत्तिवेतनात ५०% वाढ |

२. सदर लाभ केवळ दि.१.१.२०१९ पासून देय राहील. तत्पूर्वी वयोमानानुसार वाढीव निवृत्तिवेतन घेत असलेल्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना सुधारित दरानुसार फरकाची रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

३. या निर्णयामुळे प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणाऱ्या निवृत्तिवेतन वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजेच यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / कोषागार अधिकारी यांची राहील.

४. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे, अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे, यांमधून सेवानिवृत्त झालेल्या ८० वर्षे व त्यापुढील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय लागू राहील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार याचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांमधून सेवानिवृत्त झालेल्या ८० वर्षे व त्यापुढील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहतील.

६. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये / स्वायत्त संस्थांमध्ये / स्थानिक संस्था इत्यादींमध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर एकरकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, व जे निवृत्तिवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निअंक-१०९९/३०६/ सेवा-४, दि.१५.११.१९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस आणि शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निअंक-१०१०/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.२६.०७.२०१० अनुसार सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित निवृत्तीवेतनास पात्र ठरले आहेत, अशा ८० वर्षे व त्यावरील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना सुधारित निवृत्तिवेतनावर दिनांक ०१.०१.२०१९ पासून वरीलप्रमाणे वाढ अनुज्ञेय राहील.

७. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदात नमूद केलेल्या निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१९०१२४१९१७५६५४०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: CN = INDRAJEET SAMBHAJI GORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FINANCE DEPUTY SECRETARY
Date: 2019.01.24 19:30:27 +05'30'

**(इंद्रजित गोरे)**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.



-२५६-१३३

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मध्ये सुधारणा करण्याबाबत.....
सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १ जानेवारी २०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन लाभ सुधारीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १ मार्च २०१९.

**संदर्भ :** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : न्यायाप्र-२०१५/एसएलपी/प्र.क्र.५/सेवा-४, दि.२७.१२.२०१८.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निवेसु-२०१८/प्र.क्र.१३०/सेवा-४, दि.०१.०१.२०१९.
३) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्रमांक : निवेसु-२०१८/प्र.क्र.१३०/सेवा-४, दि.०४.०१.२०१९.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निवेसु-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.२४.०१.२०१९.
५) अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक : वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०.१.२०१९.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाच्या सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे राज्य शासनाने श्री.के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन केली होती. या समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.२ वरील शासन निर्णय व संदर्भाधीन क्र.३ वरील शासन शुध्दीपत्रकान्वये निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनामध्ये / कुटुंब निवृत्तिवेतनामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन / सेवा उपदान / मृत्यु उपदान नियमित करणारे नियम आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ यांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर फेरबदल राज्य शासकीय कर्मचारी तसेच उपरोल्लेखित नियम ज्यांना लागू आहेत अशा इतर कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील.

<u>अंमलबजावणीचा दिनांक</u>

२. या आदेशान्वये सुधारीत केलेल्या तरतुदी दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या / झालेल्या / सेवेत असताना मृत्यु पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना / त्यांच्या कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना लागू होतील. दिनांक १ जानेवारी २०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात संदर्भाधीन क्र.४ वरील शासन निर्णयान्वये स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

३. दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या / मृत्यु पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना ज्या प्रकरणी निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन / उपदान / निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यापूर्वीच प्राधिकृत करण्यात आले आहे किंवा अद्यापि प्राधिकृत करावयाचे आहेत अशा प्रकरणी ते या आदेशानुसार सुधारीत करण्यात येतील.

दिनांक १ जानेवारी २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांची निवृत्तिवेतन प्रकरणे महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात आली नसल्यास, ती प्रकरणे प्रथम असुधारीत वेतन (सहाव्या वेतन आयोगानुसार) / असुधारीत नियमानुसार तयार करुन महालेखापाल कार्यालयाकडे सादर करावीत. महालेखापाल यांचेकडून निवृत्तिवेतनाचे प्राधिकारपत्र निर्गमित झाल्यानंतरच सदरची प्रकरणे पुन्हा या शासन निर्णयातील तरतुदीन्वये (सातव्या वेतन आयोगानुसार) सुधारीत करण्यात यावीत.

**वेतन-**

४. निवृत्तिवेतन विषयक विविध लाभांच्या परिगणनेसाठी सुधारीत वेतन संरचनेत "मुळ वेतन" या संज्ञेचा अर्थ म्हणजे शासकीय कर्मचारी त्याच्या सेवानिवृत्तिच्या दिनांकास / मृत्युच्या दिनांकास सातव्या वेतन आयोगानुसार विहीत पे मॅट्रीक्स मध्ये आहरीत करीत असलेले वेतन असा राहिल.

सुधारीत निवृत्तिवेतनाची परिगणना करताना त्यामध्ये व्यवसायरोध भत्त्याचा समावेश करण्याबाबत स्वतंत्रपणे शासन आदेश निर्गमित करण्यात येतील. तसेच नक्षलग्रस्त भागातील सेवेसाठी दिल्या जाणाऱ्या अतिरिक्त वेतनाचा लाभ सेवानिवृत्तिवेतन परिगणित करताना विचारात घेतला जाणार नाही.

**निवृत्तिवेतन-**

५. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ नुसार दहा वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण होण्यापूर्वी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास निवृत्तिवेतन देय नाही. परंतु अशा प्रकरणात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११० (१) नुसार सेवेच्या प्रमाणात सेवा उपदान देय ठरेल. हे लाभ केवळ स्थायी / स्थायीकरणाचे लाभ दिलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना लागू राहतील.

५.१ सहाव्या वेतन आयोगानुसार दि.१.१.२००६ पासून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११० (२) (ए) नुसार पूर्ण निवृत्तिवेतनासाठी ३३ वर्षाच्या किमान अर्हताकारी सेवेची आवश्यकता नसून शासकीय कर्मचाऱ्याने २० वर्षाची किमान अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर नियत वयमान, पुर्णसेवा, रुग्णता किंवा भरपाई निवृत्तिवेतनावर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तिच्या शेवटच्या १० महिन्यात अर्जित केलेल्या सरासरी मूळ वेतनाच्या ५० % किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या मूळ वेतनाच्या ५०% यापैकी जी रक्कम त्याला लाभदायक ठरेल, ती रक्कम निवृत्तिवेतन म्हणून अनुज्ञेय करण्यात आली आहे. सदर तरतूद सातव्या वेतन आयोगात देखील अबाधित ठेवण्यात येत आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११० (२) (ए) हा त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आला आहे, असे समजण्यात यावे.

५.२ सहाव्या वेतन आयोगानुसार दि.१.१.२००६ पासून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११० (२) (बी) नुसार दहा वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त परंतु वीस वर्षापेक्षा कमी एवढी अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर नियत वयमान, पूर्ण सेवा, रुग्णता किंवा भरपाई निवृत्तीवेतनावर सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास त्याने सेवानिवृत्तिच्या शेवटच्या १० महिन्यात अर्जित केलेल्या सरासरी मूळ वेतनाच्या ५० **%** किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या मूळ वेतनाच्या

५० % यापैकी जी रक्कम त्याला लाभदायक ठरेल, ती रक्कम निवृत्तिवेतन म्हणून अनुज्ञेय करण्यात आली आहे. सदर तरतूद सातव्या वेतन आयोगात देखील अबाधित ठेवण्यात येत आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम,१९८२ मधील नियम ११० (२) (बी) हा त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आला आहे, असे समजण्यात यावे.

५.३. सहाव्या वेतन आयोगानुसार दि.१.१.२००६ पासून अर्हताकारी सेवेचा किमान कालावधी २० वर्षे इतका करण्यात आल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ (ए) नुसार अर्हताकारी सेवेत भर घालण्याची तरतुद रद्द करण्यात आली आहे. सदर अर्हताकारी सेवेत भर न घालण्याची तरतूद सातव्या वेतन आयोगात देखील अबाधित ठेवण्यात येत आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ (ए) हा त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आला आहे, असे समजण्यात यावे.

५.४ निवृत्तिवेतनाची कमाल मर्यादा सुधारित वेतन संरचनेतील उच्चतम अनुज्ञेय वेतनाच्या ५० टक्के अशी राहील. (उच्चतम वेतन दिनांक १.१.२०१६ पासून रुपये २,२०,०००/- असे आहे.)

**सेवानिवृत्ती उपदान/मृत्यु उपदान -**

६. या शासन निर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये नमूद केलेल्या सुधारीत मूळ वेतनावर निवृत्ती उपदानाची परिगणना करण्यात येईल. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १११ (१) अन्वये, दिनांक ०१.०१.२०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्तिनंतर अर्हताकारी सेवेच्या प्रत्येक पूर्ण सहामाही कालावधीकरिता त्याच्या सुधारीत वेतनाच्या एक चतुर्थांश इतके तथापि सुधारीत वेतनाच्या कमाल १६ $^{1}/_{2}$ पट किंवा रु.१४ लक्ष यापैकी जे कमी असेल ते सेवानिवृत्ती उपदान म्हणून देय राहील.

६.१ दिनांक ०१.०१.२०१६ व तद्नंतर सेवेत असताना शासकीय कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास, त्याच्या कुटुंबाला अनुज्ञेय असणाऱ्या मृत्यू उपदानाबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ नियम १११ (२) मधील तक्त्यामध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ नियम १११ (२) मधील तक्ता हा दिनांक ०१.०१.२०१६ पासून सुधारण्यात आला आहे, असे समजण्यात यावे.

मृत्यु उपदानाची कमाल मर्यादा रु. १४ लक्ष इतकी राहील.

| अर्हताकारी सेवेचा कालावधी | मृत्यु उपदानाचा दर |
|---|---|
| सेवा १ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या दुप्पट |
| सेवा १ वर्षापेक्षा जास्त व ५ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या ६ पट |
| सेवा ५ वर्षापेक्षा जास्त व ११ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या १२ पट |
| सेवा ११ वर्षापेक्षा जास्त व २० वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या २० पट |
| सेवा २० वर्षापेक्षा जास्त | अर्हताकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहामाही कालावधीसाठी अंतिम वेतनाच्या निम्मे मात्र अंतिम वेतनाच्या ३३ पटीच्या मर्यादेत |

**कुटुंब निवृत्तिवेतन १९६४**

७. कुटुंब निवृत्तिवेतनाची परिगणना निवृत्तीवेतनार्ह वेतनाच्या ३० टक्के अशा एकरुप दराने काढण्यात येईल व या कुटुंब निवृत्तिवेतनाची कमाल मर्यादा राज्य शासनाकडील उच्चतम अनुज्ञेय वेतनाच्या ३० टक्के अशी राहील. (उच्चतम वेतन दिनांक १.१.२०१६ पासून रुपये २,२०,०००/- असे आहे.)

७.१ सेवेत असताना मृत्यु पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या वारसांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११६ (४) (ए) (एक) मधील तरतुदीन्वये, दिनांक १ जानेवारी २०१६ पासून संबंधित कर्मचाऱ्याच्या मृत्युच्या दिनांकानंतरच्या दिनांकापासून १० वर्षापर्यंत वाढीव दराने कुटुंब निवृत्तिवेतन मिळेल. याकरिता असलेली वयाची अट रद्द करण्यात येत आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११६ (४) (ए) (एक) हा त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आला आहे.

७.२ शासकीय कर्मचाऱ्याचा मृत्यु सेवानिवृत्तिनंतर झाल्यास त्याच्या वारस / वारसांना वाढीव दराने कुटुंब निवृत्तिवेतन देण्याच्या कालावधीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११६ (४) (ए) (दोन) मध्ये असलेल्या तरतुदींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण -**

८ सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तिवेतनावरील अंशराशीकरणाबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील नियम ५ (१) नुसार शासकीय कर्मचाऱ्याला, त्याच्या निवृत्तिवेतनाच्या ४०% यापेक्षा अधिक होणार नाही एवढया भागाचे, एका ठोक रकमेतील प्रदानासाठी जोडपत्र १ मध्ये दिलेल्या दरानुसार अंशराशीकरण करता येईल. सदर लाभ केवळ दिनांक १ जानेवारी २०१९ पासून अस्तित्वात येतील व सदर दिनांकास अथवा तद्नंतर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू होईल. या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील नियम ५(१) व तक्ता हा त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आला आहे असे समजण्यात यावे.

८.१ अंशराशीकरणाचे सुत्र पुढीलप्रमाणे आहे.

मुळ निवृत्तिवेतन X ४०% X १२ X अंशराशीकरणाच्या सुधारीत तक्त्यानुसार (जोडपत्र - १) कर्मचाऱ्याच्या मूळ अर्जाच्या दिनांकाच्या पुढील जन्मदिनी होणाऱ्या वयाकरिता निश्चित केलेले अंशराशीकृत मुल्य

८.२ जे कर्मचारी दिनांक १ जानेवारी २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तिवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ देय असणार नाही.

**महागाई वाढ**

९. राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारक व कुटुंबनिवृत्तिवेतनधारकांना सुधारित वेतन संरचनेत अनुज्ञेय होणाऱ्या निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनावर दिनांक १ जानेवारी २०१६ पासून पुढे दर्शविलेल्या दराने महागाई वाढ देण्यात येईल.

-१२६-
-१३६

| अनु.क्र. | कालावधी | महागाई वाढीचा दर |
|---|---|---|
| १ | दिनांक १ जानेवारी २०१६ ते दिनांक ३० जुन २०१६ पर्यंत | ० % |
| २ | दिनांक १ जुलै २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत | २ % |
| ३ | दिनांक १ जानेवारी २०१७ ते दिनांक ३० जुन २०१७ पर्यंत | ४ % |
| ४ | दिनांक १ जुलै २०१७ ते दिनांक ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत | ५ % |
| ५ | दिनांक १ जानेवारी २०१८ ते दिनांक ३० जुन २०१८ पर्यंत | ७ % |
| ६ | दिनांक १ जुलै २०१८ पासून पुढे | ९ % |

१०. सुधारित वेतन संरचनेनुसार निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन दिनांक १ जानेवारी २०१६ पासून सुधारित करावे. तथापि, त्याचा प्रत्यक्ष लाभ निवृत्तिवेतनधारकांना / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना दिनांक १ जानेवारी २०१९ पासून रोखीने अदा करण्यात यावा. दिनांक १ जानेवारी २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर २०१८ पर्यंतच्या कालावधीतील थकबाकीची रक्कम ५ वर्षात ५ समान हप्त्यात, वसुलीची रकम असल्यास ती समायोजित करुन, रोखीने अदा करण्यात यावी. सन २०१९ मध्ये अदा करावयाचा पहिला हप्ता माहे जून २०१९ च्या मासिक निवृत्तिवेतनासोबत प्रदान करण्यात यावा. तसेच उर्वरीत हप्ते प्रतिवर्षी माहे जूनच्या मासिक निवृत्तिवेतनासोबत अदा करावेत. नियमानुसार आयकर कपातीची कार्यवाही निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजेच यथास्थिती अधिदान व लेखा अधिकारी / कोषागार अधिकारी यांनी करावी.

१०.१ निवृत्तिवेतन सुधारीत झाल्यामुळे देय ठरणाऱ्या निवृत्ती उपदान व मृत्यू उपदान यांच्या फरकाच्या थकबाकीची रक्कम एकरकमी रोखीने अदा करण्यात यावी.

११. दिनांक ०१.०१.२०१६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या / होणाऱ्या / सेवेत असताना मृत्यु पावलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निवृत्तिवेतनविषयक लाभांचे निर्धारण व प्राधिकृती याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मध्ये विहित केलेली नेहमीची कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.

१२. ज्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना असुधारीत वेतनावर आधारित तात्पुरते निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन विषयक लाभ, यथास्थिती, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ च्या नियम १२६, १३० व नियम १४० च्या तरतुदीनुसार मंजूर करण्यात आलेले आहेत, त्यांचे तात्पुरते निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन विषयक लाभ वरील आदेशांनुसार तात्पुरत्या स्वरुपात सुधारीत करण्यात यावेत.

१३. निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांच्या कायदेशीर वारसदार / वारसदारांना दिनांक १ जानेवारी २०१६ पासून निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्युच्या दिनांकापर्यंतची सुधारीत निवृत्तिवेतन तसेच

सुधारीत सेवानिवृत्ती उपदान / मृत्यु उपदान यांच्या फरकाची हयातकालीन थकबाकी मिळण्याचा अधिकार असेल. या प्रयोजनासाठी कायदेशीर वारसदारांनी शासकीय कर्मचारी जेथून सेवानिवृत्त झाला असेल किंवा त्याच्या मृत्युपूर्वी तो जेथे कार्यरत असेल त्या कार्यालय / विभाग प्रमुखाकडे अर्ज करावा. हयातकालीन थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातून प्रलंबित वसुलीच्या रकमा असल्यास त्या समायोजित करुन एकाच हप्त्यात त्यांच्या कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी. त्याचप्रमाणे सुधारीत निवृत्तिवेतन फरकाच्या थकबाकीचे एक किंवा अधिक हप्ते रोखीने अदा केल्यानंतर मृत्यु पावलेल्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या बाबतीत उर्वरीत थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातून प्रलंबित वसुलीच्या रकमा समायोजित करुन एकाच हप्त्यात कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी.

१४. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदींमध्ये स्वतंत्रपणे सुधारणा करण्यात येत आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील ज्या तरतुदींमध्ये या आदेशान्वये स्पष्टपणे सुधारणा करण्यात आलेल्या नाहीत त्या अबाधित राहतील.

१५. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये आणि कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय योग्य त्या फेरफारांसह लागू राहतील.

१६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदाचे निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहतील.

१७. सदर शासन निर्णयातील तरतुदी अखिल भारतीय सेवेतील निवृत्तिवेतनधारक / राजकीय निवृत्तिवेतनधारक / स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतनधारक / शौर्यपदकभत्ता निवृत्तिवेतनधारक / जखम अथवा इजा निवृत्तिवेतनधारक तसेच सार्वजनिक उपक्रम / स्वायत्त संस्था / स्थानिक संस्था यामध्ये समावेशन होऊन निवृत्तिवेतनाच्या १/३ ठोक रक्कमेचे पुनःस्थापन करण्यासाठी पात्र ठरलेले राज्य शासकीय कर्मचारी यांना लागू होणार नाहीत.

१८. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या-त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तथापि, आवश्यक असल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील निवृत्तिवेतनासंबंधीचा खर्च भागविण्यासाठी विधिमंडळाच्या येत्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

१९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१९०३०११२०२१३३३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: CN = INDRAJEET SAMBHAJI GORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FINANCE DEPUTY SECRETARY
Date: 2019.03.01 12:13:48 +05'30'

**(इंद्रजित गोरे)**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
७) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
९) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.
१०) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक.
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद.
१४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
१५) राज्यपालांचे सचिव.
१६) मुख्यमंत्र्यांचे सचिव.
१७) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
१८) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई.
१९) *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
२०) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२१) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२२) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२३) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व).
२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२८) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१.



-१२७-
-१३८-

२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
३०) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेजसमोर, पुणे ४११ ०३०.
३१) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन, बेळगांव.
३२) मंत्रालयातील सर्व विभाग.
३३) सर्व विभागीय आयुक्त.
३४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३५) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
३६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३७) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३८) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३९) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण).
४०) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई.
४१) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
४२) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक.
४३) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठे, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
४४) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
४५) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
४६) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
४७) कुल सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड.
४८) कुल सचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
४९) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - ४०० ००१.
५०) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०.
५१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई - ४०० ००४.
५२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - ४०० ०१३.
५३) इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
